

म. ग्रं. स. ठाण
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६२८
REFBK 0023675
REFBK-0023675

# कोयनानगर ते गोवा

थोड्या आगळ्या पद्धतीने रेखाटलेले प्रवासवृत्त

६२८
२३६७५
५१२/८२



REFBK-0023675
REFBK-0023675

## बजरंग शेलार

बॉम्बे बुक डेपो, मुंबई

□ प्रकाशक
अ. ब. शेलार
आधुनिक साहित्य प्रकाशन,
उरुल, ता. पाटण, जि. सातारा
© सौ. सीता बजरंग शेलार

□ मुद्रक :
श्रीधर कुलकर्णी
श्रीधर मुद्रणालय, कराड
जि. सातारा

□ चित्रकार
ग. ना. जाधव
सदाशिव पेठ, पुणे

□ कव्हर, ब्लॉक व छपाई
के. जोशी अँड कंपनी
ब्लॉक मेकर्स अँड आर्ट प्रिंटर्स, पुणे

□ वितरक
पा. ना. कुमठा
बॉम्बे बुक डेपो
गिरगाव, मुंबई

□ बाईंडिग :
गजानन ग्रंथ बांधणी
मॅजेस्टिक, पुणे
किंमत पंचवीस रुपये



मराठी भाषेचा
जाज्वल्य अभिमान बाळगणाऱ्या
सौ. शशिकला काकोडकर
माजी मुख्यमंत्री गोवा
यांना आदरपूर्वक
अर्पण

लेखक

बजरंग शेलार लिखित पुस्तके

प्रकाशित :

कथा : चांदण्यातील गप्पा, कोवळे कोंब
समजतीचा घोटाळा, काशी,
जाणीव

कादंबरी : वळण

नाटक : तो दिवस उजाडला, पटल्या अंतरीच्या खुणा


चरित्र : आदर्श विद्यार्थी, कोयनेचे पाणी

प्रवासवृत्त : कोयनानगर ते गोवा


आगामी :

कथा : कालच्या रात्रीची कथा

कादंबरी : धरती, पायाखालची वाट




गोव्याचा नकाशा
तोरकोल किल्ला
तोरकोल नदि
पेडणे
छापोरा
छापोरा किल्ला
अलोरना
नदि
सावतवाडी
म्हापसा
अंसोनोरा
डीचोली
मेमलेंक
अवेलम धबधबा
वाघुरी टेकडी
कलंगुट किनारा
अंगुडा किल्ला
मदोवी नदि
पणजी
जुना गोवा
वालपोल
डोना पॉल बॉय
झुरी नदि
गसपार डोसबंध
पीलार
मंगेश देऊळ
मारडोल
अंगसीम
वास्को द गामा
मार्मो गीवा हारबोर
डबोलीम
फोंडा
तांबडी सुरला देऊळ
वेळगाव
मनोरडा
मडगाव
कोलम
करंझोल
दुडसागर धबधबा
कालवा किनारा
मारगोवा
चादोर
कोलम
करंछोरेम
क्यूपेम
संगम
चंद्रनाथ देऊळ
कावेद राम किल्ला
छावरी
तालपोना नदि
गलसीबाग नदि
परतागड
कारवार
सदाशिव गड
शहराची हद्द
रस्ता
रेल्वे लाईन
नदि
वस्ती
चर्च
देऊळ
किनारा
विमानतळ
किल्ला


अरबी समुद्र
मुंबई,
कोयनानगर,
मालवण
पणजी,
वास्को,
म्हैसूर स्टेट

# KOYANANAGAR
# TO
# GOA





# म्हणून लेखणीतून उतरले

मी गोव्याच्या प्रवासावर लिहितोय असं ऐकताच वाचकांत चर्चा सुरू झाली.

कोण कथेकडून प्रवासाकडे वळल्याबद्दल शुभेच्छा व्यक्त करीत होता. कोण परदेशांच्या प्रवासाच्या अपेक्षा करीत होता तर कोण लेखकाच्या विषय निवडीवर टीका करीत होता.

त्या खुल्या चर्चेतला एक सूर माझ्या कानांवर येऊन आदळला, "काय पण परदेशाच्या प्रवासावर लिहित असल्याची ऐट आणली आहे."
तो सूर ऐकल्यावर मी पण त्या चर्चेत सहभागी झालो.

"मी लेखनासाठी परदेशाचा प्रवास घेतला नाही, याचा अर्थ मला परदेशाचा प्रवास पेलत नाही असं जरी मानलं तरी मला परदेशांचा प्रवास आवडत नाही असा मात्र नाही. योगायोगाने परदेशाच्या प्रवासाची संधी लाभलीच असती तर तिचा लाभ मी घेतलाच असता.

प्रवासाचा सर्वांगीण लाभ रसिकतेनं घ्यायचा असेल तर तो प्रवास किती दूरवरचा कि किती जवळचा याला जास्त महत्त्व न देता करत असलेला प्रवास आपण किती समजून उमजून करतोय याला अधिक प्राधान्य असावे. अशादृष्टीतून प्रवाशाने प्रवास करावा. हे प्रवासासंबंधीचं माझं मत. काही प्रवाशांमध्ये रसीकतेचा अभाव आढळतो. त्यामुळे नजरेतून सूक्ष्म अवलोकन निसटते. नि लहानसहान तपशील हवेत विरून जातात. त्यामुळे

काही स्थळातले अदृश्य स्वरुपातले सौंदर्य पाहूनही दिसत नसते. त्यामुळे प्रवासातला खराखुरा लाभ त्यांना लाभत नाही.

शोधक दृष्टीशिवाय सौंदर्य दिसत नाही. आपल्या अवती भोवतीसुद्धा प्रेक्षणीय स्थळं असतात. पण ती सारी आपल्या पाहण्यात आलेली असतातच असे नाही. त्याचं कारण आपल्यामध्ये असलेला रसिकतेचा अभाव.

'भारताचं नंदनवन' असं ज्याचं वर्णन केलं जातं. तो काश्मीर का आपल्यापासून दूर आहे ?

का तिथं नैसर्गिक सौंदर्य कमी आहे ?

का तिथं इंग्लंड-अमेरिकेसारखी थंड नि अल्हादकारक हवा नाही? असं असतानाही काश्मीर पाहणाऱ्या प्रवाशांची संख्या कमी. याचंही कारण दुसरं नाही. जिथं कुठल्याच सौंदर्याची उणीव नाही असा काश्मीर ज्यानी पाहिला नाही अशा प्रवाशात असे कितीतरी प्रवासी आहेत की जे परदेशाच्या प्रवासाच्या आशा उराशी बाळगून त्या फलद्रूप करण्यासाठी कित्येक वर्षे धडपडत असलेले दिसतात.

परदेशाच्या प्रवासातलं काही बाबतीतलं सुख शोधलं तर इथंही भेटतं. या दृष्टीकोनातूनच मी लेखनासाठी गोव्याच्या प्रवासाचा विषय घेतला.

लेखकाच्या विषय निवडीवर बोलणाऱ्या वाचकांना मी असं विचारतो की, काय पहावं हे जसं पाहणाराच्या मनावर अवलंबून असते तसं काय लिहावं हे लेखकाच्या मतावर असते हे तुम्हाला अजून कसं समजलं नाही ? आणि हे जर तुम्हाला समजलं आहे असं मानलं तर जे लेखकाच्या अत प्रेरणेतून उमटतं तेच त्याच्या लेखणीतून उतरते, हे सांगण्याची गरज का असावी ?

मी लेखनासाठी गोव्याचा प्रवास विचारात घेतला, तो प्रवास घडला म्हणून नव्हे.

कुणी म्हणतील गोवा निसर्ग सौंदर्याच्या मिठ्ठीत आहे म्हणून, कुणी म्हणतील सागर सान्निध्यांमुळे गोव्याला लाभलेल्या सौंदर्याचा लाभ घ्यावा म्हणून, कुणी म्हणतील परदेशीय पर्यटकांचा सहवास घडावा म्हणून, कुणी म्हणतील

तिथली माती, पाणी, अन्न यांच्यातील वेगळेपणा पाहावा म्हणून, ही सारी उद्दिष्टे माझ्या दृष्टीत नव्हती असं नाही. फक्त त्यांचं स्थान गौण होतं. गोवा हा महाराष्ट्राचा शेजारी, अगदी एकमेकाला चिकटून असलेला भूप्रदेश, दोघांमध्ये फक्त सह्याद्री पर्वतच शक्य जवळचा गोवा. पण तिथलं लोकजीवन महाराष्ट्रातील लोकजीवनापेक्षा थोडं वेगळं आहे. ते कुठे ? कसे ? नि किती प्रमाणात वेगळं आहे. हे अजमावावं यासाठी मी गोव्याचा प्रवास करावयाचं ठरवलं.

गोव्याच्या प्रवासात आम्हाला (मी, माझी पत्नी नि मुलगा) जे दिसलं ते पाहिलं. जिथं काही होतं पण प्रत्यक्षात दिसत नव्हतं ते इतरांशी विचारपूस करून समजून घेतले.

गोवा पहातांना मला जसा दिसला, समजून घेताना जसा समजला. तसा शब्दांकित रेषांनी रेखाटला. अन्य कोणाला तो याहीपेक्षा थोडाफार वेगळा दिसेल, ज्याप्रमाणे कुठलाही प्रसंग वेगवेगळ्या ठिकाणावरून पाहिला तर प्रत्येक वेळी दिसणाऱ्या चित्रात किंचितसा फरक असलेला जाणवतो. त्याच-प्रमाणे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पहाणाऱ्यांना गोव्याचं चित्र वेगवेगळ्या स्वरूपात दिसेल.

प्रवासात नियोजनाला नि वक्तशीरपणाला अधिक महत्त्व असते. हे तंत्र नजरेपुढं ठेवूनच आम्ही प्रवास करीत होतो. वक्तशिरपणात थोडी चूक झाली तर वेळेचा अपव्यय होईल व नियोजीत वेळेपेक्षा जादा वेळेची उपलब्धता करता आली नाही तर नियोजित कार्यक्रमातला काही कार्यक्रम कमी करण्याची पाळी येईल जिथं आगळं वेगळं भेटत होतं तिथं आम्ही थांबत होतो. निरीक्षण करीत होतो. काळाच्या पडद्याआडच्या खोलीत जात होतो.

प्रवासात मला प्रकर्षानं जाणवलं ते, हे—जसा दिडशे वर्षे इंग्रजांच्या छत्राखाली वाढलेल्या भारतीयांचे मनावर इंग्रजांच्या आचार विचाराचा प्रभाव पडला. तसा गोव्यात चारशे वर्षे राज्य करणाऱ्या पोर्तुगीजांच्या संस्कृतीचा प्रभाव गोव्यातील हिंदूवर पडला. त्यामुळे त्याचे जीवन बदलत गेले.

प्रवासात जे पाहिलं नि समजून घेतलं, त्यातलं जेवढं म्हणून आवडलं त्याची टिपणं करून घेतली. अन् त्यांची गोळाबेरीज करून संगतवार मांडली केली. म्हणून कोयनानगर ते गोवा लेखणीतून उतरले.

या ग्रंथाची निर्मिती करतेवेळी गोवा सरकारच्या पर्यटन खात्याची मदत घेतली. गोव्याच्या माजी मुख्यमंत्री सौ. शशिकला काकोडकर यांचं बहुमोल सहाय्य लाभलं.

त्याशिवाय गोव्याच्या ऐतिहासीक धार्मिक, सांस्कृतिक परंपरांबाबतच्या माहितीसाठी काही ग्रंथांचं वाचन करावं लागलं. नि प्रवासात काही व्यक्ती भेटल्या. जरूर त्यावेळी त्यांचं सहाय्य मिळालं. या कृतज्ञतेबद्दल त्या सर्वांचा कमी अधिक प्रमाणात मी ऋणी आहे.

१५ ऑगस्ट ८० **बजरंग शेलार**

विवेक,
उरूल, ता. पाटण,
जि. सातारा. (महाराष्ट्र)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२८
दा. क्र. २३६०५
अप्रवास दयानन्द

# 9

" बरं का हो ! " कपात चहा ओतीत सीता बोलली.

तिच्याकडे पहात मी उत्तरलो, " काय ?"

" आता मात्र आम्ही तुमची कोणतीच सबब ऐकून घेणार नाही. "

" म्हणजे ?"

सकाळचे सात वाजून गेलेत. स्नानादि नित्यक्रम आटोपल्यावर चहा घेण्यासाठी मी स्वयंपाकघरात उपस्थित झालो होतो.

आम्ही तुमची कोणतीच सबब ऐकून घेणार नाही. या विधानावरून तिला नक्की काय म्हणायचं होतं ते माझ्या लक्षात येईना, म्हणून उचललेला कप तोंडाकडे नेत तिच्याकडे पहात राहिलो. तेवढ्यात–

अवी म्हणाला, " येत्या हिवाळ्यात आपण महाबळेश्वरला जायचं असं ठरवलं होतं ?"

" अरे बाबा, " मी त्याच्याकडे पहात म्हणालो, " हिवाळ्यात फार थंडी असते तिथं. महाबळेश्वरला जायचं तर उन्हाळ्यात जाणं चांगलं गेल्या वर्षी आठवडाभर आपण तिथं थांबलो होतोच ना ? " मी श्वास घेतला.

" उन्हाळ्यात इथं थांबण्यापेक्षा चार आठ दिवस थंड हवेच्या ठिकाणी जाऊन थांबलं तर बिघडलं कुठं त्यात ? सीतेनं आपलं मत मांडलं.

" बिघडत नाही गं, पण– "

" पण काय ? "

" प्रश्न आहे तो पैशाचा ! "

" हॉटेलचं भाडंच ना ? "

" आणि रोजचा प्रवास, जेवण ? "

" रोजचं जेवण काय, इथं थांबलो तरी घ्यावंच लागत ना ! "

" घ्यावं लागत असलं तरी इथं रोख पैसे मोजावे लागत नाहीत. "

" अहो, पण पाचगणी, महाबळेश्वरासारख्या ठिकाणावरच्या थंड हवेच्या वातावरणानं मनोवृत्ती उत्तेजित होतात, हा का कमी फायदा आहे ? "

" म्हणजे तुम्ही फायद्यांच्या बाबींचा विचार करता अहात ! हरकत नाही. माणसानं फायद्याची अपेक्षा जरूर करावी पण प्राप्त होणाऱ्या फायद्यासाठी जास्त हानीचा तोटा सहन करावा लागणार असेल तर त्या फायद्याची अपेक्षा करणं चुकीचं ठरेल याची जाण ठेवायला हवी. "

अवी म्हणाला, ' पण तुम्हीहून कबूल केलं होतं. "

" काय ? "

"हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यात चार आठ दिवस कुठं तरी बाहेरच्या प्रवासास जायचं.

" होकारार्थी मान डोलावित मी म्हणालो, " होय. "

पावाचा तुकडा तोंडात सरकावित तो म्हणला, ' पण आमच्या शाळेला सुट्टी सुरू व्हायच्या आधीच तुम्ही लेखनाचं काम हाती घेतलं "

"अरे बाबा, लेखन केलं नाही तर वर्षाकाठी लेखनाचे पैसे मिळतात ते मिळणार नाहीत. "

' पण त्यामुळे महाबळेश्वराच्या सहलीला खो मिळाला. '

" होय " त्याचा दोषारोप मान्य करीत मी उद्गारलो, " असं झालं खरं ! "

,' म्हणूनच सांगते की यापुढे आम्ही तुमची कोणतीच सबब ऐकून घेणार नाही. "

सीतेच्या त्या विधानाचा रोख आता माझ्या लक्षात आला.

नोव्हेंबर उजाडायला पंधरा दिवसांचा अवधी होता. तरच आमच्या घरात दिवाळीतल्या प्रवासाच्या वाटाघाटी चालू झाल्या होत्या.

चहाचं भांडं मोरीत ठेवीत सीता म्हणाली, " गेल्या मे मध्ये तुम्ही हून कबूल केलंय. "

" काय ? "

" येत्या नोव्हेंबरात गोव्याला जायचं "

" होय '

' म्हणूनच सांगते आता गोव्याच्या प्रवासाचा कार्यक्रम रद्दीत केला तर आम्ही सत्याग्रह करू. '

' खरं आहे आईचं म्हणणं, मी पण तिच्या मताशी सहमत आहे" अवीनं आपलं मत स्पष्ट केलं.

कुठं का होईना पण प्रवासास जायचं

त्या मुद्यावर दोघाचं एकमत झालं नि मी मायनारिटीत गेलो. त्यामुळं त्या बाबतीत माघार घेण्याशिवाय मला गत्यंतर उरले नव्हते.

" बर, बर, कबूल " असं सांगून मी दोघांच्या त्या मताशी सहमत झालो.

शेजारी स्टोव्ह फरफरतोय.

पलिकडच्या खोलीतून रेडिओचा आवाज येतोय.

बाजूच्या खिडकीतून आत आलेली सूर्यकिरणं व्हरांडयात स्थिराव–लीत. बागेतली फुलझाडे वाऱ्याच्या झोतानं डुलताहेत.
कोयना नदीच्या पलिकडच्या टेकडीवरची सुरुची झाडं वाऱ्याच्या झोतानं डुलताहेत. समोरच्या रस्त्यावरून जाणाऱ्या जीपचा आवाज येतोय.

कपातल्या चहाचा आणखी एक घोट घेतला.

मन म्हणत होतं, दोघांच्याही आरोपात तथ्य आहे·

पाटणमध्ये होतो त्यावेळी दोन तीन वेळा आपण गोव्याच्या प्रवासा-संबंधीची आश्वासन दिली होती. कोयनानगरमध्ये बदलून आल्यावरसुध्दा दोनवेळा ठरवलेला बेत रद्द केला. त्यामुळे तो आजपर्यंत लांबणीवर पडला.

समोरच्या सुरूच्या झाडांकडं पाहात मी स्तब्ध झालो.

' का हो , कसला विचार करताय ? " सीतेनं विचारलं.

मी म्हणालो, ' कोयनानगरविषयी एक सुंदर विधान सुचलंय. "

" विधान ? "

"होय, कोयना प्रकल्पातील कर्मचाऱ्यांचं वसतिस्थान म्हणजेच कोयनानगर"

" वा वा अर्थपूर्ण विधान केलंत की । " समोरून आलेले पाटणकर उद्गारले

त्यांच्याकडे पहात मी बोललो, " या, या पाटणकर, "

' कप बशीत ठेवून उठलोन् बैठकीच्या खोलीत गेलो. समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवलं. म्हणालो, " बसा. "

खुर्चीवर टेकत पाटणकर म्हणाले,कुठं वापरणार आहात हे विधान? कोयनानगरविषयी बोलताना की कुणा प्रवाशांना कोयना प्रकल्पाची माहिती सांगताना ?"

" वक्तव्यात नाही, लेखनात ! "

" कुठं ? "

" कर्मचारीत "

" म्हणजे ?"

" कर्मचारी नावाच्या कथेत "

"बाकी शब्दांची चाळवाचाळव करुन नव्या नव्या विधानांची जडण घडण करायची, तर कधी अदल्या मधल्या शब्दांची काटछाट करुन विधानांची मोडतोड करायची, हा तुम्हा लेखक लोकांच्या हातचा खेळच आहे, नाही. ? "

"बरं, प्रवसाच्या कार्यक्रमाचं काय ? " दरवाज्यात उभ्या असलेल्या सीतेनं माझं लक्ष मूळ मुद्याकडे वळवलं.

" प्रवासाचा बेत आपण ठरवलाच आहे की. "

" ठरवलेल्या साऱ्या योजना शेवटास गेल्या का ? "

' बर, प्रवासाच्या कार्यक्रमाचा आराखडाच तयार करतो. '

' करतो नाही, आताच करा !'

"बरं तर" असं म्हणून मी उठलो. पाटणकरही उठले.

पंधरा मिनिटांनी मी परत स्वयपाकघरात आलो नि वेळापत्रक सीतेच्या स्वाधीन करून म्हणालो, 'हे बघ, या वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे चौदा नोव्हेंबर रोजी गोव्याच्या प्रवासास निघायचं आहे. तेव्हा तयारीत रहा असं सांगून मी बैठकीच्या खोलीत आलो.

रात्री वाचायला घेतलेली ययाति पुढे वाचावी म्हणून खुर्चीवर टेकलो न् टेबलावरची कादंबरी उघडली.

उघडलेल्या पानावर नजरा स्थिरावल्या.

क्षणाक्षणाच्या अंतराने त्या पुढे सरकत राहिल्या.

खोलीतल्या स्तब्धतेत घड्याळाची टिकटिक कानावर येत होती.

पन्नासेक पृष्ठे वाचून झाली असतील–

तेवढ्यात स्वयंपाक घरातून सीतेचा आवाज आला.

' अवी, त्यांना म्हणावं, जेवायला चला. '

आवाज कानावर येताच पुस्तकातली नजर उचलून मी घड्याळा–कडे पाहिलं

न कळत तोंडून शब्द उच्चारले.

" बाप रे, नऊ वाजून तीस मिनिटं, आता उरलेल्या अर्ध्या तासात जेवण आटोपून ऑफिस सापडणार का ? "

स्वतःशी पुटपुटत मी उठलो न् स्वयंपाक घरात गेलो.

अर्ध्या तासात जेवण आटोपलं.

हातावर पाणी घेऊन मी बैठकीच्या खोलीत आलो.

घाईघाईने अंगावर कोट चढवला.

कपाटातली पुस्तकं घेतली न् चपलात पाय सरकावून घराबाहेर पडलो.

# २

चौदा नोव्हेंबरचा दिवस.

गोव्याच्या प्रवासाचा पहिला दिवस.

पहाटे उठूनसुद्धा स्नानादी नित्यक्रम आटोपायला आठ वाजले. वीस दिवसापूर्वी ठरलेल्या वेळापत्रकातील वेळेप्रमाणे बरोवर नऊ वाजता आम्ही जी । वन् २/१ या आमच्या निवास्थानातून वाहेर पडलो.

खांद्याला एअर बॅग अडकवून अवी पुढे चालला नि आम्ही त्याचे मागून चालला.

उजव्या बाजूच्या बी बंगल्यांची ओळ जिथं संपली तिथं रस्त्यानं अर्धवर्तुळाकृती वळण घेतलं.

बस स्थानकावर लवकर पोहचता यावे म्हणून डांबरी रस्ता सोडून आम्ही पूर्वेकडे वळलेल्या पायवाटेला वळलो.

दगडी पायऱ्याने बांधून काढलेला तो रस्ता डगरीवरून उतरणीला लागला.

" किती जड लागते ग बॅग ? " एका हातातली सुटकेस दुसऱ्या हातात घेत मी म्हणालो.

" विमानाचा प्रवास नाही ना ? " सीता उत्तरली.

" अगं, विमानाचा प्रवास नसला म्हणून काय झालं " मी चिडक्या स्वरात म्हणालो, " प्रवासात जेवढं कमी सामान असेल तेवढा प्रवास सुखाचा होतो. "

" हो, ते का मला माहिती नाही ?"

" माहिती असतं तर असं का घडतं ? "

" अहो, तुम्हा दोघाचे चार चार ड्रेस नि माझ्या सहा साड्या. "

'सहा साड्या का ?" मी आश्चर्यचकित नजरेनं तिच्याकडे पहात उद्‌गारलो, " आणखी दोन घ्यायच्या ! कारण आपण फॉरेनच्या टूरवर निघालो आहोत ना ! "

पायऱ्याने बांधून काढलेला रस्ता संपला न् धरणाकडून आलेला रस्ता त्याला भेटला.

त्या रस्त्याने आम्ही चालत राहिलो.

प्राथमिक शाळा, भावे कँटिन, बाजारपेठ ओलांडून बस-स्थानकाच्या आवारात पोचताच पुणे–रत्नागिरी गाडी बस-स्थानकाच्या आवारात उभी असल्याचे दिसलं.

" राईट टाईमात आलो आपण अं " असे म्हणत मी गाडीत चढलो. ते दोघेही माझ्यामागे आले.

साडे नऊ वाजता गाडीने कोयनानगरचा बस स्थानक सोडला.

स्टँडचे आवार सोडताच तिच्या चालीचा वेग वाढला. गार्डन, सिनेमागृह, प्रकल्प कार्यालय, डाकघर या स्थलांना मागे भिरकावून तिनं पुढचं वळण ओलांडलं.

उजव्या बाजूच्या जी । वन् क्वार्टर्सच्या नि डाव्या बाजूच्या सी-क्वार्टसच्या इमारती हळू हळू पाठीमागे सरकत होत्या.

कोयनानगरची वसाहत सोडताच गाडीने एवढा वेग धारण केला की फक्त दहाच मिनिटात तिनं हेळवाकच्या सीमेत प्रवेश केला.

हिवाळी गारठा अंगाशी झोंबत होता.

हेळवाकची सीमा मागे टाकल्यावर चढणीचा रस्ता सुरु झाला. गाडीचा वेग मंदावला. " हा कुंभार्लीचा घाट बरं का !" मी म्हणालो.

इंजिनाच्या घरघरीचा आवाज वाढला.

गाडी सह्याद्रीचा घाट चढत होती. डाव्या बाजूच्या हिरव्या वनस्पतींनी आच्छादलेल्या टेकड्या मागे सरकत होत्या. काफना नदीचा प्रवाह दुडक्या चालीने वहात होता.

आठर्या तासात गाडीने सह्याद्रीचा घाटमाथा गाठला.

गाडी घाटाच्या माथ्यावर पोचताच समोरच्या दिशेला बोटाने दाखवीत मी म्हणालो, " तो पहा कोकणचा परिसर. "

" कोकण ही भगवान परशुरामाची भूमी परशुराम पृथ्वीतलावर अवतरले त्यावेळी त्या स्थळी समुद्र होता. "

' अरबी समुद्र का ? ' अवीने प्रश्न केला.

' होय, मी म्हणालो, ' भगवान परशुरामांचा पदस्पर्श होताच समुद्र मागे हटला अन त्या ठिकाणचे भूपृष्ट उघडे पडले तेच कोकण '

त्याच क्षणी दोघांच्या नजरा समोरच्या दिशेला वळल्या.

" आता आपल्या गाडीने रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश केला. "

तोल सांभाळत सांभाळत गाडी घाट उतरत होती.

दहा दहा मिनिटांच्या अंतरानं वळणं घेत होती.

वळणावर स्टिअरिंग फिरवताना ड्रायव्हरच्या अंगाचा वाळा होत होता. सावरून बसणाऱ्या प्रवाशांना गाडी हलवून सोडत होती.

डाव्या बाजूच्या दरीकडे पहात अवी म्हणाला, ' आण्णा '

" का रे ?"

दरीत डोकावत तो म्हणाला."

" दरी किती खोल आहे. नाही. ?"

" या दरीतून वशिष्टा नदी वहाते "

पलिकडच्या पठारावरुन टेकड्या खालच्या दरीत उतरल्या होत्या. झाडा झुडपांच्या हिरवळीने त्या झाकल्या होत्या.

"खोपोलीच्या घाटापेक्षा कुंभार्लीचा घाट मोठा आहे नाही का हो?" माझ्याकडे पहात सीता म्हणाली.

होकारार्थी मान डोलावीत मी म्हणालो, "होय पण चढण्या उतरण्याच्या दृष्टीने खोपोलीचा घाट कुंभार्लीच्या घाटापेक्षा आवघड आहे. त्याशिवाय खोपोलीच्या घाटात शिरण्याअगोदर खंडाळा व लोणावळा येथील निसर्ग प्रवाशांच्या मनाला मोहीत करतो. खोपोलीच्या घाटात उंच उंच झाडे आहेत तशी या घाटात नाहीत. '

'पूर्वी या घाटात खूप उंच उंच झाडं होती- पण मध्यंतरीच्या काळात त्यांची तूट झाली त्या कारणानं आज डोंगर उघडे बोडके दिसतात.'

"खरं आहे ' माझं मत मान्य करीत सीता म्हणाली. "अगदी एक दुसऱ्याला चिकटून, एक संपतं ना संपतं की दुसरं सुरु होतं. '

अवी बाजूच्या दरीत डोकावत होता

''खोपोलीच्या घाटाची वळणं जवळजवळ आहेत त्या शिवाय रस्त्याची चढण सरळ आहे. त्यामुळं त्या घाटातून गाडी चालवताना ड्रायव्हरला फारच दक्षतेने गाडी चालवावी लागते' मी दुसरा फरक सांगितला.

आम्ही ड्रायव्हरसाईडच्या बाकावर होतो

एक मोठं वळण घेऊन रस्ता उत्तरेकडे वळून पुन्हा पूर्वेस वळला.

जास्त उतार असल्याकारणानं गाडीचा वेग कमी झाला. डाव्या बाजूच्या दरांकडे बोटाने दाखवीत मी म्हणालो, " तिथं कोयना जलविद्युत गृह आहे. "

" पोफळीचं ?"

" होय. "

" आपण परवा पाहिलं होतं ते का. ? "

" होय तेच "

समोरच्या टेकड्या खालच्या दरीत उतरल्या होत्या त्या असंख्य झुडुपांनी झाकल्या होत्या.

गाडी अंग चोरून चालली होती. समोरून येणाऱ्या वाहनांना बगल देताना ती मंद गतीने चालत असे.

आमच्या पुढच्या बाकावर बसलेला मुलगा मागे वळून म्हणाला " कोयनाधरण सह्याद्रीच्या पूर्वेकडे असताना जलविद्युत गृह इकडे का ? '

मी म्हणालो, " कोयना धरणातल्या शिवसागरातले पाणी सह्याद्रीच्या बोगद्यातून इकडे आणले आहे " समोरच्या दिशेला बोट उभारून मी म्हणालो, " त्या समोरच्या कड्याच्या टोकावरच्या उंचीवरचे पाणी खालच्या दरीच्या तळापर्यंत येते '

तो ऐकत होता.

वीजनिर्मितीच्या माहितीचा जास्त तपशील सांगावा म्हणून मी म्हणालो, ' पाणी जितक्या जास्त उंचीवरून पडते तितका त्या पाण्याला जास्त वेग येतो. जास्त वेगाने धावणाऱ्या पाण्यापासून जास्त वीज निर्माण करता येते. म्हणून कोयना धरण सह्याद्रीच्या पलीकडे असलं तरी जल विद्युत गृह इकडे घेतले आहे. '

सह्याद्रीची उतरण उतरल्यावर गाडी थांबली.

" कोणता गाव हा ? " खिडकीतून बाहेर पहात त्या मुलाने विचारले.

'' पोफळी " मी म्हणालो.

" कोयना योजनेच्या दुसऱ्या टप्याचं काम इथं चाललं आहे "

" कोयना योजनेच्या इंजिनिअरिंग खात्यानं या नगराची रचना केली आहे .'

दरीच्या दोन्ही बाजूंच्या टेकड्यावर छोट्या छोट्या सिमेंटच्या पत्र्याच्या इमारती उभ्या होत्या. सागाचे उंच उंच वृक्ष अवती भोवती उभे होते. डगरीच्या उतारावरून नागमोडी वळणं घेत घेत डांबरी रस्ते डोंगराच्या पायथ्याच्या रस्त्यापर्यंत उतरलेत.

पोफळीचं बस स्थानक सोडल्यावर गाडी पश्चिमाभिमुख झाली.

डाव्या बाजूच्या डोंगर टेकड्या पायथ्याच्या रस्त्यापर्यंत खाली उत-रत एकमेकींना चिकटून उभ्या होत्या. नि उजव्या बाजूची वशिष्टा हसत खिदळत धावत होती. अन् गाडीबरोबर धावत होती.

बाजूच्या खाचरातली भाताची हिरवी रोपं वाऱ्याच्या झुळकेनं डुलत होती.

उतरणीचा रस्ता संपल्यावर ड्रायव्हरने गिअर बदलला व गाडीचा वेग वाढवला अर्ध्या तासात तिनं चिपळूणचा चिंचनाका गाठला.

तुटक तुटक अंतरानं वसलेली चिपळुणातली कौलारू घरं हळूहळू मागे सरकत होती.

आंब्या फणसांच्या झाडांच्या सावलीतून गेलेल्या रस्त्यावरून गाडी धावत होती.

गाडी बस स्थानकावर पोचली त्यावेळीं आकरा वाजले होते.

" उकडतंय किती हो आण्णा ? " तोंडावरचा घाम पुशीत अवी उद्गारला.

" कोकणात हवा दमट असते, असं पुस्तकात वाचलं आहेस ना तू?"

" म्हणजे ? " अवी मजकडे पहात उद्गारला, " हे कोकण आहे?"

" मग ? तुला काय वाटलं ? अरे, आपली गाडी पोफळीत आली त्याच वेळी आपण कोकणात आलो. '

चिपळूणचा निरोप घेतल्यावर आमची गाडी मुंबई गोवा मार्गावरून धावू लागली.

सह्याद्रीच्या कडेकपारीतून जाणारा हा मार्ग 'मुंबई बंगलोर' मार्गा-पेक्षा फारच लहान. एकेरी वहातुकीचा, त्यामुळे पुढून आलेल्या वहानाला बगल देवून जाणे अवघड जात होतं.

सावर्डे मागे टाकल्यावर कधी घनदाट जगलं तर कधी एकमेकोंच्या आड येणाऱ्या डोंगर टेकडया नजरेपुढं धावत यायच्या नि लगेच पाठीमागे सरकायच्या.

डाव्या बाजूला सह्याद्रीचे उंच कडे, बोट ठेवायला जागा मिळणार नाही इतक्या दाटीने उभे असलेले वृक्ष, झाडाझुडुपांनी झाकलेली भूमी.

कडयाला घासून खाली उतरलेल्या वळणावळणाच्या रस्त्यावरून गाडी हळू हळू उतरत होती.

बाजूच्या कडयावरून खाली उतरलेल्या लाल रंगाच्या पाऊल वाटेनं चार पाच बायका खाली उतरत होत्या. त्यांच्या डोक्यावर गवताचे भारे होते.

शेजारच्या बाकावरच्या माणसाकडे पहात मी म्हणालो, " कोक-णातल्या माणसाचं जीवन फार हलाकीचं नाही ?"

तो म्हणाला, " कोकणातला माणूस मुळचाच दरिद्री सामान्य शेतकऱ्याला चार दोन खाचरं असली म्हणून कायरं झाल ? त्यात काय पिकणार? दोन खंडया भात नाहीतर एखादी दुसरी खडी नागळी त्यातला तिसरा हिस्सा फाळा भरला म्हणजे काय उरणार ! "

'कुनबी मरमरेतो कष्ट करतो, रात्रंदिवस शेतात खपतो पण पदरात काय पडते ? "

आम्ही बोलत होतो,

गाडी थांबली तशी आमची बातचीत थांबली.

नजर समोरच्या दिशेस गेली.

एक मालवाहू गाडी बंद पडली होती. ॲक्सिडेंट झाला आहे की काय ? अशी शंका मनात उभी राहिली. तेवढ्यात तिच्या पाठीमागून रस्त्यात आलेली दुसरी मालवाहू गाडी उरलेल्या रस्त्यात तिला बिलगून उभी राहिली त्यामुळे सारा रस्ताच आडवला गेला.

" पद्धतीला धरून गाडी उभी केली आहे का ? " आमच्या गाडीचा चालक रस्त्यात उभ्या असलेल्या गाडीच्या केबीनमधील ड्रायव्हरला म्हणाला, " हीच का तुमची पद्धत? गाडया कुठंही उभ्या रहावयाची ? '

" तुम्ही मागे थांबला असता तर ?" समोरच्या गाडीच्या ड्रायव्हरने सवाल केला.

" तुमची साईड आहे का ? " आमच्या ड्रायव्हरने क्रॉस घेतला.

तेवढयात ड्रायव्हरशेजारचा माणूस म्हणाला, " जाऊ दे रे ! त्यांची टाईमिंगची गाडी आहे "

जवळ जवळ सारेच प्रवाशी उठून बघत राहिले.

ते दोघेही हमरीतुमरीवर आले. " तू पुढं आलास ! की मी ?"

आता गाडी मागे घे या मुद्यावर दोघेही एकमेकांना सांगत राहिले.

अर्धा तास संपला तरी गाडी मागे घेण्यासाठी कुणीच तयारी दर्शविना.

आर्धा तास झाला दोघांच्या वादात. एक प्रवासी म्हणाला, " अरे बाबानो, निष्कारण वादात वेळ दवडून साऱ्या प्रवाशाची खोटी का करता?

मालवाहू गाडी चालकाने गाडी मागे घेतली न् मग आमची गाडी चालू झाली.

गाडी निघून गेल्यावर ड्रायव्हर प्रवाशाकडे पहात म्हणाला, ' बेफिकीरीनं वागतात हे ट्रकचे ड्रायव्हर ! '

गाडीने शास्त्री पूल ओलांडला.

" हे संगमेश्वर बर का! " अविनाशला डिवचून मी म्हणालो, औरंगजेब बादशहाने संभाजी महाराजाना पकडलं होतं ते इथंच !"

" हो का ?।" अविनाश उद्गारला.

नजरेपुढं उतरत्या छपरांची कौलारू घरं होती. आवती भोवती साठ सत्तर फूट उंचीची सागाची झाडं दाटीने उभी होती. डाव्या बाजूला सह्याद्रीचा उंच कडा.

पलिकडे शास्त्री संथपणे वहात होती.

गाडीने वळण घेताच नदीचा जलाशय नजरेपुढे आला तसा अवी म्हणाला, " आण्णा, संगम ! कराडच्या कृष्णाकोयनेच्या संगमासारखा. "

" संगमावर दोन्ही नद्यांचा काटकोन झाला आहे. " मी म्हणालो. एका बाजूला टेकडी, एका बाजूला शास्त्री नदी नि एका बाजूला बसना नदी अशा त्रिकोणाकृती जागेच्या उतारावर संगमेश्वराची वस्ती विसावली आहे उंच उंच झाडांच्या दाटीतून वळणा वळणाचे रस्ते नदीत उतरलेत. एखादी दुसरी होडी जलाशयातून पैलतीराकडे चालली आहे. दोन्ही बाजूनी नदीत उतरलेला डोंगर टेकड्यांच्या मधल्या चिमट्यात स्थिरावलेला संगमेश्वर गाव खाडीच्या काठावरच्या गांवासारखा दिसतो दोन्ही बाजूनी दोन नद्या असल्या कारणाने तो जलनगरासारखा दिसतो.

गाडी पाच मिनिटं थांबेल. असं सांगून वाहक गाडीबाहेर पडला.

आम्ही घाईघाईने उतरलो न् बस स्थानकातल्या हॉटेलात शिरलो.

चहा पिऊन झाला नाही तोच घंटीचा आवाज कानावर आला तशी माझी नजर गाडीकडे वळली. हॉटेलसमोर उभा असलेला ड्रायव्हर केबीन-मध्ये चढलेला पहाताच ' चला ' असं म्हणत मी उठलो तिघेही उपहार-गृहातून बाहेर पडलो न् गाडीत चढलो.

चावी ओढून ड्राव्हरनं इंजिन चालू केलं, दमून आलेल्या कुत्र्याने धापा टाकाव्यात तशी गाडी आवाज देत होती.

घरघरीचा आवाज देऊन गाडी शेडच्या बाहेर पडली.

संगमेश्वरातून काढता पाय घेताच तिनं पश्चिमेला वळण घेतलं टेकडीला वळसा देऊन ती पुढे सराळली.

उजव्या बाजूने शास्त्री नदी गाडीबरोबर धावत होती.

मी रत्नभूमीचा अंक डोळ्यापुढे धरला.

मोठ्या अक्षरांच्या शब्दावरून नजर पुढे सरकत राहिली. पान उलटले. रत्नागिरी बंदराच्या विकासाची योजना या नावाचा अग्रलेख होता. तिथं नजर स्थिर झाली.

एका एकी गाडीनं वळण घेतलं, माझा तोल झुकला. तशी वर्तमान-पत्रातल्या शब्दांवरची नजर हलली.

तोल सावरीत मी बाहेर पाहिलं.

रस्ता शास्त्री नदीपासून अलग झाला होता.

संगमेश्वर सोडून अर्धा तास झाला होता.

नदीला बिलगून चाललेल्या रस्त्यांने गाडी धावत होती.

डाव्या बाजूच्या उंच उंच टेकड्या हळू हळू मागे सरकत होत्या. त्यांच्या पाठीमागच्या बाजूस उभ्या असलेल्या डोंगरावरून खाली उतर-लेल्या वळणावळणाच्या वाटेवरून चार पाच बायका खाली उतरत होत्या त्यांच्या डोक्यावर लाकडांचे भारे होते,

शेजारच्या माणसाकडे पहात मी म्हणालो, " कोकणातल्या माणसाचं जीवन फार कष्टाचं नाही का हो ?

धोतराच्या टोकाने चष्म्याची काच पुसत ते गृहस्थ म्हणाले, "कोक-णातला पन्नास टक्के समाज मुंबईवर अवलंबून आहे. "

" म्हणजे ? "

" म्हणजे, कोकणातल्या प्रत्येक गावातली पन्नास टक्क्याहून अधिक माणसं मुंबईला जाऊन राहिलीत. कुठले ना कुठले काम करून ती तिथं पैसे कमवतात नि त्यावर इथल्या माणसाचं जीवन चाललेलं असतंय. ब्राम्हण समाजातली शिकलेली माणसं मोठमोठ्या हुदयावर नोकरी करतात नि बाकीची, कुठंतरी मोलमजुरी करून जीवन जगत असतात. "

डोक्याबरची काळी टोपी उचलून हातरुमालाने तोंडावरचा घाम पुसत ते म्हणाले, उरलेला पन्नास टक्के समाज कोकणात आहे. त्यात ब्राम्हण मराठा, कुणबी, मुस्लीम, भंडारी, कोळी अशा विविध जातीचे लोक आहेत

ब्राम्हण धार्मिक कृत्ये करतात. सुशिक्षित लोक नोकरी करून जीवन जगत असतात खोत हा घरंदाज मराठा स्वाभिमानी स्वभावाचा. इतर समाजाकडून त्याला गावात आदराची वागणूक मिळते. शेतीतील उत्पन्नावर तो आपले जीवन जगत असतो, सागरकिनाऱ्यावरील लोक नारळ सुपारी पिकवून त्यावर आपल्या कुटुंबियांची उपजीविका करीत असतात. मराठा आपल्या चार, सहा एकराच्या शेतीत कुठे भात, कुठे वरी, तरी कुठे नागली पिकवून आपलं जीवन जगत असतो. भंडारी हा कोकणातला मागासलेला समाज. हा समाज धनिकांच्या घरी लहान मोठी कामे करून किंवा कुठं मोलमजुरी करून आपलं जीवन जगत असतो.

" अहोरात्र सागर किनाऱ्यावर राहून जीवन जगणारा कोळी नावाचा समाजही कोकणात कमी नाही. तो आपल्या होडीबरोबर रात्रं-दिन समुद्रात भटकतो, नि सापडलेली मासळी वाळवून राखून विकतो आणि त्यावर आपल्या कुटुंबाचे जीवन चालवीत असतो. "

गाडीने वळण घेतलं तशी माझी नजर बाहेरच्या दिशेस गेली-

समोर मोठी टेकडी होती. तिच्या पायथ्याला मंगलोरी कौलांच्या छपरांची पाच सहा घरे होती. आवतीभोवती माडाची पोफळीची झाडे डुलत होती.

गाडी थांबताच - मा, आव जलदी, असा आवाज कानावर आला तशी नजर दरवाजाकडे वळली.

नऊ दहा वर्षाचा एक मुलगा दरवाजातून आत आला. गोऱ्या कांतीच्या ह्या मुलाच्या अंगावर काळ्या रंगाचा मॅनिला नि काळया रंगाची हाप पॅंट होती

त्याच्या अंगावरील वेशावरून प्रथमक्षणी मला वाटलं, तो ब्राह्मण कुटुंबातला असावा.

तीन बाके ओलांडून तो पुढे गेला न् मागे वळून बोलला. " मा, आव इधर. आगे बहोत खाली जगह है।"

त्याच्या तोंडची ती उर्दूमिश्रित हिंदी भाषा ऐकताच माझं मन म्हणालं, ' हा मुस्लीम कुटुंबातला तर नसेल ना ? '

तेवढ्यात त्याचे मागून एक तरुणी ओढणी सावरीत गेली, नि त्याचे शेजारी बसली. त्यावेळी माझी खात्री झाली की तो मुस्लीम कुटुंबातला असावा.

' आण्णा ' अविनाश म्हणाला ' इकडं जोंधळा, ऊस ही पिकं दिसत नाहीत. '

मी म्हणालो, " कोकण हा सह्याद्रीच्या पट्टयात आहे. म्हणजे सगळा भूप्रदेश खडकाळ आहे जास्तीत जास्त जमीन खडकाळ त्यामुळे इकडे शेत-जमिन जास्त दिसत नाहीत. नदीच्या किनाऱ्याने जी थोडी शेती दिसते तेवढ्याच शेतीत भात, वरी, नाचणी, वाल, पावटे अशी पिके इकडचा शेतकरी पिकवितो. सागर किनाऱ्यावरील जमिनीत नारळ, सुपारी पिकते, मीठ उत्पादन करता येते."

आमच्या पुढील बाकावर एक मुलगा होता तो मासिक वाचत होता त्याला मी विचारले, ' कुठला रे तू ?'

' वेंगर्ल्याच्या खाडीत माझा गाव आहे '

' आता कोठून आलास ? ;

' चिपळूणहून. '

' काय शिकतोस ? ,

' मैंने बहोत कम शिक्षा प्राप्त की है । '

' क्यों ? '

' क्या करेगा भाई । हमेशा गावसे दूर रहना पडता है । '

' हमेशा कहा रहाता है ? '

' बंबई में । '

' वहाँ क्या करता है ? ,

' नौकरी '

' कहाँ '

' बंदरमें '

" तेरे घरमें कौन कौन है ? "

" माँ, बाप, दो भाई, और एक बहन। "

" वे सब किधर रहते है ? "

" ओ सब मांखजनमें रहते हैं। हमारे लोग हमेशा समुद्रके किनारे रहते है। निकट रहनेसेही हमे खाना मिलता है।'

' खाना ! ' मी त्यांच्याकडे पहात राहिलो.

' मछली से ही हमारा जीवन चलता है।'

" बरसातके दिन कैसा चलता है। "

" बरसातके दिन हम कपडे का छाता बनाकर होडीपर बांधेते है और समुद्र मे घुमते है।"

" प्राप्त की हुअी मचली तुम कहाँ भेजते है ? "

' रत्नागिरी, मुंबई. कई मच्छली हम विदेशमेही भेज देते है। मेरा एक भाई विदेशमे है '

" क्यो ? "

" धंदेका ज्ञान प्राप्त करनेके लिए उधर गया है। वापस आनेके बाद हम एक लाँच खरिदेंगे और बहोत मछली विदेश भेज देंगे. अेसा हमारे बडे भाईका इराधा है। "

' आपके पिताजी क्या करते है ?'

' नही. हमारे पिताजी अल्लाके घर गये ' त्याच्या डोळयातून पाणी गळू लागले.

" कब ? "

' पाच बरस हो गये, अंग्रेजोके जहाँज से वे लंडन जा रहे थे। सागर मे जहाँज पहूंचने वक्त तुफान हुआ. '

" आँ ? "

" उसने जहाँज को घेर लिया बादमे गिरगिरके जहाज डूब गया. "

" मी म्हणालो" विष्णूशास्त्री चिपळूणकर चिपळूणमध्येच जन्मले होते '

" कोण विष्णू शास्त्री चिपळूणकर ? अबीने प्रश्न केला. ? "

" मराठीचे शिवाजी म्हणत त्याना. शिवाजी महाराजांना हिंदु धर्मीयांबद्दल जसा अभिमान होता. तसा चिपळूणकरांना मराठी भाषेविषयी होता. मराठी भाषेविषयी कुणी गैर बोलला तर ते जळफळत उठत. केसरी वर्तमान पत्रातून ते लेख लिहीत होते.'

" म्हणजे, लेखक होते ते ? "

" होय. "

आम्हाला रत्नागिरीला घेऊन जाणारी गाडी, ज्या मार्गावरून धावत होती, तो मार्ग आता छाती काढून चालता होता. साऱ्या डोंगर टेकड्यांना त्यानं पोटाखाली घेतलं होतं. त्यामुळे क्षितिजाची रेषा आता लांब गेली होती. डाव्या बाजूच्या दरीतल्या कुळागरातल्या पोफळी आपला दिमाख मिरवत होत्या.

रस्ता घाटमाथ्यावर चढत होता. त्यामुळे प्रवाशांचं लक्ष वेधून घेणाऱ्या खोल खोल दऱ्या नि गगनचुंबी वृक्ष आता दिसत नव्हते. उघडा माळ नि काजूची झाडं '

मी सूटकेस उघडली न् तिच्यातलं पुस्तक घेऊन उघडलं.

गाडी थांबल्याची जाणीव होताच पुस्तकातली नजर उचलून मी बाहेर पाहिलं.

गाडी रत्नागिरीच्या शिवाजीनगर नाक्यावर उभी असल्याचं जाणवलं.

" रत्नागिरी हे लोकमान्य टिळकांचं जन्मस्थान बरं कां. " अवीकडे पहात मी बोललो.

' लोकमान्य टिळक ? स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असं म्हणाले होते, ते का टिळक ? '

' होय तेच '

' लोकमान्य टिळकांचा गांव रत्नागिरी ? '

' होय '

' म्हणजे टिळक रत्नागिरीचे ? '

'होय,' मी म्हणालो, 'ते जन्मले तेव्हा रत्नागिरीचे, शिक्षण घेत होते तेव्हा पुण्याचे, स्वातंत्र्यवीर सावरकर पण इथंच जन्मले.

एवढे संभाषण होते ना होते तोवर गाडीने रत्नागिरीचा एस. टी. स्टँड गाठला.

अर्ध्या तासात मालवणला जाणारी गाडी आहे असं समजलं, म्हणून गावात न जाता बसस्थानकातल्या उपहारगृहातच जेवण घेतलं नि फलाट-वर येऊन दाखल झालो.

'अहो शेलार' असा आवाज कानावर येताच माझी नजर समोरच्या फलाटाकडे वळली.

समोरून देसाई येत होते. त्यांच्याकडे पहात सीता म्हणालो, 'कोण हे?

मी म्हणालो, 'अ. आ. देसाई, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष '

' कुणीकडे चालला आहात ? ' समोरून आलेल्या देसाईंनी मला विचारलं.

मी म्हणालो, ' गोव्याला '

' का ? '

'गोव्याच्या प्रवासावर लिहितोय ! '

' अं ? ' आश्चर्यचकित नजरेनं देसाई म्हणाले, ' म्हणजे प्रवासाच्या प्रांताकडे वळलात म्हणायचं. '

' होय, माणसाला जीवनात जसा बदल हवा असतोय, तसा लेख-काला पण लेखनाच्या वेग वेगळ्या प्रवाहातून जाताना एक वेगळाच आनंद लाभतो. '

' खरं आहे. काका कालेलकरसुद्धा पुढे पुढे वेगळ्या दिशेनं लिहू लागले होते. कालेलकरच काय पण प्रवासवर्णन लिहिणारे अनंत काणेकर सुद्धा वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारात लिहीत होतेच की. '

' नाही, नाही, मला म्हणायचं होतं कथा लिहिणारा लेखक प्रवासा-सारख्या वेगळ्या प्रकारावर लिहितो का ? '

' होय, काही लेखक लिहू शकतात. उदाहरणेच सांगायची झाली तर नाटक कादंबरी लिहिणारे पु. ल. देशपांडे, कथेच्या प्रांतातले. गंगाधर

गाडगीळ, कमला फडके, माधव गडकरी या लेखकांनी प्रवासावर लिहि-लंच ना ?कमी लिहिलं असलं तरी लिहिलंच की?' त्याचप्रमाणे प्रवासावर लिहिणारे पंडीत महादेवशास्त्री जोशी इतर वाङ्मय प्रकारात लिहितातच.

'होय.'

'मग बजरंग शेलार प्रवासावर लिहिताहेत यात आश्चर्य ते कसलं?'

विषय बदलीत देसाई म्हणाले, 'आनंदाची बातमी समजली का ?'

'कसली ?'

'ग. रा. शिद्यांना राज्यपुरस्कार मिळाला.'

'होय का ? चांगली बातमी सांगितलीत. आता ग. रा. शिद्यांचे अभिनंदन करायला हवे.'

तेवढ्यात मालवणला जाणारी गाडी फ्लाटावर आली. देसाईंचा निरोप घेऊन आम्ही गाडीचा आसरा घेतला.

रत्नागिरी सोडून अर्धा तास झाला होता. गाडी वेगाने धावत होती. दहा पंधरा फूट उंचीची काजूची झाडं एकमेकांना खेटून उभी होती. त्यानी आपल्या आडव्या तिडव्या पसरलेल्या फांद्या वाटेल तिकडे वाकविल्या होत्या. त्यामुळे एकमेकींचे हात धरून ती उभी आहेत असं वाटत होतं.

बाजूच्या बाकावरचा माणूस म्हणाला, 'तुम्ही गोव्याच्या प्रवासावर पुस्तक लिहिताय ?'

'का ?' मी त्यांच्याकडे पहात उद्गारलो.

'रत्नागिरीच्या स्टँडवर तुम्ही बोलत होता.'

'होय,' त्याच्या ओळखीचा शोध घ्यावा म्हणून मी म्हणालो, 'आपण कुठले ?'

'मी गोव्यातलाच आहे.'

'असं काय ?' असं उद्गारत मी म्हणालो, 'होय मी गोव्याच्या सांस्कृतिक जीवनावर लिहिताय !'

'नाव काय पुस्तकाचं ?'

'कोयनानगर ते गोवा, नावातली आयडिया आपणाला विशेष वाटली ?'

'बॉंबे टू गोवा हे पिक्चर आपण पाहिलं होतं का ?'

'होय.'

'त्याच्या कथा कल्पनेत मात्र आपणास काहीच वाटत नाही.'

'खरं आहे. लव्ह इन् बॉंबे या चित्रपटाच्या शुटिंगसाठी निघालेल्या फिल्म कंपनीच्या लोकांना घेऊन जाणारी बॉंबे टू गोवा ही बस मुंबईहून निघते नि चोवीस तासात गोव्यात पोहचते. येवढीच मध्यवर्ती कल्पना आहे त्या पिक्चरची'

'उपकथानकात सुद्धा विशेष असा दम नाही.' मी म्हणालो. 'विनोदी पिक्चर येवढ्या बाबतीत त्याचं मूल्यमापन करता येईल.'

'आपलं नाव ?'

'बजरंग शेलार.'

'हं' आठवल्यासारखं करीत तो म्हणाला.

'आपलं नाव मी रेडिओवर एकलं आहे. रेडिओसाठी आपण लिहिता काय ?'

'होय आकाशवाणीच्या पुणे केन्द्रावर लिहितो कधी कधी'.

'रत्नागिरीच्या विभागातल्या शेतकऱ्याच्या जीवनावरचा कार्यक्रम मी ऐकला होता.'

'होय, महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या डायरीचे एक सदर मी चालवीत होतो. ग्रामीण विभागाद्वारे वर्षभर चालणाऱ्या त्या कार्यक्रमाचे लेखन मला करावे लागत होते. रत्नागिरी विभागात नारळ, सुपारी पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या दैनंदिन हालचालींचं दर्शन घडविणारा कार्यक्रम होता.'

'बरं, कसा वाटला तो कार्यक्रम ?'

'चांगला होता की.'

# ३

दिवसभराच्या प्रवासाने आलेला थकवा नाहीसा करावा या हेतूने निवासस्थानी पोहचताच मी स्नानाचा उपक्रम आरंभला.

साबणानं अंग धुवून झालं होतं नि ओलं अंग सुकं करण्याच्या उद्योगाला प्रारंभ केला होता. तेवढ्यात बेडरूममधून सीतेचा आवाज आला,

' अहो ? '

तो आवाज कानावर येताच अंग पुसण्यात गुंतलेले दोन्हीही हात जैसेथेच्या स्थितीत थांबले. पाठीवरुन फिरत असलेला टॉवेल पण थांबला न् अंगाशी बिलगला.

' काय गं ? ' दरवाजाकडे पाहात मी बोललो.

' म्हटलं चहा आणलाय ? ' बेडरूममधून आवाज आला.

चहाचं नाव ऐकताच माझा चेहरा हास्यानं फुलला. वीज चमकून जावी तशी उत्साहाची एक झलक माझ्या सर्वांगातून चमकून गेली आणि-

' हो का ? ' असा उच्चार करून पाठीवर स्थिरावलेल्या टावेलाला मी हिसडा दिला, लगेच दुसऱ्या हातानं त्याला विरुद्ध बाजूला खेचला.

मागावरचं कापड जेवढ्या गतीने मागावरून फिरावं तेवढ्या गतीनं तो पाठीवरून फिरत राहिला.

पाचच मिनिटात अंग पुसण्याचं काम आटोपलं. मी स्नानगृहातून बाहेर पडलो न् अंगावर कपडे चढवून बैठकीच्या खोलीत गेलो.

तिथलं वातावरण मघापेक्षा आगळं दिसलं.

ज्यांचा मघाशी थांगपत्ता नव्हता त्या वायुलहरी आता समोरच्या आवारांत उपस्थित झाल्या होत्या नि झाडा झुडुपाना धडका देत होत्या. तेवढ्यावर त्या थांबत नव्हत्या तर खिडकीच्या गजाच्या फटीतून आत घुसू पहात होत्या. त्यामुळे खिडकीचा पडदा खिडकीवर उड्या घेत होता.

कोचावर टेकताच टी पॉयवरच्या ट्रेमधला चहाचा कप उचलीत मी बोललो, ' तुम्ही घेतला ? '

' होय ? '

' मग काय ?' मनाचा उत्साह दुपटीने वाढला.

चहाचा दुसरा घोट घशाखाली लोटत मी म्हणालो, ' मालवण गांव तसा फारसा मोठा नाही का ग ? '

चेहऱ्यावरचे भाव बदलीत ती उत्तरली, ' आपल्या साताऱ्यापेक्षा फारच लहान ? '

कपडे बदलीत असलेला अविनाश शर्टाची बटनं लावत म्हणाला, " सुधारणांच्या दृष्टिकोनातून नंबर लावायचा म्हटलं, तर तुमच्या मालवणचा नंबर आमच्या कराडच्या लांब खाली जाईल. '

जेवण घ्यावं म्हणून आम्ही एका उपहारगृहात गेलो.

फॅमिलीरूम मधल्या माणसांना एकमेकांशी बोलतांना पूर्ण मोकळीक मिळते.

चूळ भरून हात कोरडे करीत आम्ही खुर्चीवर टेकलो. तेवढ्यात समोरून एक मुलगा आला.

त्याच्याकडं पहात मी बोललो, ' शाकाहारी तीन. '

तो मागे वळला.

मजकडं पहात सीता म्हणाली, ' दामुआण्णा मालवणकर, इथलेच काहो ?'

' हो इथलेच. '

' दामुआण्णा मालवणकर कोण ? ' अवीनं तपशील विचारला.

' मराठी चित्रपट सृष्टीतला प्रसिद्ध नट. '

' विनोदी स्वभावामुळे केवढी प्रसिद्धी लाभली. नाही काहो ?' सीता उद्गारली.

' दामूआण्णांचा नुसता स्वभावच विनोदी नव्हता तर त्यांना लाभलेलं शरीर, बोलताना चेहऱ्यावर निर्माण होणारे विनोद, असे अनेक गुण लाभल्यामुळे दामूआण्णा प्रसिद्धीच्या शिखरावर पोचू शकले. '

मुलगा तीन ताटं घेऊन आला नि आमच्या पुढे ठेवून निघून गेला.

ताटातील भाताच्या ढिगाकडे पहात अवी म्हणाला, 'नुसता भातंच?'

' होय, कोकणात भात न् माशाच्या आमटीवरच भूक भागवावी लागते. पोळी भाकरी मागूनही मिळणार नाही. '

भातात आमटी ओतून घेऊन भात कालवीत मी म्हणालो, ' तोंडी लावायला वालाची उसळ आहे ना ? '

' वाटीत काय आहे हो आण्णा ?

' सार ' असं म्हणीत मी वाटी उचलली न् तोंडाला लावली. अवीने साराचा एक घोट घेतला

' सिधूदुर्ग किल्ला केवढा भक्कम नाही काहो ? सीता मजकडे पहात म्हणाली

' सिधू दुर्ग म्हणजे आरमाराचे प्रमुख केंद्र साऱ्या कोकण किनाऱ्यावर देखभाल करता यावी म्हणून शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला. '

' किल्ल्याची बांधणी सुद्धा केवढी भक्कम !'

' समुद्राच्या काठावरचे किल्ले तेवढया मजबुतीनेच बांधायला हवेत. अहोरात्र लाटांचे तडाखे सहन करुन घ्यावे लागतात '

' आटोपलं का ' असं म्हणत मी उठलो, अवीपण उठला. न् हात धुवायला गेला.

जेवणाचे पैसे देताना गल्लेवाल्याकडं पहात मी म्हणालो, 'मुंबईहून येणाऱ्या बोटीला अजून किती अवकाश आहे ? '

' अजून एक तास अवकाश आहे. तुम्ही कुठं जाणार आहात ?'

' पणजीला. '

' गोवा पहायला ?'

' होय, फार लांब लांबची माणसं जातात. गोव्याला. '

मी म्हणालो, 'गोव्याला नैसर्गिक सौंदर्य भरपूर लाभलं आहे. पाण्याच्या मुबलकतेमुळे गोव्यातली काही गावं जलनगरासारखी वाटतात. नारळी

पोफळीच्या बागा, हिरव्या झाडा झुडुपांनी झाकलेली भूमी नि नद्यचयानि समुद्राच्या पाण्याच्या हालचाली, त्यामुळे माणसांची मनं हर्पून जातात काश्मीरच्या जलनगराची आठवण येते. '

' म्हणून परदेशी पर्यटकांची पण गोव्याकडं ओढ असते.

' अप्रतिम असं नैसर्गिक सौंदर्य लाभल्यामुळे गोव्याचं महत्त्व वाढलं ' लव इन बाँम्बे ' या चित्रपटाच्या निर्मात्यानेसुद्धा कथानकात सर्व गोव्याच्याच स्थळांची नियुक्ती केली. मराठीतले अग्रेसर कादंबरीकार ना. सी. फडके यांनी सुद्धा आपल्या कादंबऱ्यात गोव्यातली सौंदर्यस्थळे दृष्टीपुढे घेतली आहेत.'

हाँटेलच्या मालकाकडे पहात मी म्हणालो, ' जागा सोडतोय '

' अहो ' घड्याळाकडे पहात सीता बोलली, 'किती वाजले पाहिलंत'

तशी माझी नजर घड्याळावर स्थिर झाली.

' दहा वाजून पांच मिनटं ? '

' मग कसली बोट सापडतेय ? ' सीता उद्‌गारली.

' बोट सापडेल गं ' कोचावर टेकत मी म्हणालो ' ' बोट ठरलेल्या वेळी येतेच असं नाही, कधी कधी ती १०-२० मिनटं उशिराहीं येते. तशी ती आज उशिरा आली तर नक्कीच सापडेल ? '

' हो, पण ती उशिरा आली तर ना ? '

' बरं, मी लाँचचे भाडे भागवून येतो, तोवर तुम्ही सामानाची आवराआवर करा '

असं, सांगुन मी उठलो न् खोलीबाहेर पडलो,

जिन्याच्या दोनच पायऱ्या उतरल्या असतील तेवढयात अवीची हाक आली ' आण्णा '

पाठीमागे वळून मी विचारलं, ' का? '

' काल लाँड्रीत धुलाईला दिलेले कपडे आणले का ? '

' अरे- हो ! बरी आठवण केलीस ! '

मी जिना चढून वर गेलो बॅगेतली कपड्यांची रिसीट घेतली. ती रिसीट आणि दहा रुपयाची नोट त्याच्याकडे देत म्हणालो ‘ तेवढे कपडे घेऊन ये ’

असं सांगून मी पाठीमागे वळलो न् जिना उतरू लागलो.

दोन पायऱ्या उतरल्यावर दचकलो. पाठीमागे वळलो न् म्हणालो, ,अन् हे बघ ’ सीताला म्हणावं. गच्चीत वाळत टाकलेले कपडे बॅगेत भर, नाही तर गोव्यात पोहोचल्यावर म्हणशील, अहो, लॉजच्या गच्चीत वाळत टाकलेले कपडे मालवणातच राहिले की !’

असं सांगून मी पाठीमागं वळलो न् जिना उतरू लागलो.

जिन्याच्या शेवटच्या पायरीवर पोचतोना पोचतो तोच–

सीतेचा आवाज, ‘ वरं काहो ? ’

गच्चीकडे पहात मी वोललो, ‘ काय ?

‘ म्हटलं, लवकर या ! बोट सापडायला हवी !’

‘ बरं य ’ एवढंच उत्तर करून मी पाठीमागे वळलो नि चालू लागलो.

कप बशीत ठेवीत मी म्हणालो, ‘ नगरसुधारणांच्या बाबतीत आमच्या मालवणचा नंबर तुमच्या कराडच्या पाठीमागे असला तरी नैसर्गिक सौंदर्याच्या बाबतीत तो तुमच्या कराडच्या पुढच्या क्रमांकावर आहे हे कुणालाही नाकबूल करतां यायचं नाही. ’

अवी शेजारच्या कोचावर टेकला.

माझं ते विधान ऐकून अवी निरुत्तर झाला.

त्याला जवळ घेत मी म्हटलं, ‘ एवढा मोठा अरबी समुद्रसुद्धा अनादी कालापासून मालवणच्या रक्षणासाठी अहोरात्र त्याच्या पायाशी बसून आहे, तसा तो आहे का तुमच्या कराडच्या पायाशी ? हजारो माडांनी मालवणावर कायमचं कृपाछत्र धरलं आहे. तसं आहे का ते तुमच्या कराडावर ? ’

अवी म्हणाला, 'आमच्या कराडला कृष्णाकोयनेचा संगम आहे. अलाहाबादेत गंगायमुना सरस्वतीचा आहे ना, तसा आहे का तुमच्या मालवणात ? '

अवीच्या प्रश्नाचं उत्तर मला देता आलं नाही.

' कोकणातलं वातावरण आपल्याकडच्यापेक्षा जास्त आकर्षक वाटत नाही का हो ? ' सीता उद्गारली.

कारण सांगावं म्हणून मी म्हणालो, ' कोकण सह्याद्रीच्या कुशीत आहे. झाडाझुडूपांची अमाप दौलत परमेश्वराने त्याला बहाल केली आहे. त्याशिवाय सागराचं सान्निध्य पण त्याला लाभलं आहे. त्यामुळे कोकणातलं वातावरण डोळ्यांना जास्त आकर्षित करतं. '

' सृष्टीचं सौन्दर्य डोळ्यांना भुरळ पाडतं पण मनाला थकवा आल्यासारखं वाटतं. '

' तेवढं आहे मात्र. इथल्या कोंदट हवेमुळे मनाचा उत्साह हरपून जातो. '

' अहो पण चहावाला किती वेळ तिष्ठत रहायचा ?' मला मध्येच थांबवून सीता बोलली.

मी पाठीमागे वळलो तर चहावाला मुलगा उभा होता.

' अरे हो ! ' त्याच्याकडे पहात मी उद्गारलो, ' बोलण्याच्या नादात तुझे चहाचे पैसे द्यायचे विसरून गेलो की ! '

असा पुटपुटत मी उठलो न् हँगरवरील कोटाच्या खिशातले पैसे घेतले. आणि त्या मुलाच्या हातावर ठेवले.

पंधराच मिनिटात मी माझे काम आटपून मागे परतलो.

जिन्याच्या पायऱ्या चढतोय हे दृष्टोत्पत्तीस येताच गच्चीत खेळत असलेला अवी म्हणाला, ' आई, आण्णा आले ! '

आणि तो खोलीत पळाला.

मी खोलीच्या दारात पोचलो तेवढ्यात बॅगा घेऊन दोघेही दरवाज्यात उभे.

'हं, चला !' असं म्हणत सीतेनं सूटकेस माझ्या हातात दिली.

बरोबर दहा तीस वाजता आम्ही लॉजचा निरोप घेतला न् बंदराकडे जाणाऱ्या रस्त्याला वळलो.

बंदरावर खलाशांची अमाप गर्दी. विश्रांती–खोलीतल्या बाकावर एकही सीटची जागा रिकामी नव्हती. बाकाशिवायच्या मोकळ्या जागेतही असंख्य प्रवासी सामानाचे बोजे घेऊन उभे होते त्यामुळे बोट येईपर्यंत आम्हाला विश्रांतीखोलीच्या समोरच्या उघडच्या जागेतच तिष्ठत रहावे लागले.

बोट आल्याची चाहूल लागताच खलाशांची धावपळ सुरू झाली. आरडा ओरडीला तर सीमाच राहिली नव्हती. मासळी बाजारात गेल्यावर कानावर यावा तसा गोंगाट कानावर आदळला. प्रत्येकजण आपापले सामान घेऊन धक्क्याच्या दिशेनं धावत सुटला.

मालवणचा धक्का मी आज पहिल्यानेच पहात होतो. किनाऱ्यावरून निघालेला हा धक्का थेट दक्षिणेला सागराच्या पोटात घुसलाय.

धक्क्याच्या नाळीचं अलिकडचं टोक किनाऱ्यावर ज्या ठिकाणी टेकलं आहे त्या ठिकाणची कमान ओलांडून आम्ही धक्क्यावर गेलो.

बाजूच्या लोखंडी कठड्याला स्पर्श करीत अवी चालला होता.

धाधावून येणाऱ्या लाटा किनाऱ्यावर आदळत होत्या.

वीस पंचवीस फूट आत गेल्यावर धक्का उजव्या बाजूला काटकोनात वळला आहे. त्यामुळे त्याला नांगराच्या फाळाचा आकार प्राप्त झाला आहे.

थोड्याच वेळात आम्ही धक्क्यापलिकडच्या टोकाशी जाऊन पोचलो.

तिथं तीन चार पडावं उभी होती. ती अर्धी अधिक भरली होती. लाटांच्या धक्क्यामुळे ती विशिष्ट तोऱ्यानं डुलत होती.

धक्क्याच्या दोन पायऱ्या उतरून गेल्यावर पडावात उभा असलेला काठीवाला आमच्याकडे पहात म्हणाला, 'हुं चला.'

त्याच्या आज्ञेबरहुकूम मी विहिरीत अंग झोकून द्यावं तशी पडावात उडी टाकली.

बॅग ठेवून परत काठाशी आलो. आणि पायरीवर उभ्या असलेल्या अवीला उचलून घेतला. आणि सीतेला हात देऊन पडावात घेतली.

' हं चला, ' मुकादमाची आज्ञा होताच काठीवाल्याने हातातील काठी पाण्यात खुपसली.

जितक्या हळुवारपणाने सापाला कांबीरा लावावा, तितक्या हळुवार-पणाने त्याने तिला पाण्यात घुसवली.

तसा पडावाने धक्कयाला रेटा दिला.

माशाने सुळकांडी मारावी तशी त्याने समोरच्या जलाशयात झेप घेतली. जसजसे पडाव वेग घेऊ लागले तसतसा धक्का पाठीमागे सरकू लागला.

देहाने होतो आम्ही त्यावेळी पडावात पण मने होती आमची त्यावेळी मालवणात! स्थिरावली होती ती तिथल्या नारळी पोफळीच्या आगरात; विहार करीत होती ती तिथल्या भातखाचरात, गुंतली होती ती तिथल्या किनाऱ्यावरचा सूर्यास्त पहाण्यात !

सारा सागर अंधाराने पोटाखाली घेतला होता.

पडाव वल्हवणारी माणसं जोर जोरानं वल्हे मारीत होती.

वीज चमकून जावी, तसा नजीकच्या दीपस्तंभाचा प्रकाशझोत मिनटा मिनिटांच्या अंतरानं सागर पृष्ठावर गिरकी मारून जात होता. जेवढ्या पृष्ठावरून तो जात होता तेवढ्या ठिकाणचं सागरपृष्ठ चांदीचा मुलामा दिलेल्या भांड्यासारखं चकाकत होतं.

' बोट पाहिली का रे ? ' असं म्हणत अवीच लक्ष मी समोरच्या दिशेला वेधलं.

मी पहात होतो त्या दिशेने पहात त्यानं विचारलं, ' कुठाय ? '

समोरच्या दिशेला बोट उभारून मी म्हटलं, ' ते तांबडे दिवे दिसतात ना ? '

' हं ! ' नजर बारीक करून तो समोरच्या दिशेला पहात राहिला.

समोरच्या मोठ्या टेकडीला बगल देऊन बोट सामोरी आली.

बोटीतलं दिवे पहाताच त्याच्या चेहऱ्यावर हास्य चमकलं.

जसजशी ती जवळ येत होती. तसतसी मोठी दिसू लागली. अगदी जवळ आल्यावर तिच्या अंतर्गत भागातले दिवे आमच्या डोळ्यापुढं लकाकले.

' आण्णा '

' कारे ? '

' बोट किती मोठी आहे हो ! तीन मजली इमारतीसारखी दिसते.'

' परदेशी जाणाऱ्या बोटी हिच्याहीपेक्षा मोठ्या असतात. '

आश्चर्यचकित नजरेनं पहात तो म्हणाला, ' बोटी कुठं रहातात हो ? '

' समुद्रात. '

' समुद्रात ? ' त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह.

मी म्हणालो, ' अरे, बंदरं हीच त्यांची घरं ! तिथच विश्रांती घेतात त्या ! '

कसल्याशा समाधानाचा आवंढा गिळून तो बोटीकडे पहात राहिला, त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती.

लकाकणारे डोळे मिचकावीत तो म्हणाला, ' डोक्यावर काय लिहिलंय तिच्या ? '

' नाव आहे ते तिचं ! '

' रोहिणी ! अरे वा ? नाव पण छान आहे की. '

' कोठून आली हो ही बोट आण्णा ? '

' मुंबईहून ! '

का कुणास ठाऊक, पण मुंबईहून हा शब्द ऐकताच तो चमकला नि स्मित हास्य करीत म्हटला, ' आण्णा. '

' कारे ? '

गतस्मृति आठवाव्या तशी डोळयाची उघडझाप करीत तो म्हणाला, ' दोन दिवसापूर्वी आपण मुंबईतल्या आपल्या विजयला पत्र पाठवलं असतं; अमूक अमूक दिवशी तू रोहिणी बोटीने मालवणला ये, असं त्यात लिहिलं असतं ; नि आपल्या सूचनेप्रमाणे तो या बोटीने आज इथं आला असला तर–?'

नाटकातल्या पात्रानं स्वगत बोलावं तसा अवी बोलत होता. त्याचा चेहरा स्मित हास्यानं झाकला होता. डोळयात आनंदाश्रू चमकत होते.

' खरंच ! 'तो स्वत:शी पुटपुटत होता, ' या बोटीने विजय आज इथं आला असता, आणि बोटीच्या दरवाज्यात मला दिसला असता, तर मी मोठयानं ओरडलो असतो, विजय ! आणि मग तो मोठयांने ओरडला असता अवी !'

तो आवाज ऐकून मी शिडीपर्यंत धावत गेलो असतो. अन् त्याचा हात पकडून म्हणालो असतो, ' हॅलो मिस्टर विजय ? '

अवीचं ते स्वगत ऐकून आमची हसता हसता पुरेवाट झाली. हे त्याच्या निदर्शनास येताच तो दचकला.

तो नाराज झालेला पाहून मी त्याला म्हणालो, ' ती डोलकाठी पाहिलीस का रे ! '

' कुठाय ? ' असा उद्‌गारत तो समोरच्या दिशेकडे पहात राहिला.

बोटीच्या दिशेनं बोट उभारून मी म्हणालो, 'ते निशाण पाहिलंस ना?'

' होय ' त्यानं होकारर्थी मान डोलावली.

'त्याला म्हणतात बावटा. तो बावटा ज्या काठीला बांधला जातो तिला म्हणतात डोलकाठी '

'बोट थांबवायची असते त्यावेळी कप्तान तो बावटा खाली घेतो.'

'कप्तान ? '

'बोट चालवणाऱ्या माणसाला कप्तान म्हणतात ? '

बावटयासंबंधी अधिक सांगावं म्हणून मी म्हणालो,

'बावटा खाली येताच ढगांचा गडगडाट व्हावा, तसा आवाज येतो. त्या आवाजाबरहुकूम बोटीने नांगर सोडलेला असतो. नांगर सागराच्या तळात रुतला की मगच बोटींना बिलगायला पडावाना आज्ञा मिळते.'

एवढी माहिती कथन करीपर्यंत आमचे पडाव बोटीला बिलगले.

'हं चला ! ' असं म्हणीत मी बॅग उचलली न् शिडीचा कठडा गाठला. शिडी चढता चढताच पाठीमागे वळून 'हळू या हं ! ' अशी सूचना केली.

'हो ! ' असं म्हणत ते दोघेही माझ्या पाठीशी येऊन भिडले.

सिनेमा सुटल्यावर थिएटरच्या दरवाजावर असावी तशी गर्दी बोटीच्या दरवाजावर होती.

उतरणारे शिडीवरून खाली धावत होते, नि. चढणारे अवती भोवतीच्या माणसांची कदर न करता गर्दीत घुसत होते. कोण कुणाला हाकारत होता, तर कोण कुणाला शोधत होता. त्या गर्दीतल्या गोंधळाने अबी कुठंच दिसेना. भांबावलेल्या स्थितीत मी म्हणालो, 'अगं , अबी कुठाय ? '

'तुमच्या बरोबर होता ना ? '

'होता, पण आता दिसत नाही ना ! ' मी चिडक्या स्वरात ओरडलो.

तेवढयात तो बाजूच्या गर्दीतून धावत आला.

'तुमच्या हाताला धरून चालला होता ना ? '

'विचारायला नको अशी गर्दी तिसऱ्या वर्गातल्या उतारूंची होती.

मध्ये दोन फूट रुंदीची वाट सोडून दोन्ही बाजूंनी बिछाने पडले होते. तर कुठं चटया अंथरल्या होत्या.

मध्य त्या अरुंद वाटेवरुन उतारुंची धावपळ चालली होती. त्या गर्दी-तून वाट काढून आम्ही चाललो होतो-.

रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातल्या वातावरणासारखंच बोटीतलं वातावरण दिसलं. तिकडं माणसंच माणसं. गप्पात रंगलेली, बिछान्यावर पडलेलीं.झोपी गेलेली, पत्ते खेळत असणारी, तर कोणी वाचनात मग्न असलेली.

लाटांच्या धक्क्यांमुळे बोट झोले मारीत होती. त्यामुळे आम्हाला तोल संभाळून चालावे लागत होते.

जिना चढून आम्ही अप्पर क्लासमध्ये गेलो.

बसल्या जागेवरूनच सागराच्या हालचाली पाहता याव्यात म्हणून आम्ही डेक जवळची जागा पसंत केली.

भोंग्याचा आवाज देवून बोटीनं बंदर सोडलं.

जसजसा ती वेग घेवू लागली तसतसा वारा घोंगावू लागला. सागराच्या क्रीडा पहाव्यात या हेतूने आम्ही उठलो. न् डेकला रेलून उभे राहिलो.

सुरीच्या पात्याने भाजी कापावी तशी बोटीची नाळ पाणी कापीत होती. धा, धावून येणाऱ्या लाटांना ठोकरून आपला मार्ग चोखाळीत होती.

बोटीनं थोडंसं वळण घेतल्यामुळे डोळ्यांआड झालेला मालवण गाव पुन्हा नजरेत आला. कौलारु घरांच्या छपराआडुन डोकावणारे माड झावळ्यांचे हात हालवीत होते, ? का ते आम्हाला बोलावीत होते. कुणास ठाऊक ? किनाऱ्यावरचे दिवे अंधूक दिसत होते. का त्यांना इथं ठेवून आम्ही गोव्याला चाललो होतो म्हणून ते नाराज झाले होते ? बाजूचा सिंधुदुर्ग किल्ला स्वतःशी काही तरी पुटपुटत होता, का तो आम्हाला 'सांभाळून या हं ! ' असं सांगत होता कुणास ठाऊक !

मोठ्या टेकडीला बगल देऊन बोटीने म्होरा फिरविला तसा मालवण गाव डोळ्यांआड झाला.

'बरं, जेवण घेऊ या.' असं म्हणून मी उठलो. बोटीतल्या उपहार-गृहात गेलो. महाराष्ट्रीय पद्धतीचे जेवण न मिळाल्यामुळे आमची थोडी गैरसोय झाली. पुरी भाजी खाऊन आम्हाला गुजराण करावी लागली.

डोळयावर झोपेची झापड आली होती.

घडयाळाकडे पहात मी म्हणालो, 'ए! साडेबारा वाजून गेलेत! मी आता पडतो थोडा वेळ!'

असं सांगून मी अंथरुणावर आडवा झालो.

अवी केक चघळीत डेकला रेलून उभा होता.

जाग आल्यावर मी घडयाळ पाहिलं तर पाच वाजून गेले होते.

शेजारी झोपलेली सीता मोठयाने घोरत होती.

तिला डिवचून मी म्हणालो, 'ए'

'हं!' एवढाच उच्चार करून तिनं चादरीत तोंड खुपसलं.

अवीपण निद्रेच्या आधीन गेला होता.

वाटलं उठावं न् पेस्ट, ब्रश नि टॉवेल घेऊन बाथरूमला जावं. पण सारं साहित्य ज्या बॅगेत होतं ती बॅगच सीतेच्या उशाखाली होती म्हटलं, बॅग घ्यावी तर तिची झोपमोड होईल.

मग तसाच उठलो न् क्लोक रूमकडे गेलो

स्वच्छता गृहातून परतल्यावर उपहार गृहात जाऊन चहा घेतला न् डेकला रेलून उभा राहिलो. चंद्राचा शोध घ्यावा म्हणून आकाशाकडे नजर टाकली, पण--

अंधाराच्या बुरख्याआडून आकाशाचा मागमूसही लागेना.

आवती भोवतीचं सारं सागरपृष्ठ अंधाराने पोटाखाली घेतलं होतं. त्यामुळे बाजूची किनारपट्टी नजरेच्या टप्प्यात येत नव्हती. गोव्यात पोच-विण्याचं आश्वासन देणारी रोहिणी बोट मात्र असंख्य लाटांशी मुकाबला करून, पण आपला मार्ग चोखाळीत होती, कुठल्याही प्रकारची कुरबूर न करता शेकडो माणसांचा भार वाहत होती

थोडया वेळात तांबडं फुटलं न् दिशा फाकल्या.

स्तब्धता नाहीशी झाली न् गलबयाचं प्रमाण वाढलं.

'अहो, साहेब उठा!' असे म्हणत मी अवीच्या अंगावरची चादर ओढली.


उघडया पडलेल्या अंगाला गारठ्याचा स्पर्श होताच त्याची झोपमोड झाली. पाय ताणून त्याने आळस टाकला. त्यामुळे बायकोची झोपमोड झाली.


सर्वांचे प्रातर्विधी आटोपल्यानंतर आम्ही उपहारगृहात प्रयाण केलंन् चहाप्राशन करून ताजेतवाने झालो.

तेवढ्यात.

पूर्वक्षितिजावर आरूढ झालेल्या रविराजांचं दर्शन घडलं.

डोळे मिटून हात जोडीत मी म्हणालो, ' हे प्रभो, तुझ्या कृपेमुळे आम्ही इथंपर्यंत सुखरूप आलो. यापुढेही तुझी कृपा अशीच आमच्यावर राहू दे. ! '





# ४

' तो पहा गोव्याचा किनारा । ' समोरच्या दिशेकडे पहात मी बोललो.

दोघांच्याहि नजरा समोरच्या दिशेकडे वळाल्या. ज्या ठिकाणी सर्वांच्या नजरा स्थिर झाल्या होत्या त्या ठिकाणी शंकूच्या आकाराची एक मोठी टेकडी होती. त्या टेकडीच्या भोवतीच्या दऱ्या हिरवळीने आच्छादल्या होत्या. झाडाझुडपांच्या गर्दीतून कुठे तरी एखादा दुसरा माड डोकं वर काढून पहात होता. त्याच्या चामराखाली बंगलोरी कौलांची छपरं लपली होती. नजरा बारीक करून त्याच्याहि पलीकडे पाहिलं तर मन अधिकच आनंदून जात होतं.

' इंग्लंडसारखा परिसर दिसतोय, नाही ?' सीतेकडं पहात मी उद्गारलो .

लोखंडी कठड्याला ऐकून आम्ही उभे होतो.

' छान आहे गोव्याचा परिसर ! ' सीता म्हणाली.

' परमेश्वराने हिरवा गालीचा पसरला आहे की काय असे वाटते.' 'अवी. तेवढ्यात बोट पूर्वाभिमुख झाली आणि मांडवीच्या खाडींत घुसली.

खाडीकडे पहात मी म्हणालो, 'ही मांडवीची खाडी?'

समोर आफाट विस्ताराचा जलाशय होता. माशानी सुळकन् इकडून तिकडे जावे तशी असंख्य पडावं इकडून तिकडे जा ये करत होती.

मधूनच एखादी लॅंाच येवून पाण्यात रेषा उमटवून जात होती. मधूनच पलिकडच्या धक्कयाला बिलगून दोन तीन चिरवल बोटी उभ्या होत्या-

भोंग्यासारखा आवाज कानावर आला. त्याच क्षणी त्या रोखाने आमच्या नजरा वळल्या.

समोरून एक व्हेरीबोट आमच्याकडे येत होती.

भोकणा पसरीत, आलेली नकटया नाकाची लांबोडकी व्हेरी बोट आमच्या बोटीला बगल देऊन पळून गेली आणि पलिकडच्या किनाऱ्याला बिलगली.

किनाऱ्याला स्पर्श करताच तिच्या पोटातून तीन चार मोटारी बाहेर पडल्या. त्या पाहून अवी म्हणाला, ' आण्णा, ते काय हो ? ' ' ती व्हेरी बोट, खाडीच्या या किनाऱ्यावरची वहानं त्या किनाऱ्यापर्यंत वाहून नेते.'

खाडीकडे पहात मी म्हटलं, ' मांडवी हीच गोव्यातली मोठयात मोठी नदी ? '

' पलिकडचं ते गांव कोणतं हो अण्णा ? '

' गाव नाही, शहर आहे ते ? पणजी म्हणतात, ते हेच गोव्याच्या राजधानीचं शहर '

' कसलं हो हे शहर ? चार चार पाच पाच मजल्यांच्या इमारती कुठंच दिसत नाहीत. '

' राजधानीचं शहर आहे, पण बहुतेक घरं बैठी नि कौलारु ' सीता उद्गारली.

' त्याच धक्याला आपली बोट लागणार का हो ? '

' नाही ? ' अधिक खुलाशासाठी मी तपशीलाकडे वळलो ' तो आहे व्हेरी बोटींचा धक्का ? प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या लॅंाचेस आणि मार्शल बोटी त्या धक्कयावरून सुटतात.'

ज्या धक्कयासंबंधी मी बोलत होतो त्याच धक्कयावरून सुटलेलं एक पडाव बोटीच्या रोखाने धावत गेलं

त्याच्याकडे पहात अवी म्हणाला, ' त्या पडावात माणसं कशी नाहीत हो ? '

' माणसांची वाहतूक करणारं पडाव नाही ते, ' असं सांगून त्याची शंका मी निकालात काढली.

' लगेच परत पण गेलं की ।' अवी.

' दोर घेऊन धक्कयाकडं गेलं आहे ते' मी.

' दोर ? आणि तो कशाला ?'

' दोराचं एक टोक बोटीला बांधलं जातं नि दुसरं टोक धक्कया-जवळच्या साखळदंडाला जोडलं जातं. दोरानं बोटीला जखडलं म्हणजे तिला ओढ लागते. आणि मग ती आपोआपच फलाटाकडं सरकू लागते. '

धक्कयावरच्या फलाटावर चाललेल्या गलक्याकडं पहात सीता म्हणाली, ' गलका कसला चालला आहे हो तिथ ?'

' हमालांची धावपळ चालली आहे तिथं. इथले हमाल मोठे चतुर आहेत हां । '

' अस ' अशी उद्‌गारत ती पहात राहिली.

' आपल्या दरवाज्यात उभ्या असलेल्या प्रवाशांना ते फलाटावरून हाकारतात नि त्यांचे सामान नेण्यासंबंधी करार ठरवून घेतात. '

' ढग तर कुठेच दिसत नाहीत मग गडगडाट कसला झाला ? ' अवी आकाशाकडे पहात बोलला.

' अरे, ढगांचा का आवाज होता तो ? '

' मग कशाचा ?'

' बोटीने नांगर टाकला. त्याचा आवाज होता तो । ' इतकं बोलून होईपर्यंत बोट धक्कयाला बिलगली.

शिड्या फलाटावर उतरल्या. आम्ही डेक सोडून गर्दीत घुसलो. दरवाजा गाठला.

दरवाजाजवळच्या गर्दीत घुसून अवीने शिडीचा कडा गाठला.

' आण्णा, या । ' असं म्हणत तो शिडीच्या पायऱ्या उतरु लागला.

फलाटाच्या बाहेर पडल्यावर आम्ही सामानासाठी एक हमाल ठरवला, आणि सारे सामान त्याच्या स्वाधीन करून चिंतामुक्त झालो.

बॅगा उचलीत तो म्हणाला, ' खयसून आयला सिल्यार ? '

कोकणी भाषेतल्या त्याच्या प्रश्नाचा रोख माझ्या लक्षात आला. मला कोकणी बोललेली समजते. पण बोलता येत नाही. त्याकारणाने मी मराठीत बोललो, ' फार लांवून आलो आहोत ? '

धक्क्याच्या दरवाजातून बाहेर पडल्यावर सीतेकडे पहात मी म्हणालो, ' हा जोवाअ दि कॅस्ट्रो रस्ता. पणजी शहरातला हा प्रमुख रस्ता ? ' मुंबईतल्या मरीन ड्राईव्हसारखा हा खाडीला घासून गेला आहे. '
सीता म्हणाली, ' त्यामुळे याला मरीन ड्राईव्हचं स्वरूप प्राप्त झालं आहे.'

'काय म्हणतेस? 'रस्त्याकडे पहात मी म्हणालो,'अगं, मरीन ड्राईव्हशी' याची तुलनाच होऊ शकत नाही इतका लहान आहे हा रस्ता. मरीन ड्राईव्ह डबल लाईनीत बांधला आहे. त्याशिवाय त्यावरची वाहनांची गर्दी केवढी ! त्या मानाने या रस्त्यावरची वाहतूक काहीच नाही. '

अत्री म्हणाला, 'मुंबईतल्या फुटपाथवरून धावत जाणाऱ्या माणसांच्या गर्दीतून चालणेसुध्दा अवघड जाते इतकी गर्दी असते मुंबईतल्या कुठल्याही रस्त्यावर. तशी कुठं आहे इथं ? '

' खरं आहे ! ' मी म्हणालो, ' आपल्या पुण्यातला एखादा चौक ओलांडायचा झाला तर तांबड्या दिव्यांचा सिग्नल पाहून पाच पाच मिनिट थांबावं लागतं नि दोन्ही बाजूच्या रस्त्यावरची शेकडो वाहने नि प्रवासी चौक ओलांडून जातील तेव्हा सिग्नल हिरवा दिवा दाखवील आणि मग आपणाला रस्ता ओलांडता येतो. तितकी वाहतूक इथल्या रस्त्यावर दिसत नाही. मात्र इथल्या रस्त्यावर आपल्याकडच्या रस्त्यावर दिसणारी घाण दिसत नाही. स्वच्छतेच्या बाबतीत इथं जास्त दक्षता घेतली जाते. इथल्या रस्त्यावर कुणीही कुठेही थुंकलेला दिसणार नाही.'

' हं ! रहदारीच्या बाबतीत मात्र मरीन ड्राईव्हशी याची तुलना करता येणार नाही ! '

आम्ही रस्ता तुडवत चाललो होतो.

उजव्या बाजूच्या इमारतीकडे बोट उभारुन हमाल म्हणाला, ' त्या-बिल्डिंगात गोया-सरकारच्च हॉपीस आसा ! गोव्यात पोर्तुगीजांचा राज्य असल्ली तेन्ताचा राजावाड्या त्यो व्हयोच ! '

हेल काढून बोलणाऱ्या हमालाच्या कोकणी बोलीतले उच्चार ऐकून अवीला गंमत वाटली. मजकडे पहात तो म्हणाला, ' काय म्हणतोय हो हा? '

'तो म्हणतोय, त्या इमारतीत गोवा सरकारचे कार्यालय आहे. गोव्यात पोर्तुगीजांचे राज्य होते त्यावेळचा राजवाडा तो हा. '

' पोर्तुगीज कोण हो ? ' अवीने मध्येच विचारलं.

' युरोप खंडात पोर्तुगाल नावाचा एक देश आहे. तिथले लोक हे. '

' पोर्तुगीज दर्यावर्दी ! ' पोर्तुगीजासंबंधी अधिक सांगावे म्हणून मी म्हणालो, ' समुद्रावर लांब लांबच्या सफरी करण्याचा छंद होता त्याना. जगाच्या पाठीवर हिंदुस्थान नावाचा एक देश आहे, हे पश्चिमेकडील राष्ट्रांना प्रथम दाखवून दिले ते वास्कोद गामा या पोर्तुगीज गृहस्थाने '

' म्हणजे ? हिंदुस्थानचा शोध त्यानी लावला ?'

' होय '

' इथून किती लांब आहे पोर्तुगाल ?' अवी.

' इथून सातशे मैलावर आहे तो देश. '

' ते आले ते व्यापार करण्याच्या हेतूने. पण झाले इथले राजे. '

' ते कसे ?' अवीने शंका उपस्थित केली.

' दिल्लीच्या बादशहाशी सल्ला मसलती करून त्यानी प्रथम इथल्या व्यापाराची परवानगी घेतली. आणि मग मुंबई, गोवा, मद्रास या बंदरावर वखारी घातल्या.

' सोळाव्या शतकात ऑफन्स द अल्बुकर्क हा पंधराशे जहाजातून सैन्य घेऊन इथे आला. त्याने गोमांतकावर अचानक हल्ला केला. पण जीच्या किल्ल्यावरचा सुभेदार चैनी नि व्यसनी होता. तो नेहमी नशापाणी करून धुंद असायचा. अल्बुकर्कच्या गनिमी काव्याच्या लढाईला कंटाळून तो किल्ला सोडून पळून गेला. अल्बुकर्कने सुभेदाराचा वाडा ताब्यात घेतला. स्त्रियाना कैद करून आपल्या आरमारातील शिपायांबरोबर त्यांची लग्ने लावून दिली

' पोर्तुगीज संस्कृती गोव्यात रुजू करावी या उद्देशाने अल्बुकर्कने आपल्या ताब्यात आलेल्या भूप्रदेशातील देवळे पाडली, दर्गे पाडले नि त्या ठिकाणी चर्च उभारली. '

'देवळं का पाडली ?' अश्वीने तपशील विचारला

'देवळं ही हिंदूंची प्रार्थना मंदिरे. ख्रिस्ती लोकांना हिंदूबद्दल आदर नव्हता. म्हणून ते हिंदू मंदिरे पाडीत असत.'

'पोर्तुगीज धर्मवेडे होते,' मी म्हणालो, 'सेंट फ्रान्सिस झेवियर हा ख्रिस्ती धर्म प्रसारक प्रथम गोव्यात आला. त्याने हिंदूंची देवळे पाडून त्या ठिकाणी चर्चेस उभारल्या. जुलूम जबरदस्ती करून इथल्या हिंदूंना धर्मांतर करण्यास भाग पाडले.'

'किती दुष्ट होते हो पोर्तुगीज ?' सीता उद्‌गारली.

'त्या बाटाबाटीला कंटाळून गोव्यातली हजारो कुटुंबे त्यावेळी गोमांतक सोडून त्रावणकोर कोचीनच्या बाजूला पळून गेली. न् तिकडेच स्थाईक झाली.

व्यापार करत करत त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यास सुरवात केली. त्यातही यश येतंय असं जाणल्यावर तेथल्या भूमीला चिकटून राहिले नि त्यांनी आपली सत्ताच इथं प्रस्थापित केली.'

'व्हडली शिस्त आसली त्यांच्या राज्यात' हमाल म्हणाला.

'शिस्त ?' असं उद्‌गारून मी त्याच्याकडे पहात राहिलो.

'डोक्यावरची बॅग त्यानं हातात घेतली.' तो म्हणाला, 'अहो त्या यळल्ला कुणी पॅार रस्त्याच्या रांग सायडीनं चलली मनीस देख तो मटसून आईल्ली संक्ती एकदम उभी रावतली, आन् त्यातून बाहीर आईल्ली मनीस त्या रस्त्या वेल्या मानसाच्या कानसुत्रात लावून म्हणायचा 'चाले, परती रांग साईडीन बाले ?'

त्याच्या त्या बोलण्याचा उलगडा सीतेला झाला नाही. म्हणून मज-कडे पहात ती म्हणाली,' काय म्हणतोय हा ?'

मी म्हणालो, 'तो म्हणतोय' त्याच्या राज्यात माणसं रस्त्याच्या डाव्या बाजूने चालत असत. एकदा उजव्या बाजूने चाललेला दिसला तर पाठीमागून आलेली टॅक्सी उभी राहिली आणि तिच्यातला माणूस उतरून विरुद्ध बाजूने चाललेल्या त्या माणसाच्या थोबाडीत मारून म्हणाला. 'माणूस पुन्हां विरुद्ध बाजूने चालशेल ?'

'मोठीच शिस्त होती म्हणायची पोर्तुगीजांच्या राज्यात, ' सीता उद्गारली, 'काँग्रेसच्या राज्यात त्या मानाने कमीच. '

'अगं, काँग्रेसच्या राज्यात तेवढी शिस्त नसेल,पण प्रजेच्या हितासाठी भारतात काँग्रेस सरकारने शिक्षण प्रसार, औद्योगिक प्रगती, आणि वहातूक व्यवस्था, या बाबतीत जेवढी प्रगती केली आहे तेवढी पोर्तुगाल सरकारला चारशे वर्षाच्या कारकीर्दीत गोव्यात करता आली नाही. '

' आमचा वादविवाद ऐकून आमच्या शेजारून चाललेला मुलगा मजकडे पहात म्हणाला, ' तुमच्या सरकारने शिक्षणाच्या बाबतीत जास्त प्रसार केला असं म्हणता ना ? '

' होय '

' तो कसा ? '

' आमच्या देशात जवळ जवळ सर्वच ठिकाणी सरकारने शिक्षणाची केंद्रं उघडली आहेत. त्याहिपेक्षा आमच्या महाराष्ट्र सरकारने अधिक सुलभतेने शिक्षण घेता यावे अशा काही योजना अमलात आणल्या आहेत. '

' अशी कोणती योजना ? '

' आमच्या राज्यात शिक्षण– शास्त्र–संस्था नावाची एक संस्था आहे. तिचं कार्यालय पुण्यात आहे. तिने पत्रद्वारे शिक्षण देण्याची योजना आखून ती अमलात आणली आहे.

' पत्राद्वारे शिक्षण ? '

' होय, ज्याना विद्यालयात जाऊन शिक्षण घेता येणे शक्य नसते त्यांना विद्यार्थी ज्या ठिकाणी राहातो त्या ठिकाणी ही संस्था त्या विद्यार्थ्याला हव्या असलेल्या अभ्यासक्रमाच्या शिक्षण पाठाचे विचार दर्शविणाऱ्या पुस्तिका टपालाद्वारे पाठवून देते. त्या पुस्तिका वाचून विद्यार्थी घरबसल्या अभ्यास करतो. आणि परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा देऊन पदवी सपादन करु शकतो. '

' फार चांगली योजना आहे की, ' त्या मुलाचे चेहऱ्यावर समाधानाचं तेज उभे होते.

'काय नांव तुझं ?' मी त्याला विचारलं.

'डिसूझा.'

'धर्म ?'

'ख्रिस्ती'

'गव्हर्नर साहेबाला तू पाहिलं होतंस?' सीतेनं हमालाला विचारले.

'खैचो ?' असा उच्चार करुन तो तिच्याकडे पहात राहिला.

'पोतुगोजांच्या राजाला ?'

'छाँ – छाँ – छाँ – अरे बाबा राजाक पळीव पाक कोणत्या नशीबात आशील्ले जो राजाक पलोवीं तो व्हडला नशीबवान"

हमालाच्या याही बोलण्याचा मतितार्थ त्यांच्या ध्यानात आला नाही म्हणून ते माझ्या तोंडाकडे पहात राहिले.

मी म्हणालो, 'तो म्हणतोय, त्या काळात राजाला पाहणं कुणाच्याच नशिबांत नसे. ज्याने राजाला पाहिलं तो मोठा नशिबवान असे ?'

'इतकी दहशत होती पोर्तुगीजांच्या राज्यात ?'

'हो. म्हणून तर कित्येक वर्षे त्यांची सत्ता त्यांना इथं टिकवता आली.

सचिवालयाची इमारत ओलांडून आम्ही पुढे गेलो.

समोरच्या पुतळयाकडे पहात अवी म्हणाला, 'हा कोणाचा पुतळा?'

'आबे फॉरियाचा.'

'आबे फॉरिया कोण ?' त्याने विचारलं.

'जगातला प्रसिद्ध मोहिनी शास्त्रज्ञ.'

'असं ?'

'होय, तो कोणावरही मोहिनी टाकून आपले विचाराशी त्याला वश करुन घेत असे'

'त्या बाईला मारतोय काय ?'

'नाही, त्याने तिच्यावर मोहिनी टाकली आहे.'

'कोणत्या राष्ट्रातला तो शास्त्रज्ञ ?'

'तो जन्मला इथं गोव्यातच नोंदोली या गावी'

'कुठे आहे तो गाव ?'

'गोव्यातच, येथून पांच मैलावर.'

' तो शास्त्रज्ञ पुढे पोर्तुगालमध्ये स्थाईक झाला. व तेथेच तो मृत्यू पावला, त्याचा पुतळा आहे हा.'

उजव्या बाजूचा पुतळा मागे टाकला. तेवढयात उजव्या बाजूकडून आलेला एक रस्ता त्या रस्त्याला येऊन मिळाला.

तो चौक ओलांडून पुढे गेल्यावर उजव्या बाजूस एक मोठी इमारत दिसली.

त्या सहा मजली इमारतीकडे पहात मी म्हणालो, 'हे टूरिस्ट हॉटेल. परदेशातून सफरीसाठी येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी सरकारने या हॉटेलची योजना केली आहे. इतर हॉटेलपेक्षा या हॉटेलचे दर कमी आहेत.'

' त्यांच हॉटेलांत आपण उतरणार ?' अवीने प्रश्न केला.

' होय. निवासाची उत्तम व्यवस्था होते इथं !'

डाव्या हातातील बॅग उजव्या हातात घेत हमाल म्हणाला, ' या परास बंदरोवल्या मांडवीत चड सोय मिळत्यात.'

' हो, पण तिथेले दर सामान्य मानसांना परवडणार नाहीत.'

आम्ही टूरिस्ट हॉटेलच्या फाटकाशी येऊन पोचलो.

ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. २३६७५
शाखा (स्थळ प्रत)

# ५

व्हरांड्यात प्रवेशताच वेटर धावत आला.

' या साहेब ! ' या ठराविक शब्दांनी बोलून त्याने व्हरांड्यातल्या समोरच्या कोचाकडे बोट दाखविले.

आम्ही कोचात टेकलो.

समोर व्यवस्थापक कचेरी होती.

कचेरीतल्या प्रमुख स्थानावर एक तरुणी विराजमान झाली होती. बॉब्र कटाचे कटिंग केलेले केस. केसांच्या कलरला मॅच न होणारा गौरवर्ण, रुंद पण वाटोळे भाल. भालाला आगळा उठाव आणून देणारा डोळ्यावरचा गॉगल. या साऱ्यामळे तिचं व्यक्तिमत्त्व फारच उठून दिसत होतं.

आमच्या नजरेला नजर भिडताच ती म्हणाली,

' कम् ! व्हॉट डू आय डू फार यू, सर ? '

' वुइ वॉंट अ रुम ? कॅन वुइ गेट अ रुम ? '

' येस, यु कॅन, सिंगल ऑर डबल ? '

' डबल, '

' व्हॉट इज युअर नेम ?

' मि. शेलार. '

' व्हेअर आर यु फ्रॉम ? '

' आय हॅव बीन हिअर फ्रॉम कोयनानगर. '

'व्हाय, हॅव्ह यू कम हिअर ?'

'ओनली फॉर व्हिजिटिंग गोवा.'

'हाऊ मेनी डेज आर यू गोइंग टु स्टे हिअर ?'

'ओनली फोर डेज.'

'गिव देम रुम नं. टवेल्व ऑन दि सेकंद स्टोअरी.'

'गोवा गव्हर्मेंट हॅज मॅनेज्ड टु प्रोव्हाईड टुरिस्ट बसेस फॉर सीइंग गोवा हिअर.'

त्या आवाजावरहुकूम समोरच्या खोलीतून एक मुलगा धावत आला

'चला साहेब !' असं म्हणत त्या मुलानं बॅग उचलली. आम्ही त्याच्या मागे गेलो.

लिफ्टने सहाव्या मजल्यावर येऊन त्याने आम्हाला चवथ्या मजल्यावर नेले. आणि बारा नंबरच्या खोलीचं दार उघडीत तो बोलला, 'हा तुम्हाला दिलेला रुम.'

आम्ही तिथं स्थिरावलो. थोड्या वेळानं म्हणाला, 'इकडं या.'

तसा मी उठलो.

लिफ्टच्या साहाय्याने त्याने मला पुन्हा तळमजल्यावर नेले.

समोरच्या बेबीजकडे बोट उभारून तो म्हणाला. 'तुमच्या गरजेच्या कोणत्याही वस्तूसाठी हे दुकान तुम्हाला सहाय्य करील. त्यासाठी तुम्हाला शहरातील बाजारपेठ धुंडाळण्याचं कारण नाही'

निवासस्थानाची माहिती घेऊन झाल्यावर मी दुसऱ्या मजल्यावरील आमच्या निवासस्थानी गेलो.

सीता नि अवी कॉटवर आडवे झाले होते. वेळेच्या अभावामुळे पूर्वनियोजित कार्यक्रमात कोणताही बदल करण्याची पाळी येऊ नये, यासाठी स्नानाचा कार्यक्रम कमीत कमी वेळात आटोपायला हवा अशी सूचना करून मी स्नानगृहात गेलो.

स्नान आटोपल्यावर बेडरूममध्ये आलो नि खुर्चीवर टेकतो न टेकतो तेवढ्यात वेटर हजर.

'गोव्यातली प्रेक्षणीय स्थळे कमीत कमी वेळात पहाता यावीत यासाठी काही सोय ?' वेटरकडे पहात मी बोललो.

' आहे की ! ' डोळ्याच्या पापण्या फरफरत वेटर बोलला, ' थोड्या वेळात गोवा पहाता यावा या हेतूने गोवा सरकारने टुरिस्टसाठी टूरिस्ट बसेसची व्यवस्था केली आहे. '

' होय का ?'

तेवढ्यात शेजारच्या खोलीतून एक गृहस्थ बाहेर आले आणि समोरच्या दिशेला बोटाने दाखवीत म्हणाले, ' त्या बिल्डिंगमध्ये टूरिस्टचे ऑफिस आहे. ज्या ज्या टूरिस्टना त्या बसेसचे सहाय्य हवे असते, त्या आदल्या दिवशी आपल्या नावाची नोंदणी करून प्रवासाच्या भाड्याचे पैसे भरावे लागतात. तेव्हा त्याना दुसऱ्या दिवशी त्या बसने प्रवास करता येतो.'

अधिक माहिती सांगावी या हेतूने ते गृहस्थ म्हणाले, ' टूरिस्ट बस रोज दोन ट्रिपा करते पहिल्या ट्रिपकरिता ती सकाळी दहा वाजता पणजीहून निघते, ती दुपारी दोन वाजता परत येते आणि दुसऱ्या ट्रिप-करिता तीन वाजता परत निघते ती संध्याकाळी सहा वाजता परतते. '

' बराय, ' असं म्हणून ते गृहस्थ आपल्या खोलीत गेले.

बेलचा आवाज आला तो ऐकून वेटर खोलीबाहेर गेला सीताकडे पहात मी म्हणालो, ' मी टुरिझमच्या कार्यालयातून येतो. '

' लवकर या हं. '

' होय. ' असे सांगून मी टुरिस्ट कार्यालयाकडे गेलो. टुरीझम कार्यालयातून परतल्यावर आमच्या रूमच्या बाजूच्या रूममधील गृहस्थ आले. त्यांची ओळख करुन घ्यावी म्हणून मी म्हणालो, ' आपण कुठले ? '

' बेळगावचे '

' नांव ? '

' सरदेसाई. '

' आपला व्यवसाय ? '

' स्मॉल इंडस्ट्रीज. '

' इंडस्ट्रीज ? '

' बॉक्स तयार करण्याचा छोटा कारखाना आहे माझा बेळगावाला.'

' किती वर्षांपूर्वी पासून आपण हा उद्योग करता आहोत ?'

' पांच वर्षे झाली. '

' स्मॉल इंडस्ट्रीजचं शिक्षण ? '

' तीन वर्षे अमेरिकेत होतो मी स्मॉल इंडस्ट्रीजच्या शिक्षणासाठी. ।'

' म्हणजे आपण अमेरिकेत काही काळ वास्तव्य करून होता ?'

' फार छान वाटलं अमेरिकेतलं वातावरण ! '

'कोणत्या बाबतीत' अधिक खोलात न्यावे या उद्देशाने मी म्हणालो.

' सर्वच बाबतीत, ' कपडे ठाकठीक करुन सरदेसाई म्हणाले, ' अमेरिका एवढं मोठं राष्ट्र, भारताच्या कितीतरी पटीनं मोठं, पण तुम्ही तिथल्या कोणत्याहि प्रादेशिक विभागाला गेलात तर तुम्हाला आपल्या देशातल्यासारख्या अनेक भाषा दिसणार नाहीत. तिथल्या सर्व भागात एकच भाषा बोलणारे लोक भेटतील. वेशसुध्दा एकच. पुरुष स्त्रियांच्या पोशाखात सुध्दा विशेष असा वेगळेपणा दिसणार नाही. '

मला समाधान वाटलं, माझ्या चेहऱ्यावर समाधानाचं तेज चमकलं, मुखावाटे शब्द उमटले, ' इथं खरी राष्ट्राची एकसंघता दिसते. '

' राष्ट्रीय अभिमानाबद्दल सांगायचं झालं तर तिथल्या नागरिकांमध्ये कौटुंबिक अभिमानापेक्षा राष्ट्रीय अभिमान जास्त प्रकर्षाने जाणवतो. एखादे वेळी एखाद्या व्यक्तीवरील अन्याय तिथला नागरिक सहन करील, पण राष्ट्रावर झालेला अन्याय तो सहन करणार नाही. इतका राष्ट्राबद्दल जाज्वल्य अभिमान तिथल्या नागरिकात असतो. '

' राष्ट्रीय अभिमान आपल्या भारतीयांमध्येही आहेच की ! '

' आहे. पण तो जाज्वल्य स्वरुपाचा नाही. थोडासा खोटा अभिमान आपल्यात वास करीत असतो. '

' काही प्रमाणात खरं आहे तुम्ही म्हणता ते. मोठमोठ्या पंडितानी, राजकारण्यांनी नि समाजसुधारकांनी देशाची महती वाढविली. ते आपले पूर्वज होते म्हणून देशाची महती गायची. याच्याही पलिकडे असणारा राष्ट्राभिमान फार थोड्या नागरिकांच्या हृदयात वास करीत असलेला दिसतो. '

' तिथली आचार संहिता तर येवढा मोठा परिणाम समाजावर करते की एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या बोलण्यातील एखादे विधान खोटे असले तर तिथली लहान मुलेसुध्दा तो गुन्हा आहे असे समजतात. '

' म्हणजे मुलांचेवरसुध्दा किती चांगले आदर्श भिनलेत ? '

' अमेरिकेत गुन्हेगारांना शासनामार्फत तर शिक्षा मिळतेच पण नागरिकांकडून सुध्दा शिक्षा होते. ती सहन करावी लागते. त्यामुळे तिकडे गुन्ह्यांचे प्रमाण फार कमी भेटते. '

आपल्याकडच्या राज्य-स्तरावरील व्यक्तींकडून जेवढ्या स्वरूपाचे दोष होतात तेवढ्या स्वरूपाचे दोष अमेरिकेतल्या ग्रामीण पातळीवरच्या शासनसंस्थेत काम करणाऱ्या व्यक्तीकडून होणार नाहीत. इतकी तिथली शासन संस्था प्रभावी असते, '

थोडा वेगळ्या बाजूचा परामर्श घ्यावा म्हणून मी म्हणालो, ' न्यायाच्या बाबतीतले तिकडचे अनुभव – ? '

' हं हं ' त्या राष्ट्रातली न्यायाची बाजू तर इतकी स्वच्छ नि निर्दोष की एकदा एका प्रवाशाची बॅग हरवली, म्हणून त्याने सरकार दरबारी नोंद केली. सरकारी सेवकांनी त्याच्या बॅगेतील चीजवस्तूंची माहिती विचारून त्यांचा पत्ता लिहून घेतला. नि तपास लागल्यानंतर समक्ष देण्यात येईल म्हणून सांगितले. आणि आठव्या दिवशी त्यांचे नावावर एक हजार डॉलरचा चेक रजिस्टर पोस्टाने आला. '

' असं ? ' माझ्या चेहऱ्यावरचं आश्चर्य जास्तच झळकलं.

'बरं, आता आपण आपल्या मूळ मुद्याकडे वळू या का ?' मी प्रश्न केला

' काही हारकत नाही. 'सरदेसाई म्हणाले.

' भारतातील आधुनिक शहरांशी पणजीची तुलना करता पणजीचा चेहरा पुष्कळच आगळा वाटतो. आपलं काय मत ? '

पुरातन काळापासूनचं पणजीचं स्वरूप सांगावं या उद्देशाने सरदेसाई म्हणाले, ' सोळाव्या शतकापूर्वी हे एक फार लहान गाव होतं. गोमंत

नावाच्या टेकडीच्या पायथ्याला मांडवी नदीच्या तीरालगत पाच सहा झोपड्या न् आठ दहा कौलारू घरं, तीही तुटक तुटक अंतरावर, अधून मधून माडांची झाडं न् लहान लहान खाचरं.

' अशा या गावात दोन रस्ते. तेही अगदी लहान पाऊल वाटेचे.

' मोठ्या इमारती होत्या दोन, आदीलशहांचा राजवाडा. आणि त्याच्या शेजारी कॅ. मार्टीन नावाचे ते घर होते. मांडवी नदीच्या किनाऱ्याला लागूनच. त्यामुळे किनाऱ्याला जहाज लागले की जहाजातला माल घरातच उतरून घेता येत असे.

' गोवा त्यावेळी विजापूरच्या अधिपत्याखाली होता. प्रजेवर अत्याचार होत होते. त्यामुळे प्रजा त्रासली होती.

पोर्तुगालहून आल्बुकर्क पंधराशे दहा साली १२०० जहाजातून सैन्य घेऊन आला नि त्याने अदिलशहाच्या किल्ल्यावर अचानक हल्ला केला. किल्ल्यावरचा सुभेदार चैनी नि विलासी होता. दोन महिने लढा देऊन टिकाव लागेना म्हणून तो पळून गेला. अल्बुकर्कने पणजीचा किल्ला त्याचा वाडा हस्त-गत केला . आदिलशहाची २८ जहाजे न् ४५०० माणसं त्यांनं अटक केली. हिंदूंची देवळं पाडली. मुस्लिमांच्या मशिदी पाडल्या नि त्याठिकाणी चर्च उभारली. पकडलेल्या हिंदू स्त्रियांची आपल्या सैनिका बरोबर जबरदस्तीने लग्ने लावून दिली.

त्यानंतर पोर्तुगिजांचा कॅप्टन आपल्या दोनशे सैनिकासह त्या किल्ल्यात वास्तव्य करून राहिला. सैनिक रात्रीच्या वेळी पडावातून गस्त घालत. मांडवीतून येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांची कॅप्टन तपासणी करत असे. १७५९ साली पोर्तुगालचा व्हॉईसरॉय इथे राहू लागला. नंतर लेडी ऑफ इमॅक्युलेट कन्सेप्शन नावाचे एक चर्च बांधले.

' धार्मिक विचारविनिमयासाठी पोर्तुगीजांनी गोव्यात बांधलेली ही पहिलीच इमारत तिची रचना पोर्तुगाल मधील इमारतीच्या धर्तीवर केली होती.

' १५८४ साली ख्रिस्ती धर्मप्रसारक इथं आले. त्यांनी इथल्या हिंदूना सक्तीने बाटवायला सुरुवात केली. जे ख्रिस्ती होत नसत त्यांना धमक्या देऊन, मारहाण करून पण ख्रिस्ती धर्माची दीक्षा घ्यायला लावली. या बाटवा बाटवीच्या काळात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मदर चर्चच्या शेजारी एक इमारत बांधली व त्यात पोर्तुगीज शिक्षण देण्याची व्यवस्था केली.

मध्यंतरी रोगाच्या साथीने असंख्य माणसे मेली. सोसाटयाच्या वाऱ्याचा त्रास नि पाण्यातील साप वगैरे प्राण्यांचा त्रास सहन होईना म्हणून सरकार दरबारी माणसं कंटाळली. म्हणून रायबंदरावरची वस्ती उठवून पणजीत आणली.

पोर्तुगीजांच्या हाती गोव्याची सत्ता आली त्यावेळेपासून म्हणजे १५१०पासून गोव्याची राजधानी जून्या गोव्यात म्हणजे रायबंदामध्ये होती.

त्यापूर्वी गोव्यातली राजधानी चंद्रपूरमध्ये होती. आठव्या शतकात गोव्यात कदंबाची सत्ता प्रस्थापीत झाली त्यावेळी चांदरमधून गोव्याचा राजकारभार चालत असे.

चंद्रपूर वहातूकीच्या दृष्टीने थोडे गैरसोईचे होते. म्हणून आठशेवर्षां नंतर त्यानी आपली राजधानी जुन्या गोव्यात आणली.

' पणजी हे पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदर असल्यामुळे पाश्चि–मात्यांना पूर्वेकडील राष्ट्रांशी संबंध ठेवताना पणजी बंदरातूनच जावे लागे. त्यामुळे पणजीला व्यापारी दृष्टया फार महत्त्व होते.

' दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मात्र इथला व्यापार कोलमडला अरब आले नि त्यांनी इथली व्यापारी नीतीच बदलून टाकली. आणि पणजी हे चोरटया व्यापाराचे केंद्र बनविले.

' एकोणिसाव्या शतकाच्या आरंभकाळात पणजीत दोनशेक घरांनी वस्ती वाढली. जुन्या गोव्यातले हायकोर्ट, सरकारी दफतर, पणजीत म्हणजे

नव्या गोव्यात आणले. त्यानंतर पणजीला पोर्तुगाल सरकारकडून पोर्तुगाल-मधील शहरांचा दर्जा देण्यात आला

' पोर्तुगीजांची सत्ता असल्यामुळे पोर्तुगीज भाषेत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. खेडयापाडयात मराठी, उर्दू शिक्षण देणाऱ्या शाळा होत्या. पण त्यांना सरकारी मान्यता नसे. त्यामुळे त्या शाळातून शिक्षण देणे योग्य वाटत नसे. उलट पोर्तुगीज भाषेतून शिक्षण घेणाऱ्यांना सरकार दरबारी लवकर नोकरी मिळत असे.

' उत्तरेच्या तेरेखोलच्या खाडीपासून दक्षिणेस कारवार पर्यंत नि सह्याद्रीपर्यंत पश्चिम अरबी समुद्रापर्यंतच्या गोव्याच्या भमीवर पोर्तुगीजांची सत्ता होती. गोव्यात पोर्तुगीज भाषेत शिक्षण देणारे महाविद्यालय फक्त एक होतं. तेही पणजीत. त्याला लिसव म्हणत. त्या विद्यालयात तीन वर्षांचा अभ्यासक्रम असे तो अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्याला सरकारी दरबारी नोकरी मिळत असे. अगर पोर्तुगालमध्ये नोकरी मिळत असे.

त्या विश्वविद्यालयात पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्याच मुलांना अग्रक्राने प्रवेश मिळत असे. हिंदूंच्या मुलांना क्वचित प्रवेश मिळत असे. पण ख्रिस्तांच्या म्हणजे मेस्तीस विद्यार्थ्यांचे हिंदूच्यावर वर्चस्व असे.

' पोर्तुगीजांच्या राज्यात मोठी शिस्त होती म्हणतात.'

' होय. '

' पोर्तुगीजांच्या राज्यात मोठी शिस्त होती पण कामात फार दिरंगाई चाले.' ' सरकारी दरबारी ओळख असणाऱ्या माणसांचीच कामे लवकर होत. '

' पोर्तुगीज राज्यकर्ते विलासी नि चैनी होते म्हणतात. '

' होय, चैनी नि विलासी, रंगेल होते. खाणे पिणे नि मजा करणे यातच ते जास्त मग्न असत. त्यामुळे इथला कारभार मंद गतीचा होता.
क्षुल्लक कारणांसाठी माणसांना दिवस दिवस थांबून रहावे लागे. कोर्टाचे निकाल तर कित्येक वर्षांनी लागत.

' पोर्तुगीज लोक राष्ट्रीय उत्सवांना फार महत्व देत. एखाद्या थोर व्यक्तीच्या दर्शनापेक्षा पोर्तुगीज गव्हर्नरला पहाण्यात जास्त समाधान मानीत.

' पणजीत पुढे मराठी शिक्षण देणाऱ्या काही संस्था निर्माण झाल्या. हिंदूविषयी दीर्घ दृष्टीने विचार करणारी काही मराठी घराणी त्या काळी पणजीत होती. नायक, कामत, दिघे या घराण्यातल्या काही माणसांनी शिक्षण कार्यात जास्त परिश्रम केले होते.

' बाटवाबाटवीच्या काळात पोर्तुगीज राज्यकर्ते हिंदू स्त्रियांची अब्रू घेत असत. '

जार्व्हिन बागेत संध्याकाळी मेस्तीस तरुणी आणि पोर्तुगीज तरुण यांचे प्रेमचाळे चालत. जसजशी रात्र होत असे तसे त्यांना रंग चढत असे. सायंकाळी तिथं जाऊन बसायची कुणाची छाती नसे. उंच स्तंभावर असलेल्या अल्बुकर्कच्या पुतळ्यासमोर हे चाळे चाललेले असायचे.

' ख्रिस्ती धर्माचा प्रसार कसा जास्त होईल याकडे पोर्तुगिजांनी जास्त लक्ष दिलं. विज्ञान प्रगतीच्या बाबतीत त्यांनी विशेष असं काही केलं नाही. साडेचारशे वर्षांच्या कारकीर्दीत त्यांना एखादी भव्य अशी वास्तु गोव्यात उभारता आली नाही. पणजी शहर सोडलं तर इतर कुठल्याही शहरात नगररचनेच्या दृष्टीने त्यांनी नवी दृष्टी अनुसरलेली दिसत नाही.

' पणजीला गोव्याच्या राजधानीचे शहर म्हणून महत्व. नगररचना म्हणून जगातल्या इतर राजधान्यांच्या शहरांशी तुलना करता पणजीत अजून पुष्कळ उणीवा आहेत. '

♥♥

# ६

'गोव्यातली पहिल्या दिवशीची दुपार. स्नानादि नित्यक्रम आटो-पल्यानंतर सीतेकडं पहात मी म्हटलं, 'आज पणजी शहर पाहू नि उद्या पणजीबाहेरची स्थळं पाहू.'

'बरं, सीता म्हणाली, 'निघू या तर मग–'

तेवढयात शेजारच्या खोलीतले गृहस्थ आले, ते माझ्याकडं पहात म्हणाले, 'चला, मी पण येतो तुमच्या बरोबर. सकाळपासून एके ठिकाणी बसून कंटाळा आलाय.,

'तुम्ही येत असाल तर बरेच होईल मी आदराच्या भावनेतून म्हणलो 'कारण पणजीची मला पण विशेष माहिती नाही.'

'आलो हं.' असे म्हणत ते खोलीत गेले न् छत्री घेऊन आले.

चार वाजता आम्ही टुरिस्टमधून बाहेर पडलो नि डाव्याबाजूच्या बोळात वळलो.

पुण्यातल्या सदाशिव पेठेतल्या बोळासारखे होते ते बोळ. इतकं अरुंद की पुढून एखादी रिक्षा आली तर रस्त्याच्या बाजूच्या इमारतीला टेकून उभे रहावे लागेल, तेव्हा ती रिक्षा पुढे जाईल. इतके अरुंद होते ते बोळ.

दहावीस पावलं चालून गेल्यावर तो बोळ संपला नि पूर्वेकडून आलेला एक रस्ता त्या रस्त्याला येऊन मिळाला. रस्त्याच्या पलीकडे

दगडी भिंत होती. रस्ता ओलांडून आम्ही भिंतीजवळ गेलो. तेव्हा भिंतीच्या पलीकडून वहात असलेला फाटो कालवा दिसला.

नालाच्या आकाराचा तो कालवा पूर्वेकडे येऊन पणजीच्या पोटात घुसला आहे. त्याने पणजीची चिरफाड केली नि डाव्या बाजूला वळण घेतलं आणि पणजीला बगल देऊन तो दक्षिणेस गेला.

काँक्रीटने बांधून काढलेल्या त्याच्या अलिकडच्या किनाऱ्याला टेकून आम्ही उभे होतो.

समोरच्या दिशेला बोट उभारून मी सीतेला म्हणालो, 'हा पणजी शहराचा पूर्वेकडचा विभाग, त्याचे नाव फाँटेन हॅस. मळा या नावानेही काहीजण या भागाला ओळखतात.'

कालव्यातील पाण्याकडे पहात अवी म्हणाला, 'नदीसारखा याचा खळखळाट नाही की, समुद्रासारखी गर्जना नाही.'

पलीकडच्या तीरावर डेरेदार आकाराच्या झाडांची रांग होती.

बदराकडून जाऊ या, असे म्हणून ते गृहस्थ पाठीमागे वळले.

आम्ही बोलत चाललो होतो. दहा वीस पावलं चालून गेलो तेव्हा रस्त्याची माहिती सांगावी म्हणून ते गृहस्थ म्हणाले,

'हा जोवाअदि कॅस्ट्रो रस्ता, जोवाअ दि कॅस्ट्रो हा पोर्तुगीज व्हॉईसरॉय. त्याच्या स्मरणार्थ या रस्त्याला त्याचं नाव दिलं आहे.'

पूर्वेकडून आलेला रस्ता भेटला.त्या रस्त्याने आम्ही चालत राहिलो.

समोरच्या इमारतीकडे बोटाने दाखवित ते गृहस्थ म्हणाले, 'हा आदिलखान पॅलेस अल्बुकर्कने पणजीचा किल्ला जिंकला, त्यावेळी हा राजवाडा अल्बुकर्कच्या ताब्यात गेला. त्यानंतरच्या काळात या वाड्यात पोर्तुगालचा व्हाइसरॉय रहात होता. आता गोवा सरकारचं कार्यालय आहे.'

आदिलखान पॅलेस ओलांडून पुढे गेल्यावर एक पुतळा दिसला त्याकडे पहात अवी म्हणाला, 'हा कोणाचा पुतळा?'

मी म्हणालो, ' आबे फॉरियाचा. '

' आबे फॉरिया कोण ?' त्याने तपशील विचारला.

' जगप्रसिद्ध मोहिनी शास्त्रज्ञ. '

' अस्सं !'

' होय, मोहिनी टाकून तो कोणालाही वश करून घेत होता म्हणतात. त्या बाईच्या डोळ्यावर त्याने मोहिनी टाकली आहे.

' कुठला हो तो शास्त्रज्ञ?'

' गोव्यातलाच, कांदोली गावी त्याचा जन्म झाला. '

' कुठं आहे ते गाव? '

उत्तरेकडे बोटाने दाखवीत मी म्हणालो, ' तो शास्त्रज्ञ पोर्तुगालमध्ये स्थाईक झाला. '

बंदरावरुन पुढे गेल्यावर समोरच्या इमारतीकडे पहात ते गृहस्थ म्हणाले.

'हे महामई सरकार,हा महामई कामतांचं वाडा, गोव्यातले प्रति सरकार कामतआडनांव आणि महामई हे देवतेचे नाव. पोर्तुगीजांनी धर्मान्तराचा धुमाकूळ घातला तेव्हां गिरदोळी हे आपले मूळचे गांव सोडून हे कामत घराणे १८०० साली पणजीत आले. पणजीत आल्यावर त्यांनी, घरे घेतली. जमिनी घेतल्या शेती घेतली. महामई कामतांचे साठ एक माणसांचे एकत्र कुटुंब या किल्ल्यासारख्या दिसणाऱ्या वाडयात वास्तव्य करुन आहे पुष्कळ दालनं आहेत या वाडयात. त्या शिवाय देव्हरा वेगळाच. देव्हाऱ्यात उजवा शंख आहे. त्याला ते फार पवित्र मानतात. तो पोर्तुगीज सरकारकडून त्यांना भेट मिळालेला आहे. त्याची पूजा अनंत चतुर्दशीचे दिवशी मोठ्या उत्सवाने होते. हजारो लोक त्या दिवशी येऊन अनंताचे दर्शन घेऊन प्रसाद घेऊन जातात. त्यावेळी सहस्त्र भोजनाचा कार्यक्रम होतो. आलेल्या सर्व निमंत्रितांना भोजन दिले जाते.

' सावंतवाडीचे खेम सावंत राजे नि पोर्तुगीज सरकार यांच्यात देवाणघेवाणीचे जे करार झाले होते ते या हाऊस ऑफ म्हामाईमध्येच.

खेमसावंतांचे नि कोल्हापूरच्या महाराजांचे मतभेद झाले त्यावेळी सावंतांनी मागण्यासंबंधीची बोलणी केली होती ती याच वास्तूमध्ये. '

ते चालत होते नि आम्ही त्यांचे बरोबर चाललो होतो. थोडे पुढे गेल्यावर ते म्हणाले, 'आपण ज्या विभागातून चाललो आहोत, त्याला सेंट इनेज म्हणतात. पणजीतला हा मध्यवस्तीचा भाग. '

समोरच्या मोठ्या इमारतीकडे बोट उभारून ते गृहस्थ म्हणाले, ' हे पणजीतील चर्च, चर्च ऑफ अवर लेडी ऑफ इमॅक्युलेट कन्सेप्शन, या चर्चमधली बेल फार जुनी नि प्रसिद्ध आहे.

सीता न अवी चर्चकडे पहात होती ते गृहस्थ म्हणाले.

पोर्तुगालचा चौथा राजा याने कॅप्टन लिश व त्याचे साथीदार यांच्यामार्फत गोव्यात प्रसिद्धीसाठी एक जाहीरनामा व जयघोषपत्रक आदीचे कागद पाठविले होते. कॅप्टन लिश ते कागद घेऊन गोव्यात आला.

जहाज गोव्याच्या किनाऱ्याला लागताच लिशला समजले की, इथे डच लोकांचे आरमार आहे. अशी कुणकुण लागताच त्यानं आपल्या कार्यक्रमात बदल केला. पणजीच्या किनाऱ्याला न थांबता पुढे आमाद कामाचा गावी गेले. मात्र जाहीरनामा पोच करण्यासाठी त्याने आपल्या नऊ वर्षाच्या मुलाला पणजीत पाठविला.

' तो मुलगा धीट होता. तो आला त्यावेळी या चर्चमध्ये हजारो ख्रिश्चन स्त्री पुरुष उपस्थित होते. त्या अफाट जनसमुदायापुढे जाहीरनामा त्याने धीटपणाने वाचून दाखविला. '

' समोरच्या दिशेला बोट उभारुन मी म्हणालो, ' त्या इमारतीत गोवा पुराभी लेखा आहे. '

' गोवा पुराभी लेखा म्हणजे ? ' माझ्याकडे पहात अवी म्हणाला.

' म्हणजे, जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांा संग्रहालय. हे संग्रहालय पोर्तुगीज व्हाईसरॉयच्या देखरेखीखाली चालत होते. प्राचीन काळापासूनचे महत्वाचे कागद, या संग्रहालयात आहेत.'

'मुंबईतल्या म्युझियमसारखे का ? ' सीता.

' राजकीय संबंध दर्शविणारे, व्हॉईसरायचे पोर्तुगालच्या राज्याशी झालेल्या पत्रव्यवहाराचे, अठराव्या शतकात गोव्यात आलेला डच, फ्रेंच,

इंग्रज यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहाराचे, चीन, जपान, आदि बाह्य राष्ट्रांशी झालेल्या करारपत्राचे असे कितीतरी ऐतिहासिक संबंध दर्शविणारे कागद इथं आहेत. या संग्रहात सहाशेच्या वर मोठ्या ग्रंथाचा समावेश आहे.'

'पोर्तुगीजांची दूरदृष्टी इथं दिसते.' गोवा पुरा मी लेखा कडे पहात मी म्हणालो, " इतर ठिकाणी वस्तु संग्रहालयं असतात. पण येथें पुराणी कागदपत्रांचा संग्रह जतन करून ठेवलेला आहे.'

ज्या मार्गावरून आम्ही चाललो होतो त्याच्या दोन्ही बाजूना स्टेशनरीची दुकाने होती. अधूनमधून मशिनरीचे मोठमोठाले स्टॉल भेटत. कुठं एखादे दारुविक्रीचं दुकान तर कुठं एखादं धुलाईचं दुकान दृष्टोत्पतीस येत होतं.

पुढं चौक भेटला.

डाव्या बाजूचे चर्च पाठीमागे ठेवून आम्ही पुढच्या चौकात पोचलो.

चौक ओलांडताच पाठीमागून आवाज आला, 'अहो शेलार!'

त्या आवाजाबरहुकूम मी पाठीमागे वळलो.

आवाज सिगवाल बुक हाऊसमधून आला आहे याची जाण होताच

मी उद्गारलो, 'अरे हो, सिगवाल बोलावताहेत वाटतं.'

त्या गृहस्थाकडे पहात मी म्हणालो, 'बरं, तुम्ही चलता? आम्हाला इथं थांबावं लागणार थोडा वेळ.'

'काही हरकत नाही,' असं म्हणून ते गृहस्थ गेले.

आम्ही बुक स्टॉलच्या दिशेनं निघालो.

'कोण सिगवाल?' सीतेनं हलक्या आवाजात विचारल.

'पणजीतले एक पुस्तक विक्रेते.'

बुक हाउसमध्ये प्रवेशताच चष्म्याच्या फटीतून डोकावणारे सिगवाल हसत बोलले,'म्हटलं, पुस्तकविक्रेत्याना डावलून जाणं निदान लेखक लोकांना

तरी शोभत नाही. कारण लेखकांच्या विचारांचे संग्रह म्हणजेच पुस्तकं नि पुस्तकाचे चलन वलन करून प्रसार करणारे आम्ही पुस्तक विक्रेते. तेव्हा आमचा म्हणजे वितरकांचा लेखकांच्या विचारांशी फार निकटचा संबंध आहे, हे निदान लेखकांना तरी विसरून चालणार नाही. '

चेहऱ्यावर हास्य आणीत मी उत्तरलो, ' खरं आहे तुम्ही म्हणता ते. पण सरळ बुकस्टॉलमध्ये आलो असतो तर तुमचा समज झाला असता की हे पुस्तकं खरेदीसाठी आले की काय ?'

गोऱ्या कांतीच्या, पातळ अंगलटीच्या, आकर्षक व्यक्तिमत्व लाभ–लेल्या त्या गृहस्थाकडे बोट उभारून मी म्हणालो, ' हे सिगबाल, या स्टॉलचे मालक. '

हात जोडीत ती बोलली, ' नमस्कार. '

समोरच्या खुर्चीकडे बोटाने दाखवीत सिगवाल म्हणाले ' बसा '

टूरसाठी आला आहात ? ' मजकडे पहात सिगवाल बोलले.

' होय '

' अवीकडं पहात ते म्हणाले, ' नाव कायरे तुझं ?'

' अविनाश. '

इतकें संभाषण होते तेंवढ्यात एक मुलगा चहा घेऊन आला व किटलीतला चहा कपात ओतू लागला.

' बरं, उतरलात कुठं ? सिगबालनी दुसऱ्या मुद्याला हात घातला,

चहाचा कप तोंडापासून बाजूला घेत मी म्हणालो, ' टुरिस्ट हॉटेलमध्ये. '

मिस्किल हास्य करीत सिगबाल म्हणाले, ' सिगबालकडे आला असता तर का झिडकारले असते त्यांनी तुम्हाला ? '

' झिडकारले नसते, पण . . . '

' आम्हाला थोडा त्रास झाला असता असंच ना ? '

' हो, तसंच म्हणायच होतं मला. '

पण काय हो,' वेगळ्या मुद्याकडे वळत मी म्हणालो, 'बुकसेलिंगच्या व्यवसायात आपणास रस वाटतो ? '

‘ का नाही वाटणार ? अहो, गेली तीस वर्षे मी या व्यवसायात आहे. ’

‘ आपल्या बुकस्टॉलमधून दरवर्षी जेवढ्या पुस्तकांचं वितरण होतं त्यात कोणत्या भाषेतल्या पुस्तकांचं वितरण जास्त होतं ? ’

‘ इंग्लिश,’

‘ त्याचं कारण ? ’

‘ त्याचं कारण इथं इंग्लिश भाषेमधून बोलणारे नि वाचन करणारे वाचक जास्त आहेत. ’

मी म्हणालो, ‘ गोव्यात मराठी भाषिक समाजही काही कमी नाही. ’

‘ हो की, पण त्यातले नियमितपणे वाचणारे वाचक किती ? फार थोडे. ’

‘ ग्रंथांचं वितरण जास्त जलद गतीने नि मोठ्या प्रमाणात व्हावे यासाठी आपली विशेष अशी काय उपाययोजना ?

‘ वर्तमान पत्रात जाहिरात देणे याशिवाय वेगळी अशी काही योजना नाही. ’

‘ आमच्याकडील पुण्या मुंबईच्या मौज, पॉप्युलर, मॅजेस्टिक या प्रकाशन संस्था ग्रंथवितरणाचे बाबतीत फार परिश्रम करतात. ’

‘ परिश्रम करतात म्हणजे नक्की काय करतात ? ’

‘कांही मान्यताप्राप्त ग्रंथांचे परिक्षण वृत्तपत्रातून आणून त्या ग्रंथांची ओळख वाचकांना करून देतात. मान्यताप्राप्त ग्रथांचे प्रकाशन समारंभ घडवतात, सदर ग्रंथांच्या लेखक वाचकांमध्ये चर्चा, परिसंवाद घडवून आणतात. त्यामुळे त्या ग्रंथांची वाचकांना चांगली ओळख होते. ’

‘ हं, या पद्धतीने ग्रंथांची प्रसिद्धी जास्त लवकर होईल. ’

‘ पाश्चिमात्य देशातल्याप्रमाणे सर्क्युलेशन पद्धतीनेही ग्रंथांचे वितरण करण्याच्या बाबतीत मुंबईतले मॅजेस्टिक प्रकाशनचे केशव कोठावळे नि बॉम्बे बुक डेपोचे पांडुरंग कुमठा यांनी विशेष असे उपक्रम केलेत. ’

‘ ते कसे ’ ?

'मॅजेस्टिक सरक्युलेशन पद्धतीने ग्रंथांचे वितरण जलद गतीने, बॉम्बे बुक डेपोचा याहीपेक्षा वेगळा असा उपक्रम आहे.'

'कोणता ?'

'बॉम्बे बुक क्लब नावाची वाचकांच्या सोईची योजना त्यांनी वाचकांसाठी आखली आहे. स्वत:चा ग्रंथसंग्रह करावा असं त्या योजनेचे उद्दिष्ट आहे. बॉबे बुक क्लब व्दारे जे सभासद आहेत त्यांना हवा असलेला ग्रंथ बुक क्लब त्यांना यथावकाश घरपोच करते. अशी बुक क्लबची योजना आहे. त्या योजनेमुळे अनेक ग्राहकांनी आपले ग्रंथसंग्रह केले असून बॉम्बे बुक क्लब मार्फत ग्राहकांना पाहिजे असलेला ग्रंथ बुक मार्फत उपलब्ध करून दिला जातो.'

'हं, ही आयडिया फार चांगली आहे.' सिंगवाल हसत म्हणाले.

'विक्रेता कसा असावा याबाबतचे आपले मत ?'

'पुस्तके वितरणाच्या व्यवसायातला माणूस चांगला रसिक असायला हवा. तो चांगला वाचक तर हवाच, त्याशिवाय तो ग्राहकांच्या मनाचा कबजा करू शकणार नाही. जो विक्रेता दुकानात प्रवेश करणाऱ्या वाचकाचे मन जिंकू शकतो तोच खरा कुशल विक्रेता ! विक्रीच्या व्यवसायात असे फार थोडे लोक आहेत की जे विक्री मग ती पुस्तकांची असू दे अगर अन्य वस्तूची असू दे विक्रेत्याची ग्राहकाशी भाषा चांगली असावी. विक्रेत्याचा स्वभाव मनमिळावू असावा. ग्राहकाच्या मनाला कोणत्याही प्रकारे न दुखवता समधानाने परत पाठवण्याचे कसब विक्रेत्यापाशी असलं पाहिजे.'

'खरं आहे, हे गुण ज्या विक्रेत्याकडे आहेत त्याला जास्तीत जास्त नफा मिळवता आला नाही तरी तो तोटयात येणार नाही. त्यानं जेवढ्या जास्त ग्राहकांची मर्जी संपादन केली तेवढा आपणाला फायदा झाला असं तो समजतो नि त्यातच तो समाधान मानतो'

सिंगवाल हसले.

घडयाळ पाहून मी म्हणालो, 'बराय, निघतो.'

पुस्तकं पाहण्यात गुंतलेले सीता व अवीनाश उठले.

स्टॉलच्या बाहेर पडल्यावर आम्ही अल्तीनोच्या रस्त्याला लागलो.

डाव्या बाजूला अल्तीनो टेकडी नि उजव्या बाजूला पणजीचा संथ

उजेड. रस्ता होता काँकीटचा. झाकला होता त्याला दोन्ही बाजूंच्या वृक्षांच्या शीतल छायेने. दहा पंधरा मिनिटाच्या अंतराने भेटत होती वळणं नि विविध प्रकारची दृश्ये. त्यामुळे चालण्याचा त्रास जाणवत नव्हता.

चढाचा रस्ता लागल्यावर अवी म्हणाला, ' रस्ता डोंगरावर चालला आहे की काय ?

' डोंगर नाही, ' मी म्हणालो, ' टेकडी आहे ही, अल्टीनो हिचं नांव. अल्टीनो नावच्या पोर्तुगीज गृहस्थाच्या स्मरणार्थ हे नाव दिलं आहे या टेकडीला.

' साताऱ्यातल्या माची पेठेतून बोगद्याकडे जाणाऱ्या मार्गासारखा दिसतो आहे हा मार्ग. ' अवी उद्‌गारला.

' समर्थ मंदिराकडे जातो तो का ? ' सीता.

' साताऱ्यातली माची पेठ कसली ? ' तुलनेतला फरक दाखवून द्यावा म्हणून मी उद्‌गारलो.

' इथं ठराविक अंतरावर मोठमोठे बंगले आहेत. नि भोवताली उंच उंच झाडं आहेत. माचीतल्या रस्त्यांत् नि या रस्त्यात कोणता सारखेपणा आहे ? '

समोरच्या इमारतीकडे पहात मी म्हणालो, ' ही आकाशवाणी केंद्राची इमारत. '

आकाशवाणीला उजव्या बाजूला ठेवून आम्ही अेक वळण पास केलं. तेव्हा अुंचीवर आलो याची जाणीव झाली.

' हा अल्टिनो, पणजीतला सर्वात उंच भाग. '

समोरच्या दिशेला बोट दाखवून मी म्हणालो, ' तिथे मुख्यमंत्र्यांचा बंगला आहे. '

' मुख्यमंत्र्यांचं नाव ? '

' दयानंद बांदोडकर. '

' तिकडे चला. ' असं म्हणून मी उजव्याबाजूस वळलेल्या रस्त्याला वळलो.

' अल्तिनो हे पणजीतलं निसर्ग संपन्न नि उंचीवरचे ठिकाण.' चालत चालत मी बोलत होतो, आजूबाजूस पहात हे चालले होते.

' तो बिशप पॅलेस. १७ व्या शतकात आर्च बिशप त्या पॅलेसमध्ये राहात असे. '

पॅलेस समोर असलेल्या येशु ख्रिस्ताच्या पुतळ्याकडे पहात आम्ही उभे होतो. पुतळ्यासमोर सात आठ माणसं उभी होती. त्यातली एक महिला म्हणाली, ' गोव्याच्या भूमीवर प्रथम पाऊल ठेवणारा कार्डीनन नॉर्मल गिलराय याचे स्वागत याच पॅलेसमध्ये करण्यात आले होते. '

ती माणसं बाजूच्या रस्त्याला वळली.

आम्ही त्यांच्या मागे होतो

समोरच्या दिशेला बोट उभारून ती महिला म्हणाली, ' ती वेध–शाळा. शंभर वर्षापूर्वी या ठिकाणी दहा बारा घरं नि एक विहीर होती.'

समोरच्या इमारतीकडे बोट दाखवीत ती म्हणाली. '

' ते दैनिक नवहिंद टाईम्सचे कार्यालय. '

' दै नवहिंद टाइम्स हे गोव्यातलं इंग्रजी भाषेतलं पहिलं दैनिक वसंतराव धेपे व वैकुंठराव धेपे यांनी सुरू केले. '

त्यांच्याबरोबर आम्हीहो ते स्थळ सोडलं.

सीतेकडे पहात मी म्हणालो, ' आपण ज्या मार्गावरून चाललो आहोत तो दयानंद बांदोडकर मार्ग '

ते पुढं चालले होते नि आम्ही त्यांचे मागून चाललो होतो.

' ती इन्स्टीटयूट वास्को डी. गामा. १८७१ मध्ये या संस्थेची स्थापना केली. गोव्यात लॅटीन संस्कृतीचा ठसा उमटला जावा, सांस्कृतिक देवाण घेवाण व्हावी, अशा उद्देशाने लिस्बनच्या राजाच्या परवानगीने या

संस्थेची स्थापना करण्यात आली होती. या संस्थेत साहित्य, कला आणि विज्ञान यांचा अभ्यास होत असतो.'

'या संस्थेचे संस्थापक टोमाज रिबो अिरा. हा पोर्तुगालमधला मोठा साहित्यिक. उद्घाटनप्रसंगी जे भाषण त्यानं केलं त्यात सांगितलं की, 'गोव्यातल्या लोकांमध्ये बौद्धिक जास्त आहे. त्या प्रसंगी येथे साहित्याचे मोठे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

'या संस्थेत आता जी लायब्ररी आहे तिच्यात जगातल्या बहुतेक राष्ट्रातल्या मोठमोठ्या ग्रंथांचा समावेश आहे. या संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्याला एक प्रसिध्दीपत्रक काढण्यात येते.'

'या संस्थेची स्थापना फ्रेंच अॅकॅडमीच्या धर्तीवर केली आहे, जी आज जगात चांगल्या प्रतीची मानली जाते. अशी सरकारी मुद्रणालयं अिथं आहेत त्याचा काही भाग संस्थेस दिला आहे.

'या संस्थेचा बराच खर्च हितचिंतकांनी दिलेल्या देणग्यावर केला जातो. टोमाज रीबोईरो हा पोर्तुगालला गेला, त्यानंतर संस्थेची देखभाल कोणी विशेष आस्थेने केली नाही. त्यामुळे काही काळ संस्थेचे कामकाज मंद गतीने चालले होते. पुढे पन्नास वर्षांनंतर म्हणजे १९२५ मध्ये गव्हर्नर जनरलने दहा हजार रुपयांचे अनुदान दिले होते. त्यामुळे पुढे या संस्थेचे कामकाज पूर्ववत सुरु झाले.'

पुन्हा त्या महिलेने आम्हा सर्वांचे लक्ष मिलटरी हॉस्पिटलकडे वेधले ती म्हणाली, '१८४८ पासून हे पणजीत आणले, मिल्ट्री कँपा पासून दूर असल्यामुळे ते हलवणे भाग पडले. यामध्ये नामवंत डॉक्टर्सनी कामे केली आहेत. सोळाव्या शतकात जे जे युरोपियन गोव्यात येऊन गेले त्या सर्वांनी या हास्पिटलची चांगली प्रशंसा केली. १६६२ पासून या संस्थेत औषधांच्या अभ्यासाची सोय करण्यांत आली. डिग्री कोर्स

तीन वर्षाचा होता तो चार वर्षाचा करण्यात आला. मेडिसीनच्या बाबत या महाविद्यालयातले डॉक्टर जगातल्या अनेक राष्ट्रातल्या डॉक्टराशी विचारविनिमय करीत असत.'

गोव्यातल्या मिलिटरी संबंधी बोलताना ती महिला म्हणाली,

' इंग्लंडचा सातवा एडवर्ड द् प्रिन्स ऑफ वेल्स याने १८७५ साली गोव्याला भेट दिली. पोर्तुगीज सैनिकांनी त्याचे स्वागत त्यावेळी बोटीतून केले.

' त्यावेळी येथील सैन्याची कवायत बघून त्याला समाधान वाटले.'

अवी म्हणाला, ' मुंबईला गेल्यावर मलबारहिलवर जे समाधान मिळते ते इथं मिळत नाही.'

कारण सांगावं म्हणून मी बोलणार तेवढ्यात सीता म्हणाली, ' टूरिस्ट हॉटेल कुठं आहे ?'

माझं सहाय्य घ्यावं या हेतूने मजकडे पहात अवी म्हणाला, ' कुठं आहे आण्णा ?'

समोरच्या दिशेला बोट उभारून मी म्हणालो, ' ते तिरंगी निशाण दिसतंय ना ? ते सचिवालय नि त्याच्या अलिकडे जी उंच इमारत दिसतेय ते टूरिस्ट हॉटेल.'

आम्ही आल्टिनोच्या माथ्यावर होतो. तरी लांब अंतरावरची मांडवी आमचं लक्ष वेधून घेत होती. खाडीच्या पलिकडचं बेती गाव काश्मीरमधल्या जलनगराची आठवण करून देत होतं. (मांडवीतून असंख्य गलबत व्हेरी बोटी ये जा करत होती. )

' वा वा. काय पण कल्पना केलीत !' स्मितहास्य करीत सीता म्हणाली, ' बाकी लेखक होण्याऐवजी कवी झाला असता तर · '

' छान छान कविता केल्या असत्या नाही कां ग ' अवीनं तिचं विधान पूर्ण केलं.

' बरं, संपला का तुमचा परिसंवाद !'

' का ?'

संस्थेची स्थापना करण्यात आली होती. या संस्थेत साहित्य, कला आणि विज्ञान यांचा अभ्यास होत असतो.'

'या संस्थेचे संस्थापक टोमाज रिबो अिरा. हा पोर्तुगालमधला मोठा साहित्यिक. उद्घाटनप्रसंगी जे भाषण त्यानं केलं त्यात सांगितलं की, 'गोव्यातल्या लोकांमध्ये बौद्धिक जास्त आहे. त्या प्रसंगी येथे साहित्याचे मोठे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

'या संस्थेत आता जी लायब्ररी आहे तिच्यात जगातल्या बहुतेक राष्ट्रातल्या मोठमोठ्या ग्रंथांचा समावेश आहे. या संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्याला एक प्रसिध्दीपत्रक काढण्यात येते.'

'या संस्थेची स्थापना फ्रेंच अॅकॅडमीच्या धर्तीवर केली आहे, जी आज जगात चांगल्या प्रतीची मानली जाते. अशी सरकारी मुद्रणालयं अिथं आहेत. त्याचा काही भाग संस्थेस दिला आहे.

'या संस्थेचा बराच खर्च हितचिंतकांनी दिलेल्या देणग्यावर केला जातो. टोमाज रीबोईरो हा पोर्तुगालला गेला, त्यानंतर संस्थेची देखभाल कोणी विशेष आस्थेने केली नाही. त्यामुळे काही काळ संस्थेचे कामकाज मंद गतीने चालले होते. पुढे पन्नास वर्षांनंतर म्हणजे १९२५ मध्ये गव्हर्नर जनरलने दहा हजार रुपयांचे अनुदान दिले होते. त्यामुळे पुढे या संस्थेचे कामकाज पूर्ववत सुरु झाले.'

पुन्हा त्या महिलेने आम्हा सर्वांचे लक्ष मिलटरी हॉस्पिटलकडे वेधले ती म्हणाली, '१८४८ पासून हे पणजीत आणले, मिल्ट्री कँपा पासून दूर असल्यामुळे ते हलवणे भाग पडले. यामध्ये नामवंत डॉक्टर्सनी कामे केली आहेत. सोळाव्या शतकात जे जे युरोपियन गोव्यात येऊन गेले त्या सर्वांनी या हास्पिटलची चांगली प्रशंसा केली. १६६२ पासून या संस्थेत औषधांच्या अभ्यासाची सोय करण्यांत आली. डिग्री कोर्स

तीन वर्षाचा होता तो चार वर्षाचा करण्यात आला. मेडिसीनच्या बाबत या महाविद्यालयातले डॉक्टर जगातल्या अनेक राष्ट्रातल्या डॉक्टराशी विचारविनिमय करीत असत.'

गोव्यातल्या मिलिटरी संबंधी बोलताना ती महिला म्हणाली,

' इंग्लंडचा सातवा एडवर्ड द् प्रिन्स ऑफ वेल्स याने १८७५ साली गोव्याला भेट दिली. पोर्तुगीज सैनिकांनी त्याचे स्वागत त्यावेळी बोटीतून केले.

' त्यावेळी येथील सैन्याची कवायत बघून त्याला समाधान वाटले.'

अवी म्हणाला, ' मुंबईला गेल्यावर मलबारहिलवर जे समाधान मिळते ते इथं मिळत नाही.'

कारण सांगावं म्हणून मी बोलणार तेवढ्यात सीता म्हणाली, ' टूरिस्ट हॉटेल कुठं आहे ?'

माझं सहाय्य घ्यावं या हेतूने मजकडे पहात अवी म्हणाला, ' कुठं आहे आण्णा ? '

समोरच्या दिशेला बोट उभारून मी म्हणालो, ' ते तिरंगी निशाण दिसतंय ना ? ते सचिवालय नि त्याच्या अलिकडे जी उंच इमारत दिसतेय ते टूरिस्ट हॉटेल.'

आम्ही आल्टिनोच्या माथ्यावर होतो. तरी लांब अंतरावरची मांडवी आमचं लक्ष वेधून घेत होती. खाडीच्या पलिकडचं बेती गाव काश्मीरमधल्या जलनगराची आठवण करून देत होतं. (मांडवीतून असंख्य गलबत व्हेरी बोटी ये जा करत होती. )

' वा वा. काय पण कल्पना केलीत ! ' स्मितहास्य करीत सीता म्हणाली, ' बाकी लेखक होण्याऐवजी कवी झाला असता तर · '

' छान छान कविता केल्या असत्या नाही कां ग ' अवीनं तिचं विधान पूर्ण केलं.

' बरं, संपला का तुमचा परिसंवाद ! '

' का ? '

'का ?'... घड्याळ दाखवीत मी म्हणालो, 'साडे तीन वाजून गेलेत पूर्व नियोजित कार्यक्रमाप्रमाणे आपणाला चाराच्या आत दोना पावला या ठिकाणावरून मागे परतायचं आहे. याचं स्मरण आहे ना ?'

'होय.'

'मग चालायचा वेग वाढवा बघू' असं म्हणत मी चालीचा वेग वाढविला.'

एका तासात आम्ही तो बसस्टॉप गाठला. दोना पावलाकडं जाणारी बस उभी होती.

आम्ही तिचा आश्रय घेतला.

साडेचार वाजता त्या गाडीने आम्हाला दोना पावला या ठिकाणी पोचवलं.

पश्चिमेला अफाट दर्या, समोर अथांग खाडी, खाडीच्या पलिकडे हार्बर बंदर. तिथं नांगरून पडलेली असंख्य गलबतं. बंदराच्या पूर्वेस वास्को शहर.

माझ्या तोंडून शब्द उमटले.

'अत्युच्च प्रतीच्या आत्मिक समाधानासाठी नैसर्गिक सौंदर्याचा सीन पहावा तो या स्थळी, नयनांची तृप्ती होते ती इथंच.' मला धक्का सोडवत नव्हता. तिथला सागर किनारा माझ्या पायाला ओढणी लावत होता. तेवढ्यात गाडीचा हार्न वाजला. सारे प्रवासी गाडीकडे धावले.

अवी म्हणाला, 'आण्णा गाडी निघाली.' घाई घाईने उठलो न पळत सुटलो.

एका टॅक्सीचा आश्रय घेऊन आम्ही काबोराज निवासाकडे निघालो.

करंझाळेचा परिसर ओलांडून टॅक्सी काबोराजकडे धावत होती.

काबो टेकडीवरील वळणावळणाच्या रस्त्याच्या दुतर्फा अवर्णनीय असा निसर्ग परिसर पहात पहात आम्ही सहा वाजता काबोराज निवासाजवळ पोचलो.

तिन्ही बाजूनी समुद्र असलेल्या निसर्गरम्य अशा स्थळी गोव्याचा राजनिवास आहे. इतर कोणत्याही राजनिवासाला अशी एकांतवासाची नि निसर्ग रम्यतेची भूमी लाभली नाही.

गव्हर्नरांचे निवासस्थान पहाण्याचा परवाना आगाऊ न घेतल्यामुळे आम्हाला राजनिवास पहाता आला नाही.


काबोलच्या समुद्रकिनाऱ्याच्या बाजूने गेलेल्या रस्त्याने आमची टॅक्सी मिरामारच्या समुद्रकिनाऱ्याकडे चालली होती.

सूर्याचा अस्त होत होता. संधीप्रकाश जाणवत होता.

सहा वाजता टॅक्सीने आम्हाला मिरामारच्या किनाऱ्यावर आणून सोडले.

हे पण गोव्यातले प्रसिध्द असं सागरकिनाऱ्यावरचं स्थळ आहे, असं समजल्यावर आम्ही आमचे पाय तिकडे वळविले.

तिथं पोचलो त्यावेळी सहा वाजले होते.



' हा कुणाचा पुतळा '

' पूर्वी इथं एक गव्हर्नर होऊन गेला, ज्यानं हिंदुस्थानच्या किनाऱ्याला प्रथम स्पर्श केला होता. तो पहिला गव्हर्नर. नाव होतं त्याचं अल्बुकर्क, त्याचा पुतळा आहे हा. '

पुतळ्याचा चेहरा निरखीत अवी म्हणाला, ' मोठा करारी असावा हा माणूस. '

मी म्हटलं ' होताच तसा त्याचा दरारा. '

पुतळ्याच्या बैठकीभोवतीच्या कठड्यावर पुष्कळ माणसे बसली होती. कोण समोरच्या दर्याच्या हालचाली निरखीत होता तर कोणी गप्पात रंगला होता.

कठड्यावरची रिकामी जागा पाहून आम्ही तेथे टेकलो समोर दर्या उसळत होता. क्षणाक्षणाच्या अंतराने लाटा धावत धावत येत होत्या. समुद्राच्या क्रीडा पहात आम्ही उद्याच्या प्रवासाचं नियोजन करीत होतो.

मायबोलीत चाललेली आमची चर्चा ऐकून माझ्या शेजारी बसलेला मुलगा माझ्याकडे सरकत बोलला,

' आपण कुठले ? '

' महाराष्ट्रातले ' मी.

' कोणता गांव ? '

' कोयनानगर. '

' कोयनानगर ? सदुसष्ट साली मोठा भूकंप झाला होता. त्याचा केंद्रबिंदू कोयनानगर नावाच्या गावा जवळ होता तोच का गाव ? '

' होय– ' मी होकारार्थी मान डोलावली.

' केवढा आहे हो कोयनानगर गाव ? '

' गाव नाही, शहर आहे ते. ' मी म्हणालो, ' महाराष्ट्रातला मोठ्यात मोठा कोयना जलविद्युत प्रकल्प म्हणतात तो तिथं आहे त्या प्रकल्पामुळे होणाऱ्या वीज निर्मितीमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात फारच मोठी भर पडली आहे. '

शेजारी सागर गरजतोय. समोरच्या वाळवंटात माणसं बागडताहेत. वाऱ्याच्या झुळका मनाला उत्तेजित करताहेत. अवी सागराच्या क्रीडा पहाण्यात गढून गेला आहे.

' मन मोहित करणारं स्थळ आहे हे, ' सागराकडे पहात सीता उद्गारली.

' आता कसले पहात आहात ? ' या वाक्याने सुरुवात करीत तो तरुण म्हणाला, ' गोवा मुक्तीपूर्वी तुम्ही 'यायला हवं होतं '

' म्हणजे ? ' प्रश्नार्थक उच्चार करून मी त्याच्याकडे पहात राहिलो.

पुढचा तपशील सांगावा या उद्देशाने तो म्हणाला, ' रात्रीच्या वेळी केवढा हलकल्लोळ चाललेला असायचा या स्थळी. '

' तो कसा ? ' मी.

'सारी मानवजात दारु पिऊन धुंद असायची. त्यात बहुसंख्य ख्रिश्चन असायचे. याच वाळवंटात उघडपणाने हिंदू स्त्रियांची विटंबना चाललेली असायची. '

' असं ?' आश्चर्यचकित नजरेनं पहात मी म्हणालो, 'अन्यायाची दाद घेणारे नव्हते का कोणी ?'

' अहो, दाद मागायला जातोय कोण ?' तो बाटाबाटीचा काळ होता.'

' आ ? ' मी त्याच्या चेहऱ्याकडे पहात राहिलो.

' एवढा दरारा होता पोर्तुगीज सरकारचा. ' तो म्हणाला

' गव्हर्नरापर्यंत तक्रारी नेत नव्हते का कोणी ? '

' गव्हर्नरापुढे जायची ताकद नव्हती कुणाची ! '

तो सांगत होता, पण माझ्या अंगावर काटा उभा रहात होता. मला मोंगलाईचा काळ आठवला.

' आपला गाव कुठला ?' त्याच्याकडे पहात मी बोललो.

तो म्हणाला ' कळंगुट. '

' कुठं नोकरी ? '

' नाही, शिकतोय '

' कुठे ? '

' घेपे महाविद्यालयात. '

त्या तरुणाचं लक्ष मूळ विषयाकडे वळवण्यासाठी मी म्हणालो, ' एवढे छळत होते हिंदूना ? '

' पोर्तुगीज संस्कृतीचा वारसा गोव्यात कायमचा रहावा म्हणून गोव्याची सत्ता हाती येताच ख्रिस्ती धर्मप्रसारक मोठ्या प्रमाणात गोव्यात आले.

हिंदूंना बाटवण्यासाठी पंधराशे सत्याऐंशी साली पोर्तुगाल सरकारने एक कायदा केला. बापाच्या पश्चात हिंदूंच्या मुलामुलींनी ख्रिश्चनांशी विवाहसंबंध करावेत तरच त्यांना पोर्तुगीज सरकारचे हक्क प्राप्त होतील. हिंदूनी जानवे घालू नये. धार्मिक उत्सव करू नयेत. देवाच्या मूर्ती तयार करू नयेत. अशी बंधने त्यांच्यावर लादण्यात आली.

आणखी एक कायदा करून त्यांनी हिंदूवर डोई कर बसविला आपला धर्म आपली भाषा यापासून दूर जावे लागल्यामुळे हिंदूंची चोहोबाजूने कोंडी झाली.

' खरं आहे '

' एकोणीसशे तीस साली हिंदुस्तानात असहकारतेची चळवळ सुरू झाली. '

' होय '

'तिची झळ गोव्यात आली. गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी गोमांतकी तरुण असहकारतेचे शस्त्र घेऊन उठले. सरकारचे कायदे मोडू लागले. एकोणी-सशे शेहेचाळीस साली डॉक्टर राम मनोहर लोहिया या तरुणाने नागरिक स्वातंत्र्याचा कायदा मोडून मडगांवच्या महापालिकेसमोरील मैदानावर जाहीर भाषण केले. ' जय हिंद ' ची घोषणा केली. आणि तिरंगी झेंडा फडकविला. तशी सबंध गोव्यात लाट उसळली. असंख्य लहान थोर त्याच चळवळीत सामील झाले. नि पोर्तुगीज सरकारवर तुटून पडले. त्यावेळी पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी धूर्तपणा केला. '

' तो कसा ? '

' पोर्तुगाल स्वतंत्र झाल्यावर गोव्यात त्या पोर्तुगीजानी हिंदूंच्या करिता पुष्कळ सवलती जाहीर केल्या. नोकरांचे पगार पन्नास साठ पटीने वाढविले. त्यामुळे हिंदुस्तानातल्या नोकरापेक्षा गोव्यातील नोकराना

जास्त पगार मिळू लागला. त्यामुळे इथले हिंदू चैनीत व ख्यालीखुशालीत राहू लागले. त्यामुळे पोर्तुगीज सरकारविषयी लोकांच्या मनात आदराची भावना निर्माण झाली.'

अवी सागराच्या क्रीडा पहाण्यात गढून गेला होता. आम्ही ऐकत होतो.

तो तरुण म्हणाला, ' मँगॅनीजच्या उत्पादनामुळे गोव्याची सांपत्तिक-स्थिती सुधारली. त्यामुळे गोव्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. जगातील अनेक राष्ट्रं गोव्याशी मैत्रीचे संबंध जोडू लागली.

सागर सानिध्यामुळे गोवा हे पूर्वेकडील राष्ट्रांचे आयात निर्यातीचे केंद्र बनले. त्यामुळे इथले अधिकारी गबर झाले. ते बेताल वागू लागले. नशापान करू लागले, रंग ढंगात वावरू लागले. मौजमजा करून जीवन जगण्यात आनंद मानू लागले.'

' गोवा हा भारताशी संलग्न असला तरी त्यांचेवर पोर्तुगीज संस्कृतीचा ठसा कायमचा उठला आहे. नाही का ? ' मी म्हणालो.

' खरं आहे, ' तो तरुण म्हणाला, ' ख्रिस्ती धर्माचा प्रभावच तसा जबरदस्त पडला आहे. त्यामुळे गोवा हा पोर्तुगालचाच आहे, असे पोर्तुगीज जगाला ओरडून सांगताहेत. '

' गोव्यातल्या हिंदूंचे दास्यत्व नष्ट करण्यासाठी सतरीच्या राण्यानी मात्र जिवाचे रान केले. पोर्तुगीजांशी सामना केला. पण त्यांना पोर्तुगीजांच्या पुढं हार खावी लागली.

' सतरी महाल ताब्यात येताच पोर्तुगीजांनी राजांच्या हक्कावर गदा आणली. त्यांना मिळालेल्या साऱ्या सवलती काढून घेतल्या. त्यामुळे राणे जमात चिडली. नि पोर्तुगीजांशी झुंजत राहिली.

' दिपाजी राणे गनिमी काव्याने लढत देत होता. पोर्तुगीज गव्हर्नरने त्याला पकडण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. पण तो त्यांच्या हाती लागला नाही. दिपाजीचे बंड मोडण्यासाठी पोर्तुगीज सरकारने अतोनात पैसा खर्च केला. सतत तीन वर्षे तो पोर्तुगीजांशी झुंजत होता. बरीच गावे जिंकून

त्याने आपल्या सत्तेखाली आणली. लढाईला कंटाळून गव्हर्नर पोर्तुगालला निघून गेला.'

'राण्यांचे वंशज आता कोणी आहेत ?' मी म्हणालो.

'१९६१ साली गोवा स्वातंत्र्य चळवळीचा उठाव वाढला, गोवा क्रांतीकारकांनी भारतीयांचे सहाय्य घेतले नि पोर्तुगीज सरकारशी निकराने लढा दिला. नि गोवा मुक्त केला.

'गोव्याला स्वातंत्र्य लाभल्यावर महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाने गोव्यात आपले सरकार स्थापले. दयानंद बांदोडकर यांचे नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ बनवून गोव्यात लोकशाही पद्धतीचे राज्य सुरू झाले.'

घड्याळाकडे पहात मी म्हणालो, 'आठ वाजले बरं का.'

'अस्सं ?' सीता म्हणाली. 'मग उठूया तर.'

'हो. नऊच्या आत निवासस्थानी पोचलो नाही तर विना भोजनाचे बिछान्यावर पडावे लागेल' असं म्हणून मी उठलो.

'कां ?' अवीने प्रश्न केला.

'नऊ नंतर सारी हॉटेल्स बंद होतात.'

'असं का ?' बायको आश्चर्याने म्हणाली.

'मग चला तर लवकर,' अवी उतरला.

आम्ही चालत राहिलो.

समोरच्या पुतळ्याकडे पहात अवी म्हणाला, 'हा कोणाचा पुतळा ?'

मी म्हणालो, 'मिनेजिस ब्रांगाझ, गोव्यातले एक क्रांतीकारक लेखक आणि पत्रकार ! पुण्यात जसे लोकमान्य टिळकानी केसरी नावाचे दैनिक चालवून जनजागृतीचे कार्य लेख लिहून केले होते, त्याचप्रमाणे गोव्यात मिनेजिस ब्रांगाझ यानी 'उएराल्ड' हे वृत्तपत्र चालू केले.

'मिनेजिस ब्रांगाझ आणि त्यांचे समविचारी साथीदार यानी मिळून 'उएराल्ड' हे पोर्तुगीज भाषेतील वृत्तपत्र सुरू केले. नि त्यात ते स्वतः लिहू लागले. पोर्तुगीज सत्तेतील अन्यायाला वाचा फोडणारे त्यांचे विचार नवीन पिढीवर परिणाम करीत होते. हे 'उएराल्ड व नॅशनल लिस्ट

या दोन नियतकालिकातून ते लिहीत होते. त्याशिवाय यानी स्वतःचे असे 'द डिबेट' हे साप्ताहिक सुरू केले. द डिबेटमधील मिनेजिस ब्रांगाझच्या विचाराने नव्या पिढीच्या मनात स्वातंत्र्याविषयीची भावना बळावली. ब्रांगाझ हे गोव्यातील कौन्सिलचे सदस्य होते. गोव्यात ख्रिश्चनांचे बरोबरच हिंदू मुसलमानानाही समान नागरिकत्व मिळाले पाहिजे अशा प्रकारचे विचार त्यानी उएराल्ड मधून लिहिलेल्या लेखात निर्भीडपणे मांडले होते.

'ब्रांगाझ घराणे चांदरचे. चांदर येथील त्यांच्या वाड्यात त्यांचा एक मोठा ग्रंथसंग्रह होता. त्यात फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रजी भाषेतील असंख्य ग्रंथ होते. गांधींच्या विचाराशी साम्य असलेले क्रांतीकारी विचार त्याच्या मनात वास करीत असत. आपल्या लेखनातून व भाषणातून त्यानी धर्म व राजकारण, लोकशाही व धर्म, धर्मांतीत राजकारण व लोकशाही इत्यादि विषयावर आपले मौलिक विचार समाजापर्यंत पोहचविले. त्यामुळे गोव्यातील हिंदू व ख्रिश्चन यांच्यातील अंतर पुष्कळच कमी झाले आहे. त्या शिवाय अलिकडच्या नवीन पिढीला त्यांचे विचार जास्तच उपयुक्त ठरलेले आहेत. १९३८ साली या महात्म्याचे निधन झाले. दरवर्षी त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.'

'बरं, चलू या!'

जेवण घ्यावं म्हणून आम्ही बंदर एरियातील किरण रेस्टॉरंट नावाच्या उपाहारगृहात शिरलो.

दरवाजातून आत जाताच मासळीचा खारट वास नाकात शिरला. सीतेकडे पहात मी म्हणालो, 'अर्धा तास फिरूनसुद्धा मांसाहारीच हॉटेल लाभले.'

पाठीमागून सात आठ माणसांचं एक टोळकं आलं दरवाजातून आत येताच त्यांची बडबड कानावर आली. माझ्या जवळून ते पुढे गेले तेव्हा दारूचा वास आला.

गल्ल्यासमोरच्या खुर्चीवर एक मुलगा बसला होता. निमगोरा वर्ण. त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'महाराष्ट्रीयन पद्धतीचे जेवण मिळेल ?'

हेल काढून तो मुलगा म्हणाला, 'ना आमच्या लागी घाटावयले जेवाण तुमका मेलचाना, आमच्या लागी गोयच्या रितीचे जेवाण मिलता.'

त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'पोळी आमटी वगैरे ?'

'ना, रोटी, आमटी, हुंगार मिळपाना.' हिप्पी कटची झुलपं मागे सारीत तो म्हणाला, 'आमच्या लागी शित निस्ते हुमनं रास हे तुमका मेलास. तुम्ही म्हंगता तोसले जेवाण भारत लॉजमध्ये मेळान.'

त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'तीन राईस प्लेट.'

व्यवस्थापक खुर्चीतला तो मुलगा होता. त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'आपण हिंदु का ?'

'ना.'

'जात ?'

'मेस्तस ?' प्रश्नार्थक मुद्रेने पहात मी उद्‌गारलो, 'मेस्तसा'

तेवढयात एक मुलगा दोन ताटे घेऊन आला. आम्ही शेजारच्या खुर्चीवर बसलो. आमच्या समोरच्या टेबलावर ताटे ठेऊन तो परत गेला व आणखी एक ताट घेऊन आला.

शेजारी एक बाई उभी होती. सहावारी गोल साडी नेसलेली ती महिला ब्राह्मण कुटुंबातली असावी. ती म्हणाली 'राजघराण्यातल्या पोर्तुगीज मुलामुलींचे बाटवाबाटवीच्या काळात हिंदु मुलामुलींशी मिश्र विवाह केले. त्या मिश्र संस्कृतीतून जी जमात निपजली तिला मेस्तीस म्हणत. ही जमात जन्मतःच खिश्चनधार्जिणी.'

'का कुणास ठाऊक पण हिंदूशी जवळीकनेने रहाणे तिच्या मनाला पटत नाही हिंदूंचा द्वेष करणे हे तिच्या हाडीमासी भिनले आहे.'

'भात कालवीत मी म्हणालो, 'हा परिणाम ख्रिस्त धर्माच्या शिकवणीचा असावा.'

'आपण कोण ?' त्या बाईकडे पहात मी बोललो.

'या हॉटेलची मालकीण, मी पण महाराष्ट्रीयनच आहे. दहा वर्षापूर्वी आम्ही येथे आलो. जागा घेतली आणि उपहारगृह सुरू केले'

'इथं येण्यापूर्वी कुठं होता ?'

'गुहागरमध्ये. तिथंही आमचं एक कुटुंब आहे.'

'शेतीवाडी ?'

'शेतीही आहे. नारळ सुपारीच्या बागा आहेत.'

'तुम्ही कुठले ?

'कोयनानगर.'

'असं, कोयनानगरला आमचा एक पुतण्या आहे.'

'कोयना प्रकल्प कार्यालयात ?'

'होय, डॅम डिझाइन सर्कलमध्ये.'

'बसा नं' असे म्हणत तिनं समोरच्या खुर्चीकडे बोट दाखविले.

सीता व अवी जेवण्यात मग्न होते. मी त्या बाईशी बोलत बोलत जेवत होतो. मेस्तिसचे शिवाय इथं एक सारस्वत नावाची ब्राम्हण जमात आहे. आपल्या कडच्या कोकणस्थांसारखी. पण मांसाहार करणारी.

'सारस्वतातही दोन जाती आहेत. शंकराची पूजा करणारे त्यांना स्मार्त म्हणतात नि विष्णूची पूजा करणारे त्यांना वैष्णव म्हणतात.

'तुलनात्मक दृष्टीने जगाकडे पहावे नि त्याप्रमाणे जीवन जगावे हे सारस्वतांच्या स्वभावात आहे. मात्र एक मोठा दोष त्यांच्या स्वभावात आहे.'

'तो कोणता ?' मी उत्सुकतेने विचारले.

'तो म्हणजे स्मार्त माणूस एखाद्याच्या गुणांची तारीफ जेवढ्या

तडफेनं करील त्याच तडफेने तो आपल्या जवळच्या माणसांचे दोष स्पष्ट–पणे मांडण्यास धजणार नाही.'

'हितचिंतकात्मक दृष्टीने पहात मी म्हणालो, 'म्हणजे अशा स्वभावाचे.'

'वैष्णवांचं तसं नाही. याबाबत तो धीट. स्पष्टवक्तेपणा त्याच्यात असतो. एखाद्याच्या गुणात कुठे कमतरता आढळली तर तो स्पष्टपणाने त्यांच्यापुढे मांडील, जसा महाराष्ट्रातला मराठा तसा थोड्या पैशावर व थोडया शिक्षणावर समाधान मानून एखादे दुकान थाटून वैष्णव आपलं जीवन जगत असतो.'

'जीवनाकडे पहाण्याचा स्मार्तांचा दृष्टिकोन कोणता ?'

'स्मार्तांना वाटतं पदवीपर्यंत शिक्षण घ्यावं, सरकार दरबारी नोकरी मिळवावी आणि मानमरातबाने जीवन जगावं.'

'स्मार्तांचा वेष कसा असतो ?'

'तुमच्याकडच्या पुणेरी ब्राम्हणासारखा.'

'आणि वैष्णवांचा ?'

'कोकणस्थांच्या सारखा.'

'मध्यंतरीच्या काळात काही राजकीय स्थित्यंतरं झाली त्याचा परिणाम या सर्वांवर झाला. त्यामुळे आजच्या पिढीत वेषाबाबत बरीच भिन्नता आढळते.'

'काळाच्या बदलाचा परिणाम आहे.'

'गोव्यात यांच्याशिवाय आणखी कोणत्या जमातीचे लोक ?'

'यांच्या शिवाय भंडारी नावाची एक जमात आहे. शेती पिकवून किंवा कोवळया नारळापासून माडी काढून विकणे, भट्टी लावून दारू काढणे नि विकणे अशा अन्य उद्योगात भंडारीसमाज मग्न असतो. ह्या शिवाय कोळी म्हणून संबोधली जाणारी जमात ही गोव्यात आहे.'

आम्ही उठलो न् हात धुवून आलो. जेवणाचे पैसे दिल्यावर हॉटेल-बाहेर पडलो.

नऊ वाजले निवासस्थळी पोहोचायला.

'उद्या जुन्या गोव्यात जायचं आहे. लवकरात लवकर पणजीतून बाहेर पडायला हवं.' सकाळी १०।३० वाजता टुरिस्ट बसने जुन्या गोव्यास जायचं असं सांगून मी बिछान्यावर पडलो.

# ७

दहा तीसला बसने हॉर्न दिला.

हॉर्नचा आवाज ऐकताच टूरिस्ट कचेरीत बसलेल्या लोकांनी टुरी-झमच्या कचेरीचा जिना उतरला. आणि बसचा आश्रय घेतला.

दुसरा हॉर्न वाजताच इंजिन धडधडलं. एक दीर्घ उसासा टाकून बसने टुरिस्ट कचेरीचा निरोप घेतला.

बसने स्थानक सोडताच दरवाज्यालगतच्या सीटवर बसलेला तरुण उठला. सर्वांच्यावर दृष्टिक्षेप टाकीत तो म्हणाला, ' नाउ अवर बस इज गोइंग टू दि ओल्ड गोवा. '

' ते कोण हो ? ' त्या तरुणाकडे पहात अवीने मला प्रश्न केला.

मी म्हणालो, ' गाईड, प्रवाशांना स्थळांची माहिती सांगणारा माणूस, गाईड म्हणतात त्याला.'

अवीच्या शंकेचे निरसन करीपर्यंत बसने एक वळण घेतले नि ती मुख्य रस्त्याला लागली.

पणजींतल्या जोवाअ दि कॅस्ट्रो रस्त्याने बस चालली होती.

सचिवालय, डाकघर, मांडवी ब्रिज या स्थळांना मागे टाकून ती पणजीबाहेर पडली.

आता आमच्या नजरांचा पल्ला वाढला. ज्या नजरा मघाशी इमारतीच्या पलीकडे जाऊ शकत नव्हत्या त्या आता दक्षिण क्षितिजापर्यंत जाऊन पोहचत होत्या.

वेगवान झालेली बस वाऱ्यासारखी धावत होती. चित्रपटाच्या पडद्यावरची चित्रं हळूहळू बाजूस सरकावी तशी डाव्या बाजूची मिठागरे हळूहळू मागे सरकत होती नि डाव्या बाजूची मांडवी बसच्या विरोधी दिशेने धावत होती.

उजव्या बाजूला बोटाने दाखवीत गाईड म्हणाला, ' धीस इज रायबंदर. इट हॅज मच इंपॉर्टन्स. इट वॉज कनेक्टेड वीथ बीग सिटीज इन्टू वर्ल्ड फॉर कर्मशिअल परपज द शिल्ड ऑफ फॉरीन कंट्री.'

गाईडचं बोलणं समजलं नाही म्हणून अवी माझ्याकडे पहात राहिला.



मी म्हणालो, ' हे रायबंदर. अठराव्या शतकात या बंदराला फार महत्व होते. जगातल्या प्रमुख शहरांशी येथून व्यापार चालत होता. परदेशातून आलेली कितीतरी गलबतं त्या वेळी समोरच्या खाडीत नांगरून पडलेली, जपानहून चांदी, चीनहून सोने रेशीम,मलबारहून साग, अरबस्तानातून घोडी असा निरनिराळ्या प्रकारचा माल घेवून आलेली गलबतं इथं थांबलेली असत.'

गाईडच्या उच्चाराचे टोन होते फॉरिनरच्या धतीचे, त्यामुळे साधारण इंग्रजी जाणणारांना त्याचं बोलणं समजायला जड जात होतं.

बसक्या नाकाच्या ५–६ लाँचेस धक्क्याला बिलगून उभ्या होत्या. त्यांनी आमचं लक्ष वेधून घेताच बसनं वळण घेतलं.

सोसाटयाचा वारा धावावा तशी बस धावत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी शेकडो फूट उंचीचे माड उभे होते. बाजूच्या झाडा–झुडपांना झिडकारून बस दौडत होती. त्यांच्या चामराखाली कौलारू छपरांच्या इमारती होत्या.

सावलीने अंधारलेला मार्ग. क्षणाक्षणाच्या अंतराने डोळयापुढे इमारती येत नि मागे सरकत.

गर्द झाडी.

कधी चर्च.

तर कधी माडांची राई.

मघापासून बसची मांडवीच्या खाडीशी जवळीक होती. पण आता एक वळण पास केल्यामुळे ती खाडीपासून दूर दूर जाऊ लागली.

कधी माडांच्या राईतून, तर कधी टेकडयांना घासून चालली होती.

गाडीचा वेग कमी झाल्यावर समोरच्या दिशेकडे बोट उभारून गाईड म्हणाला, ' लुक अॅट धीस सॅन्डी आर्क शोईंग इंन्शंट प्रॉस्पीरीटी ऑफ दी ओल्ड गोवा. '

आमच्या नजरा त्या कमानीवर पोचताहेत न पोचताहेत तोच गाईडचे पुढचे शब्द कानावर आले.

' द व्हॉईसराय यूज्ड टू एन्टर इंडिया थ्रु धिस आर्क. देअर इज स्टॅच्यू ऑफ वास्को–द–गामा इन दि ग्राउंड क्विइजड इनसाईड ऑफ दि आर्क. '

मुंबईतल्या गेट वे ऑफ इंडियाच्या कमानीसारख्या दिसणाऱ्या कमानीतून आत गेलो. आतल्या बाजूस असलेल्या मैदानात वास्को द गामाचा पुतळा आहे.

' दि पोर्तुगीज सी सेलर्स लव्हड गोवा व्हेरी मच. दे ब्रॉट क्लेव्हर अॅड स्किलफुल आर्किटेक्चर्स फ्रॉम पोर्तुगाल टू गोवा अॅड बिग अॅड टॉल

न्यू बिल्डींग्ज वेअर इरेक्टेड बाय देम. दे बिल्ट सिटीज ऑन दि ऑफ युरोपियन सिटीज.'

बाजूच्या परिसराकडे पहात तो म्हणाला, 'धिस इज द एरिया ऑफ ओल्ड गोवा, दॅट इज सीन फ्रॉम हियर. इन धीस एरिया यू वील सी चर्चेस व्हेअर यू लुक.'

मी अवीकडे पहात म्हणालो, 'हा दिसतोय हा गोव्याचा परिसर. या परिसरात पुष्कळ चर्चेस आहेत.

'धीस इज बो जेजूस चर्च.' समोरच्या दिशेने पहात गाईड म्हणाला.

त्याच क्षणी आमच्या नजरा स्थिरावल्या. तेवढ्यात ब्रेक लागला. दमलेल्या कुत्र्याने धापा टाकल्यावर यावा तसा आवाज देत गाडी थांबली

'हं उतरा इथं...' अशी सूचना देऊन गाईड गाडीबाहेर आला.


सारे प्रवासी खाली आले.

शनवार वाड्याच्या दरवाजासारख्या एका भव्य अशा दरवाजातून त्याने आम्हाला आत नेले.

कमानीतून आत जाताच एक पुतळा दिसला. हा सेन्ट फ्रॅन्सिस झेविअरचा पुतळा.' असे म्हणून गाईड बोलता झाला.

'काँट ऑफ ऑलेन्व्हर या व्हॉईसरायच्या काळात गोव्यात सरकार–विषयी जनतेच्या मनात तिरस्कार निर्माण झाला होता. त्यामुळे साऱ्या गोव्यात बंडाळी माजली होती. त्या बंडाळीला कंटाळून म्हणे व्हाईसरायने या पुतळयाच्या हाती राजदंड दिला आणि गोव्यात शांतता प्रस्थापित करण्याविषयी विनंती केली. आणि मग गोव्यात शांतता प्रस्थापित झाली.

'हं आता इकडे या.' असं म्हणत गाईडने आम्हाला एका मोठ्या दालनात नेले.



तिथलं वातावरण शांत गंभीर नि भक्तीनं भारावलेलं दिसलं. प्रार्थनेची वेळ असल्याने हजारो ख्रिश्चन स्त्री पुरुष तिथं उभे होते. प्रत्येकाच्या अंगावर काळे डगले होते. भ्रमराच्या गुंजारवासारखा आवाज आतून येत होता. सारेजण प्रार्थनेचे मंत्र म्हणण्यात गढून गेले होते.

भक्त मंडळी बाहेर गेल्यावर गाईडने आम्हाला दुसऱ्या खोलीकडे नेले नि समोरच्या चांदीच्या पेटीकडे पहात तो म्हणाला, 'या पेटीत सेंट फ्रॅन्सिस झेवियरचे शव आहे. एकोणिसाव्या शतकात सेंट फ्रॅन्सिस झेविअरने गोव्यात ख्रिस्ती धर्माचा मोठ्या जोमाने प्रसार केला. तीन डिसेंबर

हा झेवियरचा मृत्यूदिन, त्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. त्या दिवशी १२ वर्षातून एकदा पेटी भाविक लोकांच्या दर्शनासाठी उघडली जाते. वहुतेक राष्ट्रातले कॅथॉलिक पंथातील ख्रिश्चन झेवियरच्या दर्शनासाठी गोव्यात येतात

बो जेजुसस मधून बाहेर पडल्यावर गाईडने आम्हाला सी कॅथी ड्रॉ चर्चमध्ये नेले तिथं आम्हाला सेंट कॅथॉलक, सेंट पीटर आणि मेरी माता यांच्या भव्य मूर्ती पहायला मिळाल्या.

गाईड म्हणाला, ' गोव्यात आलेला पहिला सेनापती अल्बुकर्क याने या चर्चची स्थापना केली येथील घंटेला ' सेंट पीटरची घंटा ' म्हणतात. जगातील उत्कृष्ट घंटापैकी ही एक मानली जाते.

सी कॅथी ड्रॉ ची आठवण कायम केली ती त्याच्यासमोर उभ्या असलेल्या पूर्णाकृती पुतळ्याने.

युरोपियन योध्यासारख्या दिसणाऱ्या त्या पुतळ्याकडे पहात गाईड म्हणाला, ' हा लुइस द कोमाईस ' या महाकवीचा पुतळा आहे.

' लुझिया दश ' हे महाकाव्य लिहून अमर झालेला ' लूईस दू कोमाईस. '

' हा महाकवी होता ? ' अवी माझ्याकडे पहात म्हणाला.

मी म्हणालो, ' होय, रामायण लिहिणारा वाल्मिकी होता नं. १ तस्सा. '

आम्ही सारेजण पुतळ्याच्या समोर उभे होतो. पुतळ्याकडे पहात गाईड म्हणाला, ' पंधराशे चोवीससाली लिस्बन शहरात जन्मलेल्या या वीराचे जीवन फार हालअपेष्टांनी भरलेले होते. तो नुसता कवीच नव्हता, तर एक मोठा योद्धा होता एका हातात लेखणी आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन शेवटपर्यंत मातृभूमीसाठी झुंजत राहिला. '

कोईमा शहरातील पिऱ्हा विद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर आफ्रिकेतील क्रूर लोकांशी लढण्यासाठी पोर्तुगीज सैन्याबरोबर तिकडे गेला. त्या-

नंतर तो गोव्यात आला. त्यावेळी इथले पोर्तुगीज बेताल वागत होते. त्यांची कृष्णकृत्ये चव्हाटयावर आणण्यासाठी त्याने आपली लेखणी चालविली. त्यामुळे त्यावेळच्या गव्हर्नरांची त्याच्यावर नाराजी झाली. गव्हर्नरने त्याला चीनमधील 'मकाव' प्रदेशात हद्दपार केले. पंधराशे छप्पन साली त्याने मकाव येथील समुद्र किनाऱ्यावर एका गुहेत बसून 'लुझीया दश' या महाकाव्याचा बराचसा भाग लिहिला. त्याची शिक्षा रद्द झाल्यावर त्याला गोव्यात आणण्यात आले. त्यावेळी कोमाइसने एका हातात लुझीया दशची प्रत घेतली होती आणि एका हाताने तो नदीचे पाणी तोडीत होता. अशा स्थितीत गोव्यात आला.'

सारे टूरिस्ट आश्चर्याने पहात होते. गाईड बोलत होता.

तो म्हणाला, 'पोर्तुगीजांच्या राष्ट्रीय परिस्थितीचं विशेषत: गामाने हिंदुस्थानच्या जलमार्ग शोधून काढलेल्या कामगिरीचे वर्णन त्या महाकाव्यात आहे. त्या महाकाव्याने कोमाईशला अमाप कीर्ती मिळवून दिली.'

गाईडचे बोलणे संपल्यानंतर मी सीतेकडे पहात म्हणालो,

'पोर्तुगीजानी आपल्या एका महाकवीचे स्मारक उभारून त्याच्या कलेचा आदर ठेवला आहे.'

'विजापूरच्या बादशहाने ज्यावेळी गोवे काबीज केले, त्यावेळी त्याने आपली राजधानी इथंच ठेवली. सुंदर इमारती उभारून त्याच्या भोवती तट उभारले. त्यांच्या चारी बाजूना चार दरवाजे ठेवले.'

अभी म्हणाला, 'पोर्तुगीज गोव्यात केव्हा आले ?'

'पंधराशे दहा साली पोर्तुगीज हिंदुस्थानात आले ते प्रथम गोव्यात स्थिरावले. त्यापूर्वी गोव्यात इतरांच्या सत्ता होत्या. आठव्या शतकात कदंबांची सत्ता गोव्यावर आली त्यावेळी गोव्याची राजधानी चंद्रपूर येथे होती. उद्या आपण चंद्रपूरला जाणार आहोत.

'इथं सत्ता प्रस्थापित होताच पोर्तुगिजांनी प्रथम गोदींची सुधारणा केली. लढाऊ जहाजे बांधली, दारुगोळा व तोफा बनविण्याचे कारखाने काढले.'

तेवढ्यात ... बसचा हॉर्न वाजला.

'हं चला.' असं म्हणत गाईड बसकडे वळला.

आम्ही सारेजण बसमध्ये चढलो.

जुन्या गोव्याचा परिसर सोडताना मनामध्ये एक गोष्ट सतत सलत रहाते. ती म्हणजे ख्रिस्ती राज्यकर्त्यांनी पूर्वी हिंदूंवर अत्याचार केले असले तरी त्यांनी बऱ्याच गोष्टी हिंदूंच्या हिताच्या केल्या आहेत. तेव्हा त्यांचे वाईट टाकून देऊन, त्यांनी मागे ठेवलेल्या चांगल्या गोष्टी आपण पाठीमागून येणाऱ्या पिढीपुढे ठेवल्या पाहिजे त.

जुन्या गोव्यातल्या चर्च, व्हॉईसरायची कमान, लुईस द कोमाईसचा पुतळा या साऱ्या बाबी जतन झाल्या पाहिजेत.

अर्ध्या तासानंतर बस थांबली.

आम्ही बाहेर पाहिलं तर बस टुरीझमच्या कार्यालयापुढे उभी होती. आम्ही उतरलो नि टुरीस्टकडे वळलो.

# ८

मडगांव सोडून अर्धा तास झाला होता. टॅक्सी चंद्रपूरच्या रस्त्यावरून धावत होती.



मी सीतेला म्हणालो, ' कदंबांची सत्ता गोव्यावर आठशे वर्षे होती त्यावेळी गोव्याची राजधानी चंद्रपूरमधे होती. '

चंद्रपूर ( चांदर ) हे गाव लहान वाटत होते. त्याशिवाय ते गाव जुवारीपासून आत आहे. त्यामुळे जुवारी नदीतून दळणवळण करणे गैर-सोयीचे वाटत होते. म्हणून त्यानी थोरले गोवे येथे राजधानी ठेवून चांदर

येथे उप राजधानी ठेवली. कदंबांच्या काळात गोवे, म्हैसूर व महाराष्ट्राचा काही भाग असा भाग त्यांच्या अंमलात होता. साहित्य व कला यांचे संवर्धन त्या काळात मोठया प्रमाणावर केले. पंडिताना, विद्वानाना राज्यात मान होता.

११३५ मध्ये दुसऱ्या जयकेशीची राजवट आली. अचानक मलिकपूरने हल्ला केला. लुटालुट करुन तो परत गेला. पुढे महमद तघ-लकाने चंद्रपूरवर स्वारी केली. कदंब व तुघलक यांच्या सैन्याची जोरदार लढाई झाली. मोठी लूट केली. देवळे पाडली. येथील प्रसिद्ध शिवमंदीरही पाडले. त्या मंदिरातील नंदी व मंदिराची कमान तेवढी उरली.

बाजूच्या खिडकीतून अवी बाहेर पहात होता. कुडचडे गाव मागे पडले. मी बोलत होतो,

दहाव्या शतकात दुसरा कदंब राजा सोरटी सोमनाथाच्या दर्शनास गेला होता. गलबत पारोडा नदीतून बाहेर पडलं. न जुवारी नदीत शिरले. एकाएकी गलबताचे शीड मोडल्याकारणाने तो अडचणीत पडला. त्याला वाटले वदराचा ( जुने गोवे ) आसरा घ्यावा म्हणून त्याने गलबत किनाऱ्याला लावले. त्यावेळी तेथील महमद ताजी नावाच्या अरब व्यापाऱ्याने त्यास मदत केली. त्यावेळी त्याला वाटले, वहातुकीच्या दृष्टीने हे बंदर सोयीस्कर आहे. तेव्हा आपल्या राज्याची राजधानी चंद्रपूरमधून इथं आणावी

' हे चांदर ' टॅक्सीवाला बोलला.,

एक वळण घेऊन टॅक्सी थांबली. आम्ही बाहेर आलो.

गावाकडे पहात मी म्हणालो, ' दोन हजार वर्षापूर्वी भोजराजाने हा गाव वसविला. त्यावेळी गावाच्या भोवती मोठी तटबंदी होती. भोज, कदम, आदिलशाही सुलतान आणि त्यानंतर पोर्तुगिज असे अनेक कालखंड या गावाने पाहिले आहेत.

' ब्रागाझ हाऊस कुठं आहे ' मी एका इसमाला विचारले

समोरच्या दिशेला बोट उभारून तो म्हणाला, ' त्या रस्त्याने सरळ

जा. पुढं चर्च भेटेल. त्या चर्चच्या समोर जो वाडा दिसतो तोच ब्रांगाझ हाऊस.'

'कोण ब्रांगाझ ?' अवी माझ्याकडं पहात बोलला.

मी म्हणालो, 'गोव्यातला एक मोठा लेखक, विचारवंत नि पत्रकार'

त्या माणसाने दाखविलेल्या दिशेने आम्ही चालत राहिलो.

आमचे बरोबर चाललेला एक तरुण म्हणाला, 'सालाझारशाहीच्या काळात गोव्यात राजाविरुद्ध अ अक्षर कोणाला काढता येत नसे. अशा वेळी डॉ. मिनेझिस ब्रांगाझ यानी गोव्यात लोकशाही राज्य असावे, निधर्मी प्रजासत्ताक असावे असे विचार अनेक वृत्तपत्रातून ठामपणे मांडले होते. भारतात लोकमान्य टिळक तसे गोव्यात ब्रांगाझ. महाराष्ट्रात नव्या विचारांची जागृती महादेव गोविंद रानडे यानी केली, तशी गोव्यात नवविचारांची जागृती ब्रांगाझ यानी केली.

तो तरुण म्हणाला, '१९०३ साली ब्रांगाझ आणि त्यांचे मित्र यानी एकत्र येऊन उ हेराल्ड हे नियतकालिक सुरू केले. १९१० साली पोर्तुगालमध्ये प्रजासत्ताक जाहीर हाताच ब्रांगाझ याना योग्य असे वातावरण लाभले. पुढे त्यानी स्वत: ओ डिबेट हे साप्ताहिक सुरू केले. त्या पत्राने पुढे दहा वर्षांत नव्या पिढीतील तरुणांच्या विचारात परिवर्तन घडवून आणले. राष्ट्रीय भावना व धर्मातीत राजकारण या विषयावर अनेक लेख लिहून त्यानी गोव्यात स्वातंत्र्यासाठी लढणारी एक नवी पिढी निर्माण केली. येशूचे तत्वज्ञान व भ्रष्ट जुलमी राजसत्ता यावर आधारलेले चर्च यांचा एकमेकाशी संबंध नाही असे क्रांतिकारक विचार द डिबेट या साप्ताहिकातून ब्रांगाझ यांनी मांडले

तो तरुण बाजूस वळलेल्या रस्त्याला वळला.

सीतेकडे पहात मी म्हणालो, 'पोर्तुगाल प्रजासत्ताक म्हणून जाहीर होताच गोव्यात धर्मावर नागरिकत्वाचे श्रेष्ठत्व अवलंबून असू शकत नाही, असे ब्रॉगाझ यानी जाहीर करुन ख्रिश्चनांच्या बरोबरीने हिंदु मुसलमान या सर्वांना समान नागरिकत्व मिळाले पाहिजे असे ठामपणे सांगितले.

थोड्याच काळात तसे घडले त्यामुळे मिनेझिस ब्रांगाझ हे सर्वांचे चाहते झाले.

मिनेझिस ब्रांगाझ हे गोव्यातील कॉन्सीलसचे सदस्य होते. त्यानी गोव्यात प्रॉव्हिन्शिअल कॉंग्रेस काढली. कलकत्त्यात भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनास हजर राहिले.

मोतीलाल नेहरुंचे आचार विचार ते आचरित. पुढे गांधी नेहरु हे त्यांची दैवते बनली. गांधी नेहरुंच्या विचारावर ब्रांगाझ लिहीत राहिले.

द डिबेट नंतर ते प्रकाश मध्ये लिहू लागले. प्रकाश बंद पडल्यावर ते प्रदीप मधून लिहीत राहिले. त्यांच्या लेखातील विचारावरून गोव्यातील हिंदू ख्रिश्चनांमधील जवळीकता वाढली.

असा हा श्रेष्ठ पुरुष १९३८ साली चांदर येथे निधन पावला चर्चच्या आवाराबाहेर त्यांची समाधी बांधण्यात आली.

बोलत बोलत आम्ही वाड्यासमोर येऊन पोहोचलो.

' हा ब्रांगाझ वाडा ' मी म्हणालो.

वाड्याकडे पहात अवी म्हणाला, ' सातान्यातल्या राजवाड्यापेक्षा मोठा दिसतो नाही काहो?'

: होय. :

बाहेर एक माणूस भेटला त्याची परवानगी घेऊन आम्ही वाड्यात प्रवेश केला.

महादरवाजातून आत गेल्यावर बाजूच्या जिन्यावरुन आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. ब्रांगाझ कुटुंबीयाशी थोडी बातचीत केली. इथं येण्याचा मनोगत सांगितला.

ब्रांगाझ यांची लायब्ररी आहे. त्या अभ्यासिकेत लॅटीन, जर्मन, फ्रेंच इंग्लीश, अशा अनेक भाषातील असंख्य ग्रंथ आहेत असं समजलं.

अगणित ग्रंथ असलेली अभ्यासिका नि तिच्यात असलेल्या जगातील अन्य भाषेतल्या असंख्य ग्रंथांचे सतत वाचन करणाऱ्या नि आपले विचार परखडपणे वृत्तपत्रातून मांडणाऱ्या त्या थोर व्यक्तीबद्दल आमच्या मनात आदर निर्माण झाला.

वाडा पाहून झाल्यावर आम्ही वाड्याबाहेर पडलो.

गोव्याच्या जुन्या राजधानीच्या भूमीत आम्ही गेलो. तिथं त्या काळचे विशेष असे अवशेष दिसले नाहीत. समोर बोटाने दाखवीत एक गृहस्थ म्हणाले, 'त्या तिथ शिवमंदीर होतं.'

महंमद तघलकाच्या स्वारीत ते पाडलं होतं.

'त्या लढाईच्या वेळी या नगराची बरीच मोडतोड झाली असणार' सीता म्हणाली

चंद्रेश्वरच्या डोंगरावरून आम्ही भोवतालीचा परिसर पाहिला, पारोडा नदीचे दृश्य पाहिले लांबून दिसणारे पलिकडे चित्रातले नगर दिसावे तसे मडगाव दिसले.'


कदंबांच्या आधी २०० वर्षापूर्वी चंद्रपूरची वसाहत भोज राजानी स्थापली होती. सातव्या शतकात चंद्रपूर हे कदंबाच्याकडे गेले.

मी सीतेकडे पहात म्हणालो, 'चंद्रपूर हे गाव लहान असले तरी याने दोन हजार वर्षापूर्वीचा इतिहास पाहिला आहे.'

लगेच आम्ही चंद्रपूरच्या नव्या वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याला वळलो.

चर्चच्या समोर येताच सीता म्हणाली, 'आठ वाजून गेले, नऊपर्यंत आपण मडगांवला पोचू का ?'

'नऊच्या अगोदर पोचू' असं म्हणत मी टॅक्सीत प्रवेश केला.



# ९

टॅक्सीतून बाहेर पडताच समोर मोठा दिंडीदरवाजा दिसला.

त्या दरवाज्यातून आत जाताच आपण एखाद्या राजवाड्यात चाललो आहोत असा भास होतो.

दोन्ही बाजूंनी असलेल्या तळ्यातला जलाशय. त्याच्या पाठीमागे शेकडो उंचीचे माड. कुठे पोफळींची दाटी तर कुठे केळीच्या झाडांच्या ओळी, अशा निसर्गरम्य भागातून गेलेल्या रस्त्याने आम्ही चाललो होतो.

मजकडे पहात अवी म्हणाला, ' एखाद्या खाडीच्या पुलावरून चाललो आहोत असं वाटतं, '

अर्धा रस्ता चालून गेल्यावर मंगेशी मंदिरापुढील दीपमाळ दिसली.



रस्ता संपला तेव्हा आम्ही मंदिराजवळ जाऊन पोहोचलो. मंदीर उंचावर आहे त्यामुळे पायऱ्या चढून गेल्यावर मंदिराच्या अवाराबाहेरचा महादरवाजा दिसला. तो ओलांडून आम्ही आत गेलो. तेव्हा मंगेशी मंदिर पूर्णपणे दिसले.

दीपमाळेपासून पुढे गेल्यावर डाव्या बाजूच्या कोपऱ्यात पाण्याचा नळ दिसला. तिथं हात पाय धुतले नि दर्शनासाठी मंदिराकडे वळलो.

सात आठ पायऱ्या चढून गेल्यावर आम्ही दरवाज्यात पोहोचलो. त्यावेळी समोर तीन चार दरवाजे दिसले त्यांच्या मागें मंगेशीची मूर्ती दिसली आम्ही नमस्कारासाठी हात जोडले

दुसरा दरवाजा, ओलांडून आम्ही आत गेलो.

आणखी दोन तीन दरवाजे ओलांडल्यावर आम्ही गाभाऱ्यापुढील दालनात जाऊन पोहचलो.

गाभाऱ्यात समोर शिवलिंगाची मूर्ती नि तिच्यासमोर शंकराची पिंड होती. दोन्ही बाजूस समया नि दीपज्योतींनी उजळलेला प्रकाश पसरला

होता. अगरबत्तीच्या सुगंधाने गाभाऱ्यातलं वातावरण धुंद झालं होतं.

गाभाऱ्यातल्या दोन्ही बाजूंना दोन सोवळयातील भक्त होते. डाव्या बाजूस बसलेले सोवळयातले गृहस्थ स्तोत्र म्हणत होते. दुसऱ्या बाजूस बसलेले सोवळयातले गृहस्थ दर्शनास येणाऱ्या भक्तांना तीर्थ देत होते.

दर्शन घेतल्यावर तीर्थ घेऊन आम्ही दरवाज्याबाहेरच्या दालनात गेलो. तेव्हा डाव्या बाजूच्या ओसरीतून एक गृहस्थ आले. तेही सोवळयात होते. तेही पुजारीच असावेत. पुजाऱ्यांना इकडे महाजन म्हणतात, असं ऐकलं होतं.

ते म्हणाले, ' श्री मंगेश शैव सारस्वतांचे दैवत. हे जागृत दैवत आहे. मंगेशी प्रथम कुट्ठाळीस होता. सोळाव्या शतकात त्याची स्थापना इथं केली. त्यावेळेपासून हा इथं आहे. '

' कुठाळीहून स्थलांतर करण्याचं कारण ?' मंगेशीचा पूर्व इतिहास समजावून घ्यावा म्हणून मी विचारलं.

' सोळाव्या शतकाच्या मध्यास युरोपात धर्मयुद्ध झालं, त्यावेळी ख्रिस्ती मिशनरी गोव्यात आले. त्यावेळी जी धर्मांतराची लाट आली त्यावेळी आम्ही मोठ्या संकटातून वाचवल आहे मंगेशाला.

आम्ही मोठ्या उत्सुकतेने ऐकत होतो.

ते म्हणाले, ' मे १६६४ मध्ये ख्रिस्ती मिशनरी पोर्तुगीजांचे सहाय्य घेऊन जुवारी नदी ओलांडून कुंठाळयास म्हणजे मंगेशाचं मूळचं स्थान जिथं होतं तिथं आले. नि त्यांनी तिथं पहिला क्रॉस रोवला. आणि मंगेशाचं देऊळ पाडलं. '

' असं ? ' सीता आश्चर्याने उद्गारली.

मात्र तिथला पुजारी गडबडला नाही. मी म्हणालो, ' त्याने मोठ्या धैर्याने मंगेशाची पिंड घेतली नि तो धावत सुटला. नदी ओलांडून मडकदच्या किनाऱ्यावर उतरला न प्रियोळला आला. '

समोरच्या बाजूला बोटाने दाखवीत ते म्हणाले, ' त्या तिथं त्यानं त्या पिंडीची स्थापना केली '

बाहेरून येणारी माणसं मंदिरात जात होती. काही मंदिरातून बाहेर येत होती. नि आम्ही मंदिरासमोरच्या तुळशीजवळ उभे होतो.

महाजन म्हणाला, ' मंगेशीची पिंड इथं आणल्या अगोदर कुठाळीस एक चमत्कार घडला. '

' तो कसला ? ' अवीनं विचारलं.

' तो म्हणाला, ' कुठाळीस एक गाय रोज आपल्या दुधाची धार एका शिळेवर धरत होती. हे गुराख्याच्या एका पोराने पाहिले होते. वासराशिवाय गाईला पान्हा कसा फुटतो याचे त्याला आश्चर्यंवाटले. त्याने ते आपल्या धन्यास रात्री सांगितले. शिवरात्रीच्या दिवशी वत्साचे स्वप्नात दृष्टांत झाला धन्यास मंगेशीची स्थापना करावी असे वाटले. मग त्यांने श्री मंगेशींची विधीपूर्वक स्थापना या ठिकाणी केली. ' मंगेशीकडे बोटाने दाखवीत तो म्हणाला, ' त्या तिथं केली. '

सीतेनं नि अवीनं मंगेशीकडे वळून हात जोडले.

' बरं आपण कोठून आलात ? ' त्याने मला विचारले.

' गोव्याबाहेरुन. '

' म्हणजे लांबून आलात ?

' होय. '

कराल अभिषेक तर तुम्हाला चांगला लाभ होईल. '

मी म्हणालो, ' काही हरकत नाही. '

' इकडं या ' असे म्हणत तो मागे वळाला.

आम्ही त्याचे मागून गेलो. देवस्थान कचेरीत त्याने आम्हास आणले.

तिथल्या व्यवस्थापकं स्थानावर असलेले गृहस्थ म्हणाले. ' कमीत-कमी पंचवीस रुपयापासून ते पाचशे रुपयापर्यंत अभिषेक करता येईल. '

मी म्हणालो, , पचवीस रुपयांचा अभिषेक करायला हरकत नाही. ' असं म्हणून मी कोटाच्या खिशातले पाकीट घेतले.
नि त्यातले पंचवीस रुपये त्यांच्याकडे दिले. नांवगावाची नोंद करून त्याने पावती फाडून दिली.

नंतर आम्ही त्या महाजनाबरोबर मंदिरात गेलो.

सर्व पूजा साहित्य त्या महाजनांनी पुजाऱ्याकडे दिले. आम्ही समोर बसून राहिलो.

शिवलिंगाच्या मूर्तीकडे आम्ही पहात राहिलो

अभिषेक संपल्यावर तीर्थप्रसाद घेतल्यानंतर बाहेर आलो. दरवाजाबाहेर आल्यावर ते महाजन म्हणाले, वत्सगोत्री भक्तांनी श्री मंगेशाला कुठाळीहून सुरक्षित आणले, म्हणून त्यांचा प्रमुख आणि मूळ पुरुष देवशर्मा याची ध्यानस्थ मूर्ती देवळासमोर आहे असं म्हणत त्याने समोरच्या दिशेला बोट उभारले.

मूर्ती दोन्ही हाताच्या ओंजळीत श्रीफल घेतलेले आहे अशा स्थितीत आहे. या मुळकेश्वराला उत्सवाच्या दिवशी मानाचे स्थान असते.

'महाजन म्हणाले.'

गोव्याचा हा मूळचा आदिवासी. यानेच गाईचा पान्हा फुटलेला प्रथम पाहिला.

असे म्हणत मंदिराचे बाहेर असलेल्या समोरच्या तलावाकडे पहात ते म्हणाले.

कार्तिक शुध्द द्वादशी दिवशी येथे मोठा उत्सव होतो. १५५६ सालच्या कार्तिक शु।। द्वादशी दिवशी कुठाळाहून मंगेशीचे स्थलांतर झाले होते. म्हणून हा उत्सव दरवर्षीच्या कार्तिक शु।। २ केला जातो. त्याची सूत्रे या वत्सगोत्राकडेच असतात:

दुसऱ्या दिवशी दहीकाला व पालखीतून मंगेशाची मिरवणूक निघते. त्या वेळी गोव्यातील द्रवीड संस्कृतीचा आविष्कार येथे पहावयास मिळतो. याच पालखीत विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती ठेवल्या जातात. मंगेशी मंदिराच्या तलावाजवळ ही पालखी येते. नंतर ब्राम्हण पुजारी विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती पोटावर घट्ट बांधून या तलावात उतरतात.चौघडा व वाद्ये वाजत असतात. पुजारी त्या तलावातल्या तुळशी वृंदावनाभोवती सात फेऱ्या मारतात. त्याला साथ देण्याचे काम गावडा मुले करतात.

कार्तिक शुध्द चतुर्दशी दिवशी श्री मंगेश भक्तगणासमवेत वनभोजन करतो ती रात्र वैकुंठ चतुर्दशीची. त्या रात्रीचा दीपोत्सव पहाण्यासारखा असतो. मंदिरातील दीपमाळ अनेक दीपज्योतींनी फुललेली असते. मंदिरा-पासून ते तलावापर्यंत पणत्यांच्या ज्योती तेवत असलेल्या दिसतात.

श्री मंगेशाचे मंदिर त्या दिवशी लक्ष दिव्यांच्या ज्योतींनी लखलखत असते.

केळीच्या पानात पणती ठेऊन ती तळ्यात सोडण्यात येते.

देवळासमोरच्या मूर्तीकडे पहात अवी म्हणाला, ' हे कोण ' ?

महाजन म्हणाला, ' ज्या वत्सभक्तांनी श्री मंगेशाला कुट्ठाळीहून प्रियोळला आणले त्यांचा प्रमुख देवशर्मा याची मूर्ती आहे. '

मी म्हणालो, ' ध्यानस्थ बसलेल्या स्थितीत आहे. '

सीता म्हणाली, ' दोन्ही हातांच्या ओंजळीत श्रीफळ घेऊन बसलेली आहे.'

महाजन म्हणाला, ' या मुळकेश्वराला उत्सवाचे दिवशी मानाचे पान मिळते एका गावडयास गंधफूल वाहिले जाते. त्यास जेवण दिले जाते. हा गावडा गोव्याचा आदिवासी. त्यानेच गाईचा फुटलेला पान्हा आधी पाहिला.


तो म्हणाला, 'माघ शुद्ध चतुर्दशीं व पौर्णिमा हे मंगेशाचे महापर्वणीचे दिवस. पहिल्या दिवशी धाकटा रथोत्सव तर दुसऱ्या दिवशी थोरला रथोत्सव. दर सोमवारी पालखी निघते. त्या दिवशी महाजन रात्री परतत नाहीत. त्याने तेथेच मुक्काम करावयाचा असतो. '

मंगेशी मंदिराच्या जीर्णोद्धाराआधी पुण्याहून पेशव्यानीही मदत केली होती. बाळाजी बाजीराव पेशवा यांच्या शिक्क्याच्या सनदा मंगेशीच्या दप्तरात आहेत.

मुख्य दरवाज्यातून बाहेर पडताना महाजन म्हणाला, 'इथे दिनानाथ मंगेशकर जन्मले होते. त्या तिथे मंगेशकरांचे घर आहे. कर्लोस्कर नाटक

कंपनीत गेले नि पुण्यातच स्थायिक झाले. त्यांची कन्या लता मंगेशकर, आशा भोसले याही तिकडेच वाढल्या.


बराय, असं म्हणून आम्ही त्यांचा निरोप घेतला.



आम्ही टॅक्सीत चढलो,
टॅक्सी पणजीच्या रस्त्याला वळली.

# १०

' हं, चलू या ' असे म्हणून आम्ही टॅक्सीचा आश्रय घेतला.



सूर्यकिरणं तिरपी झाली होती. टॅक्सीने साखळीचा बसस्टँड सोडला होता.

रस्ता झाडाझुडुपातून गेला होता. बाजूने घाणेरी करवंदीची झुडपं होती.

' बरं कां साहेब, ' स्टेअरिंग फिरवीत टॅक्सीवाला म्हणाला.

त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'काय ? '

'हुरवळ्याला जायाचं म्हणताय ?'

'होय.'

'धबधबा बघायला ?'

'होय.'

'ज्यावेळी गोव्यात पोर्तुगीजांची राजवट होती त्यावेळी इथला हिंदू समाज कसा होता ?' मी विचारले.

तो म्हणाला, 'अंधारातून चाचपडत जाणाऱ्या माणसासारखी स्थिती होती त्यावेळी हिंदूंची.'

प्रश्नार्थक दृष्टीने पहात मी उद्गारलो,'अंधारातून चाचपडत जाणाऱ्या माणसासारखी ?'

'होय साहेब,'

'राजकारणाची भाषा पोर्तुगीज असल्याकारणाने मराठी भाषिकांची फार कोंडी झाली त्या वेळी.'

'बाटवाबाटवीच्या काळात पोर्तुगीजांनी हिंदूना जास्त छळले ना ?'

'हिंदूबद्दल फार द्वेश होता त्यांच्या मनात ?' मी म्हणालो.

'हिंदूना सळो की पळो करून सोडलं हिंदूंचं दास्यत्व नष्ट करण्यासाठी सत्तरीच्या राण्यांनी मात्र जीवाचे रान केले. त्यानी मोठ्या जिद्दीने पोर्तुगिजाशी सामना केला. पण अल्पशा बळामुळे त्यांना पोर्तुगीजांच्यापुढे हार खावी लागली. त्यामुळे सत्तरी महाल पोर्तुगीजांच्या ताब्यात गेला.'

'सत्तरी हे नाव कसे पडले ?' मी टॅक्सीवाल्याला विचारले.

तो म्हणाला, 'आर्यांनी मडगावच्या आसपासच्या सासष्ट गावी वस्ती केली होती. म्हणून मडगाव हा सासष्टी तालुका मानला गेला, आणि सत्तर गावाच्या महालावर राण्यांची सत्ता होती. तिथले हे राणे म्हणून सत्तरीचे राणे म्हणून ओळखले जातात.'

स्टेअरिंग संभाळीत तो म्हणाला, 'हे राणे मूळचे रजपूत. इथं येऊन ते स्थाईक झाले. म्हणून ते इथले.

टॅक्सी वळवीत तो म्हणाला, ' पोर्तुगीज हिंदूना छळत असत हे त्याना सहन होत नव्हते. म्हणून ते राज्यकर्त्यांना विरोध करीत.

' पोर्तुगीजानी हिंदूना सन्मानाने वागवावे, धार्मिक स्वातंत्र्य द्यावे, अंतर्गत गोष्टीत ढवळाढवळ करू नये, जाचक कर लादू नयेत अशा मागण्यासाठी सत्तरीचे राणे पोर्तुगीजाशी नेहमी भांडत असत.

' पोर्तुगीज अधिकाऱ्याकडून गरीब शेतकऱ्यांची छळणूक होत होती. म्हणून १९१४ साली केरीच्या विठोजीराव राणेनी बंड केले होते. त्यात त्यांना गावठणकर देसाई मावळीनकर व मुळेकर यांनी चांगली साथ केली होती. सरकारने हिंदूवर डोईकर बसवल्यावर दिपाजी राणे यांनी बंड केले. अशा तऱ्हेने सतरीचे राणेनी पोर्तुगिजांशी लढा दिला. '

आम्ही मंदिरापाशी पोहोचलो.

मंदिरात प्रवेश करताना मला पंढरपुरचे विठ्ठल मंदीर आठवले. मंदिराची रचना पंढरपुरातल्या मंदिराची प्रतीकृती दिसली. मंदीर लहान असले तरी मंदिराचे आवती भोवतीचा परिसर तसाच आहे.

विठ्ठलाचे दर्शन घेऊन परत आल्यावर टॅक्सीवाला म्हणाला, ' आता हरवळेकडे जाऊ या. '

टॅक्सी साखळी शहरात हळू हळू चालली होती. टॅक्सीवाला ड्राय-विंग करीत बोलत होता तो म्हणाला,

' सत्तरी महाल ताब्यात येताच पोर्तुगीजांनी राण्यांच्या हक्कावर गदा आणली. त्याना मिळालेल्या साऱ्या सवलती काढून घेतल्या. त्यामुळे राणे जमात चिडली. नि पोर्तुगीजांशी झुंजत राहिली.

राण्यात दिपाजी राणे मोठा शूर. गनिमी काव्याने लढत देत होता. पोर्तुगीज गव्हर्नरने त्याला पकडण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. पण तो त्यांच्या हाती लागला नाही. दिपाजीचे बंड मोडण्यासाठी पोर्तुगीज सर-कारला अतोनात पैसा खर्च करावा लागला. तीन वर्षे दिपाजीशी लढत देत होते. पण तो नमला नाही. तीन वर्षांनी लढाईला कंटाळून गव्हर्नर पोर्तुगालला निघून गेला. '

' राण्यांचे वंशज आता कोणी आहेत ?' मी उत्सुकतेने म्हणालो.

' आहेत, केरीत आहेत, काही साखळीत आहेत.'

टॅक्सी वळणावळणाच्या रस्त्याने चालली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची भूमी काजूच्या झाडांनी झाकली होती. झाडांच्या वाकडया-तिकडया फांद्या इतस्तत: पसरल्या होत्या. काही झाडांच्या फांद्या जमिनीला टेकल्या होत्या.

ड्रायव्हरने गाडीचा गियर बदली करून ॲक्सीलेटरवरील पायाचा दाब कमी केला न् ब्रेक दाबून उजवा हात बाहेर काढला तशी गाडी थांबली.

आम्ही खाली उतरून चालू लागलो.

दगडी पायऱ्यांनी बांधून काढलेला रस्ता.

आम्ही पायऱ्या उतरत होतो. तिथं रस्ता डगरीवरून खाली उतरला आहे.

कौलारु झोपडया होत्या, सात आठच पण तुटक तुटक.

मी म्हणालो, 'हे कोणते गांव ?'

तो म्हणाला, 'हरवले,'

'असं होय. ?'

दोन्ही बाजूनी कुळागरं होती. त्यातले माड नि पोफळींची झाडं दाटीने उभी होती.

माडांनी चेंडूएवढी फळे धरली होती. त्यातूनच पोफळीच्या रोपांची गर्दी होती. काजूचे झाड फळलेले होते. त्याची शेंदरी पिवळी रंगाची फळे खाली लोंबकळत होती. काजू घ्यायला कुणी प्रतिबंध करणार नाही पण खाली पडलेला काजू तेवढा घेऊ नये अशी आज्ञा असते. कारण काजूपासून दारू गाळली जाते. ती विकल्याने पैसा मिळतो.

क्षितिजापर्यंत पसरलेला तो हिरवा रंग वृक्ष पल्लवांनी भेदून टाकला होता. डाव्या बाजूकडून खाली नागमोडी वळणाने वहात आलेल्या निळ्या नदीच्या किनाऱ्याला पोफळीच्या दाटीत देवळाचा कळसही दिसत होता.

ड्रायव्हर म्हणाला, ' त्या तिकडे नदीच्या पलिकडे एक गाव आहे. पलिकडे थोडचा उंचवटचावर १५–२० घरे दिसताहेत ती वाडी आहे. '



नदीच्या पात्राकडेने असंख्य माड उभे होते. त्यांच्याकडे पहात आम्ही चाललो होतो.

तो म्हणाला, ' डोंगरावरचा माड खुरटतो. त्याची विशेष वाढ होत नाही. ती हवाच त्याला आवडत नाही'

' असं काय ?' मी मध्येच म्हणालो.'

तो म्हणाला,'माडांना खारी जमीन आवडते. त्याला खारा वारा आवडतो. समुद्राकाठचे माड ऐटीत उभे असतात. त्याना नेहमी समुद्राचे दर्शन हवे असते. समुद्रावर असलेले माड वाऱ्याशी हितगुज करतात. तरारलेला माड फळांच्या पेंडचांच्या ओझ्याने अवघडलेला असतो.

पायऱ्या उतरताना एका आंब्याच्या झाडाकडे बोट उभारून टॅक्सीवाला म्हणाला, ' तो बघा आंबा, किती उंच वाढलाय ?'

'माडाप्रमाणेच आंब्यालाही खारी जमीन लागते. ज्या फळाला फळांचा राजा म्हणतात तो आंबा भारताच्या सर्व बाजूला जरी असला तरी कोकणाच्या हापूस आंब्याची सर इतर ठिकाणच्या कुठल्याही आंब्यांना येत नाही. '

कुळागारातल्या लहान लहान पोफळी दिमाखात डुलत होत्या. त्यांच्या लगतच्या माडांनी झावळ्यांचो छत्रं पोफळींच्या रोपावर धरली होती. पायऱ्यांचा रस्ता संपल्यावर आम्ही मंदिराच्या आवारात पोचलो.

मंदिरासमोरच्या आवारात जाताच समोर एक डोह दिसला. त्या डोहात सत्तर पाऊणशे फूट उचीवरच्या कडेवरून नदोच्या पाण्याचा प्रवाह खालच्या डोहात पडत होता.

डोहाच्या काठावर आम्ही उभे होतो. तिथपर्यंत पाण्याचे तुषार उडत होत.

त्या प्रवाहाकडे पहात अवी म्हणाला, 'आपल्या उरूलच्या फणशीच्या ओढयाचा प्रवाहसुद्धा भैरोबाच्या डोहात असाच उंचावरून पडतो नाही का ?'

'होय, मी म्हणालो, 'फणशीच्या ओढयाचा प्रवाह असाच पडतो आहे. पण तो इतक्या उचावरून पडत नाही.

प्रवाहाचा धबधबा छान दिसतो. पण हा दूध सागरासारखा इतक्या उंचावरून पडत नाही.' सीता म्हणाली.

मी म्हणालो, 'दूधसागराचा धबधबा उतरताना वक्र रेषेत दिसतो. हा सरळ रेषेत दिसतो.

'फणशीच्या ओढयाचा प्रवाह इतक्या उंचावरून पाडला तर तोही पाहण्यासारखा धबधबा होईल.'

'इतक्या उंचीवरून कसा पाडता येईल !' सीतेनं विचारलं.

मी म्हणालो, 'हां, पाडता येईल. आता तो ज्या ठिकाणावरून पडता तिथ बांधकामाने ता प्रवाह उंचावरून पडेल असा करायचा.' इतका म्हणजे त्यामुळे वरच्या बाजूला पाण्याचा साठा होईल व पाहिजे तेवढा प्रवाह खालच्या डोहात पाडता येईल. ते प्रेक्षणीय ठिकाण बनविण्यासाठी आवती भोवती झाडे लावावयास हवीत.'

अवी म्हणाला, 'पण त्यासाठी एवढा खर्च कोण करणार ?'

मी म्हणालो, 'उरूलच्या ग्रामपंचायतीने करावा.' उरूलच्या परिसरातील प्रेक्षणीय स्थळ बनवायचे असेल तर ग्रामपंचायतीने तेवढे कष्ट सोसले पाहिजेत.'

' हरवळे धबधबा विशेष पहाण्यासारखा ' माझ्या तोंडून शब्द उमटले, ' निसर्गाच्या कुशीत एखाद्या ऋषीने कमंडलूतले पाणी तृषार्ताच्या ओंजळीत ओतावे तशी ती एकेरी धारा आहे. '

महादेवाच्या जटेतून फुटणाऱ्या गंगा तुषारासारखा अनेक प्रवाहानी तो खाली पडतो. हरवळेच्या धबधब्यात दूधसागर धबधब्याएवढी भव्यता नसली तरी जवळच असलेल्या शिवालयाच्या पायरीजवळ उभे राहून त्याच्याकडे पाहिल्यावर मन हर्षाने बहरून जाते. '

' पोर्तुगीजांचं राज्य गोव्यात होतं तेव्हा बरं होतं का ? ' मी टॅक्सी-वाल्याला पुढं सवाल टाकला.

' तो म्हणाला, ' त्यांनी जरी लोकांना छळलं तरी एक गोष्ट मात्र कबूल करावीं लागते. त्यांचं राज्य होतं तेव्हा गोव्यात चोरी होत नसे. घराची दारे खिडक्या उघडया टाकून झोपत असत. माणसांचा माणसांवर विश्वास होता. '

गोवा स्वतंत्र झाल्यावर काय फरक झाला ? '

' स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गोमंतकाला राज्य कारभार पाहण्याकरिता पाठविलेल्या अधिकारी वर्गानं पुष्कळ लूट केली. '

पोफळीच्या शेंड्यावर काही घारी घिरट्या घेत होत्या. मध्येच एखादा कोतवालपक्षी आपली शेपटी भिंगरीसारखी फिरवत भुरकन डोळ्या समोरून निघून जात होता. तेवढ्यात शुभ्र बलाक पक्षांची एक भली मोठी माळ लगबगीने धावत गेली. समोरच्या फणसाच्या झाडावरचा डोमकावळा शेपटीचा तुरा फिरवून धावणाऱ्या खारीला बघून कर्कश आवाज काढत होता.

' इथं जवळच पांडवांची गुहा आहे. पाहायची आहे का ? ' त्यानं विचारले.

' हो जाऊ या की ' मी म्हणालो.

मग आम्ही गुहेकडे जाणाऱ्या रस्त्याने दहा मिनिटांनी तिथं पोचलो.


पांडवांची गुहा पाहिली. सहाव्या शतकात तिथं पांडव आले होते. तो म्हणाला, 'त्या गुहेत सहा खोल्या आहेत. कड्यात खोदकाम केलेल्या या गुहेत पांडवानी एक रात्र मुक्काम केला होता.

टेकडीचं खोदकाम पहाताना अवी म्हणाला, 'चाफळ भागातल्या रामघळीसारखी गुहा दिसते आहे ही.'

टॅक्सीवाला म्हणाला, 'पांडव एक दिवस येथे थांबले होते म्हणतात, प्रत्येकाला रहाण्यासाठी एकेक अशा सहा खोल्या आहेत.


शेजारच्या व्हाळाच्या कडेच्या शेताकडे बोट दाखवीत तो म्हणाला 'त्या शेतात साळी पिकविली होती म्हणतात.'

गुहा पाहून झाल्यावर आम्ही परत आलो नि टॅक्सीचा आश्रय घेतला.




# ११

रायबंदरचा धक्का फेरीबोटीने सोडला. जुन्या गोव्याचा परिसर मागे सरकू लागला.




सीतेला मी म्हणालो, 'निसर्गसंन्निध्यामुळे जगातल्या अनेक राष्ट्राना गोव्याचं आकर्षण होतं नि आजही आहे. साता समुद्रापलीकडून आलेले पोर्तुगीज गोव्यात आल्याबरोबर स्थिरावले, ख्रिस्तीधर्म प्रसार करण्याच्या हेतूने. पुढे त्याना वाटलं आपली सत्ता असावी इथं. पोर्तुगीजानंतर गोव्याचे आकर्षण छत्रपती शिवाजीराजाला पण होते '

शेजारी उभे असलेले गृहस्थ माझ्याकडे पहात म्हणाले, ' आश्चर्य वाटावे असे अनेक चमत्कार या भूमीवर झाले आहेत. ख्रिश्चन पूर्व कालात तिचे स्वरूप वेगळे होते. उत्तरेस असलेल्या दमण गंगेपासून ते गंगावली पर्यंतच्या भूप्रदेशाला कोकण या नावाने ओळखले जाते. या प्रदेशावर तेराव्या शतकापर्यंत मौर्य, शातवाहन, कदंब, शिलाहार आणि यादव यानी राज्य केले. सोळाव्या शतकाच्या आरंभ कालांत पोर्तुगालमधील दर्यावरदी गोव्यात आले.




त्याकाळी इथला सूभेदार शत्रूशी सामना करण्याऐवजी पळून गेला. त्यामुळे आरमार प्रमुख अलबुकर्कने गोमंतकाचा कबजा घेतला. सोळाव्या शतकाच्या मध्यावर सेंट फ्रँन्सीस झेंवियर हा ख्रिस्ती धर्म प्रसारक आला नि त्याने धर्मांतराचा धुमाकूळ घातला.



फेरीबोट दिवाडी बेटाच्या किनाऱ्यावर पोचताच आम्ही खाली उतरलो नि नारवे गावात शिरलो.

समोर चर्च दिसले.



दोन्ही बाजुंच्या माडांच्या राईतून गेलेल्या रस्त्याने आम्ही चालत होतो. मी म्हणालो, ' इथं साडेचारशे वर्षे पोर्तुगीजांची सत्ता असल्यामुळे पोर्तुगीज संस्कृतीची छाप पडलेली दिसते. हिंदुस्थानात ३०० वर्षे इंग्रजांची सत्ता होती. त्यामुळे इंग्लीश संस्कृतीचा परिणाम हिंदु संस्कृतीवर बऱ्याच प्रमाणांत झाला. हिंदी भाषेत जास्तीत जास्त इंग्रजी शब्द येऊन ती भाषा

इंग्रजीमिश्रित झाली. राज्यकर्ते इंग्रज असल्यामुळे व इंग्लीश संस्कृती-तल्या काही चालीरिती पण हिंदु सस्कृतात येऊन मिळाल्या. पाटावर बसून जेवण घेणारा हिंदू खुर्चीवर बसून जेवण घेऊ लागला. जमिनीवर बसणे म्हणजेच भारतीय बैठकीवर बसणे तो कमीपणाचे मानू लागला आणि त्याने खुर्चीचा आश्रय घेतला. पोषाखातसुध्दा त्याने इंग्लीश पोषाख स्वीकारला. त्याचप्रमाणे गोव्यात काही काळ पोर्तुगीजांची सत्ता होती. त्यामुळ गोव्यातल्या हिंदु सस्कृतीवर बऱ्याच प्रमाणात पोर्तुगीज सस्कृतीची छाप पडलेली दिसते.

त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'त्या चर्चच्या जागी पूर्वी नवे नार्वे येथे असलेल्या श्री सप्तकोटिश्वरचे मदिर होते.

'नवे नार्वे गावात आहे तो का सप्तकोटिश्वर ? ' सीतेनं विचारलं.

मी म्हणालो, ' हाय. ' सप्तकोटिश्वर या बेटाचे दैवत होते.

अलबुकर्कने धर्मांतराचा नांगर गोव्यात प्रथम फिरवला तो या बेटावर. त्याकाळी इथ पुष्कळ हिंदु कुटुंब रहात होती. त्यापैकी अनेक कुटुंबं धर्मांतराच्या जाचाला कंटाळला न् दशाधडी पळून गली.

आमच्या बरोबर चार पाच माणस चालली होती. ती एका कुटुंबातली असावीत. त्यातले एक गृहस्थ म्हणाले,

' श्रीकृष्णाने कसाला ठार मारल त्यावेळा जरासंधाने त्याचा पाठलाग केला. जरासधाने यादवांच्या राज्यातील जनतला अनेक तऱ्हेचा उपद्रव दिला. तेव्हा श्रीकृष्ण या गामत पर्वतावर यऊन राहिल होते. ह जरासधाला कळताच तो गोव्यावर चालून आला होता. श्रीकृष्णाने त्यावेळी गामंत पर्वतावर घनघोर लढाई केली. त्या लढाईत जरासंधाचा वध झाला. त्यावेळी श्रीकृष्णाने या श्री कोटिश्वराची आराधना केली होती.

सीतेकडं पहात मी म्हणालो,

'हे मंदिर १५१० साली अल्बुकर्कने पाडले होते. एका हातात क्रुस व एका हातात तलवार घेऊन आलेल्या अलबुकर्कने धर्मप्रचारासाठी हिंदू

धर्मीयांचे हे मंदिर उध्वस्त केले. त्यातील शिवलिंग एका विहिरीच्या काठावर टाकून दिले होते. लोक त्यावर पाय देऊन विहिरीतलं पाणी काढत असत. हे येथील महाजनांच्या पहाण्यात आले. त्याना ते आवडले नाही. त्यानी ते लिंग तेथून उचलून नवे नार्वे येथे नेले. नि तेथे त्याची स्थापना केली.

ते गृहस्थ म्हणाले

धर्मांतराने हिंदूवर होत असलेला अन्याय पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात गोव्यावर स्वारी केली. फोंड्याचा किल्ला घेतला. नि डिचोली मार्गे ते नवे नार्वे येथे गेले. नि त्यानी श्री सप्तकोटिश्वराचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांना वाटले, इथं मंदिर बांधावे. मंदिराच्या बांधकामास आरंभ करून पणजीवर हल्ला करावा असा बेत केला होता. त्यावेळी त्यानी मंदिराची बांधणी केली.

सप्तकोटीश्वराचे मंदीर ओलांडून आम्ही पुढे गेलो. आमच्याबरोबर एक कुटुंब होते. वंशावरून ते ख्रिश्चन असावेत. ते गृहस्थ माझ्याकडे वळत म्हणाले, ' आपण कुठले, '

मी म्हणालो, ' महाराष्ट्र. '

'महाराष्ट्र ?' प्रश्नार्थक दृष्टीने ते माझ्याकडे पहात म्हणाले, 'शिवाजीचे राज्य होते तो का महाराष्ट्र ? '

मी म्हणालो, ' होय. तोच महाराष्ट्र. मराठ्याचा महाराष्ट्र सतराव्या शतकात उत्तरेकडून आलेलं मुसलमानांचं आक्रमण ज्यानं थोपवून धरलं तो महाराष्ट्र . '

' काय व्यवसाय करता आपण ? ' त्यानी मला विचारले.

' नोकरी '

' कोणत्या खात्यात ? '

' शिक्षण. अध्यापक आहे मी. '

' असं. मी पण अध्यापकच आहे. काहीकाळ मी पण इंग्रजीचं अध्यापन केलं आहे. '

' का आला होता आपण गोव्यात ? ' त्यानी मला विचारलं.

' गोव्याच्या प्रवासावर लिहितोय. '

' असं काय, म्हणजे लेखक आहात तर ? '

' होय ? '

बाजूच्या घराकडे वळत ते म्हणाले, ' तिथं रहातो आम्ही, चला, थोडा वेळ थांबून मग जा.'

' काही हरकत नाही. ' असे म्हणून आम्ही त्यांचे बरोबर गेलो.

पोर्तुगीज धरतीवर बांधलेलं ते घर. घराच्या पुढे ओसरी, घरासमोर बाग, ओसरीच्या आतील बाजूस दोन्ही बाजूला दोन बैठका, माणसासाठी बसण्याची जागा, तीही गोमंतकातल्या घरांची सर्रास असलेली पद्धती मला त्याही घरात दिसली. त्या घराच्या भोवती एक दगडी भिंतीचे कंपौंड होते.

फाटकातून आत जाताच ओसरी लागली.

घरासमोरील ओसरी ओलांडून आत जाताच त्या गृहस्थाकडे पहात मी म्हणालो,

' आपलं नाव ? '

चष्म्याचे फटीतून डोकावत ते म्हणाले, ' कुट्टो, आमच्या कुटुंबात आम्ही तिघेजण भाऊ, मी आणि माझे आई वडील

' इतर भाऊ काय काम करतात ? मी विचारले.

ते म्हणाले ' एकजण व्यापार करतो, एकाचे दारुचे दुकान आहे, न् एकाचे बेकरीचे दुकान आहे '

तेवढयात समोरच्या खोलीतून एक मुलगा आला. त्याने गोल्ड-स्पॉटच्या बाटल्या आणल्या. आमच्याकडे देत तो म्हणाला, ' घ्या '

खिरस्ती माणसाच्या जीवनासंबंधी बोलताना ते म्हणाले,

' खिरस्त्याचा स्वभाव उधळा नसतो. खर्चाच्या प्रत्येक बाबीवर ते दीर्घ विचार करतील. आपले घर स्वछ ठेवणे, धर्माने घालून दिलेल्या कार्याचे पालन करणे. आणि संतुष्ट वृतीने रहाणे यातच ते समाधान मानतात. '

' धर्माबद्दल खिरस्त्यांना मोठा अभिमान असतो ना ?' मी प्रश्न केला.

' धर्माबद्दल फार आदर. ते गृहस्थ म्हणाले, 'दुपारी बारा वाजता किंवा सायंकाळी सहा वाजता चर्चची घंटा वाजली की ख्रिस्ती कपाळा पासून ते पायापर्यंत उभा आणि दोन्हीं हाताच्या दिशेने हात फिरवून क्रूश काढेल, मग तो एखाद्या समारंभात असो किंवा आणखी कुठल्या कामात असो.

क्रुश काढून झाल्यावर तो तोंडातल्या तोंडात एक लहानसे स्तोत्र म्हणतो. हिंदु धर्माबद्दल काही अवास्तव बोलून जाईल पण ख्रिस्ती माणूस आपल्या धर्माबद्दल कधीच बेसावधपणाने बोलणार नाही, दारु पिणे ही त्याची धर्माज्ञा आहे. प्रत्येक माणूस दारु पितोच.

ख्रिस्ती कुटुंबातील बहुतेक माणसं शिक्षण झाल्यावर परदेशी रवाना होतात. नि कुठल्यातरी धंद्यात पडतात.


ख्रिस्ती किराणा भुसार मालाच्या दुकानात गुंतून पडणार नाही. त्यापेक्षा बेकरी चालविण्यात तो समाधान मानतो.

एखादी बेकरी काढून उपजीविका करण्यात पुष्कळजण समाधान मानतात. ब्राह्मण ख्रिस्ती नि चाड्डो ख्रिस्ती अशा दोन मुख्य जागी ख्रिस्तीयात आहेत. व ज्या क्षत्रियानी ख्रिस्ती धर्म स्वीकारला त्याना चाड्डे म्हणतात. चाड्डयाना पोर्तुगीजांच्या वर्चस्वाचा त्रास होत असे. नि मिस्तीशांचाही त्रास सहन करावा लागे त्यामुळे त्यांची कोंडी होत असे त्यामुळे ते लोक कुठं तरी मोलमजुरी किंवा घरकाम अशी कामे पत्करीत. परदेशी गेलेले ख्रिश्चन कोण आगबोटीवर तर कुठे हॉटेलात मिळालेल्या नोकरीवर राहून आपले जीवन जगत असतात.

जास्त माणसांचे कुटुंब असलेवर त्यातल्या एखाद्याने दारूचे किंवा थंड पेयाचे दुकान, तर कुणी पाद्री व्हायचे, तिसऱ्याने परदेशात जाऊन स्थायीक व्हायचं.

नवे नार्वे दोन मैलावर आहे. तिथं जाणेसाठी मधल्या खाडीतून होडीने जावे लागते असे त्या गृहस्थाकडून समजले. म्हणून आम्ही खाडीच्या किनाऱ्यावर गेलो.

समोरच्या मांडवीच्या पात्राकडे पहात मी म्हणालो, ' कार्तिकी एकादशीदिवशी तेथे मोठी जत्रा भरते. लांब लांबचे भाविक लोक त्या दिवशी येतात. इथल्या पंचगंगेत स्नान करतात. इथल्या गंगेत स्नान करून श्रीसप्तकोटेश्वराचे दर्शन घेतल्यावर पुण्य लाभते अशी भाविकांची श्रद्धा आहे.



या दिवशी देवाची पालखी मंदिराभोवती फिरून पंचगंगेच्या किनाऱ्यावर येते. त्यावेळी पंचगंगेच्या प्रवाहातून बेलपत्रे, फुले वर येत असलेली दिसतात. त्यांचं दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी झालेली असते. त्यांचं दर्शन घेऊन भाविक लोक गंगातीर्थ घेतात.

आम्ही होडीचा आसरा घेतला.

होडी नव्या नार्वेच्या किनाऱ्याकडे चालली. होडी किनाऱ्याला लागली आणि आम्ही खाली उतरलो.

तिथून तीन किलोमीटर चालावे लागले. तेव्हा नवे नार्वेत पोचलो सभोवती उंच पहाड. हिरव्या वनश्रीने झाकलेली भूमी. एका एका बाजूने मांडवीचा परिसर दोन्ही बाजूनी डोंगराच्या उतरणी. मधल्या खोलगट जागेत नार्वे गाव वसला आहे. नैसर्गिक भक्कम संरक्षण लाभले-ल्या अशा ठिकाणी श्रीसप्तकोटीश्वराचे प्रस्थान ठेवले होते.

मंदीरासमोर पोचलो.

केवढा मोठा परिसर! समोर तळे बाजूस कुलागरे. फार उंच नाही पण अखंड दगडाच्या चिऱ्याचे मंदीराचे बांधकाम. सभामंडपाचे खांब पाहून बांधकामाच्या कला कुसरीची कल्पना येते.

श्री सप्त कोटीश्वराचे दर्शन घेतल्यावर.

तिथल्या पुजाऱ्याच्या आग्रहावरून आम्ही जेवण घेतलं नि थोडी विश्रांती घेतल्यावर डिचोली मार्गे येण्यासाटी नव्या नाक्यावरून बाहेर पडलो. देऊळवाड्यावरुन डिचोलीस गेलेल्या मार्गाने आम्ही चालत राहिलो

डोंगर टेकडी फोडून गेलेला नि डांबरीकरणाने बांधून काढलेला रस्ता पिळगाववरून डिचोलीस गेला आहे.

# १२

खाणीच्या अधिकाऱ्याची परवानगी घेऊन आम्ही खाणीच्या कार्यालयातून बाहेर पडलो. नि खाणीकडे जाणाऱ्या रस्त्याला वळलो.

डोंगर फोडून काढलेल्या रस्त्याने आम्ही चाललो होतो.

दोन्ही बाजूंनी उंच उंच डगरी उभ्या होत्या नि त्यांच्या दरम्यानच्या दरीतून गेलेला रस्ता वळणा वळणाने चालला होता. वरच्या टोकाकडे पाहिलं तर भीती वाटत होती. एखादा दगड घरंगळून खाली येतोय की काय अशी मनात शंका येत होती.

दोन किलोमीटर आत गेल्यावर खाणीतल्या कामाची कल्पना येऊ लागली. पायात उंच बूट, डोक्यावर शिरस्त्राण, अंगावर जाड शर्ट अशा वेशातली किती तर्रा माणसं तिथं खोदाईच्या कामात गुंतली होती. घामानं भिजलेले कर्मचारी आपआपल्या कामात गढून गेले होते.

डगरीला घासून उतरलेल्या रस्त्यावरून लहान लहान गाड्या खाली उतरत होत्या.

कड्यावर आम्ही उभे होतो. आमच्या समोर शंभर फूट खोलीच्या दरीत खोदाईची कामे चालली होती.

खाणीत डोकावत अवी म्हणाला, ' बापरे, किती खोलीवर खोद-काम चालले आहे. '

वर्तुळाकार आकाराच्या त्या खाणीच्या कडेच्या आतीलबाजूने खाली उतरलेल्या रस्त्यावरून दोन लहान गाड्या तोल संभाळत खाली उतरत होत्या. त्याच्याकडे पहात अवी म्हणाला, ' आण्णा ? '

' का रे ? '

' ते डंपर कुठं चाललेत ? '

' त्यांना युक्लेट म्हणतात ' मी म्हणलो, ' फॉरेन कंपनीच्या गाड्या आहेत.

त्या खाणीतलं मँगेनिज आणण्यासाठी चालल्या आहेत. एक गाडी एका वेळेला अठरा टन वजनांचे मँगेनिज घेवून येते.

कड्याला घासून गेलेल्या वर्तुळाकार मार्गावरून खाली उतरत अस–लेल्या युक्लेट गाडीकडे अवी पहात होता.

ती खाणीच्या तळाला पोचल्यावर जिथं थांबली तिथं एक व्हॉलपॅक उभी होती.

आमच्या शेजारी उभ्या असलेल्या अधिकाऱ्याकडे पहात अवी म्हणाला, ' ते मोठ्या ट्रकांसारखं दिसतंय ते काय हो ? '

अधिकारी ख्रिचन होता. तो म्हणाला ' वह तो गाडी ही है / व्हॉल-पॅक कहते हैं उसे । विदेशी बनावटीको है वह । यहाँके टाटा मर्सिडीस तथा लेलॅंड कंपनीके गाडीसेभी बडी होती है । एकही समयपर चालीस-पचास टनेज मँगेनिज वह सकती है । इतनी बडी ताकद होती है उसमें । '

मायनिंग अधिकारी बोलत होता. नि आम्ही ऐकत होतो. खाणीच्या तळात पुष्कळ माणसं काम करत होती, कोणी खडक फोडीत होते, तर कुणी बुलडोझरने खोदाई करीत होते.

तळाच्या बाजूला दगड माती भरण्याचं काम चाललं होतं.

त्याकडे वोटाने दाखवीत अवी म्हणाला, ' आण्णा, त्या गाडीत आपो-आप दगड भरले जाताहेत ते कसे ? '

' ते यंत्राच्या सहायाने भरले जाताहेत. यंत्राचे नांव आहे शॉवल. त्याला एक बकेट असतय ते बघ, शॉवल पलीकडच्या दगड मातीच्या ढिगाऱ्याकडे गेलं. '

त्यावेळी शॉवलने सुपाच्या आकाराचं तोंड त्या दगड मातीच्या ढिगाऱ्यात खुपसलं.

' बाप रे , ' आश्चर्यचकित नजरेनं त्या शॉवलकडे पहात अवी म्हणाला, ' हत्तीने सोंडेने पाणी खेचून घ्यावं तसं त्या बॅकेटान आपल्या जबड्यात दगड मातीचा ढिगच्याढीग घेतला की, '

तेवढ्यात ते गाडीकडे उतरले नि आपल्या जबड्यातील सारा माल त्याने त्या गाडीत ढकलला.

' खोऱ्याने माती ओढावी तसे ते शॉवल बकेटच्या सहायाने दगड मातीचे ढिगारे गाडीत भरते. '

' किती भरर काम करतेय नाही ? '

गाडी भरल्यावर ड्रायव्हरने अेंजीन चालू केलं.

आवाज देऊन गाडीने जागा सोडली. आणि खाणीच्या काठानं गिरक्या घेत घेत वर आली नि सपाटीच्या रस्त्याला लागली.

तेवढ्यात मध्यावरून खाली सरकत आलेली क्रेन दिसली.

तिच्याकडे पहात अवी म्हणाला , 'ही कसली शिडी ?'

' क्रेन आहे ती. तिला जोडलेल्या तारेवरून खाली झोके घेत येत असलेलं बकेट पाहिलंस ? ,

अधिकारी तळातल्या खोदाईकडे पहात होता. त्याठिकाणी आमच्या नजरा स्थिर झाल्या. अधिकाऱ्याकडे पहात मी म्हणालो, ' वहाँ खुदाईका काम चल रहा है, धीरे धीरे चलता है उसे क्या कहते है ?'

' वह है यंत्र, उसे हिंदमोन कहते है ।'

त्या वेळी ते खाणीच्या कडेला घासून चालले होते.

त्याने अर्धवर्तुळाकृती वळण घेतलं नि कडेला घासून ते चाललं.

'हवाई जहाज जिसतरह गोलाकार घुमते घुमते धरतीपर आता है उसीतरह क्रेनपरसे नीचे आनेवाला बकेट व्हॉलपॅक गाडीके उप्परसे नीचे उतरता है।'

खाली उतरत असलेलं बकेट गाडीपासून दोन फूट अंतरावर येताच थांबलं. त्याच क्षणी त्याचं खालचं तोंड उघडलं तशी त्याच्या पोटातली दगडमाती खाली गळू लागली.

त्याच्या पोटातले सारे दगड माती संपल्यावर त्याचं तोंड बंद झालं. ज्या गाडीत ते दगड माती पडली ती गाडी मागे सरकली नि निघून गेली. हिंदमशीनने अर्ध वर्तुळाकार गिरकी घेतली आणि ते गाडीपासून बाजूला गेले.

अवी कुतूहलानं त्याच्याकडे पहात होता.

अधिकारी म्हणाला 'व्हॉलपॅक बहुत उंचाई की होती है। इसीलिये मॅंगेनीजके पत्थर और मिट्टी शॅंपलके सहारे व्हॉलपॅकमे नही डाल सकते है उसी स्थानपर हिंद मशीनका इस्तेमाल किया जाता है।'

रणगाड्याने चालावे, तशा धिम्मेपणाने व्हॉयलॅप चालत होती. चढाच्या रस्त्याने वर येताना इंजिनचा आवाज कानठळया बसण्या इतपत वाढत होता. व्हॉलपॅक खाणीच्या मध्यावर आली. त्या वेळी युक्लेट गाड्या खाणीच्या वरच्या टोकावर येऊन पोचल्यान् आमच्या समोरुन पळून गेल्या.

समोर एक उंच टेकडी होती. तिला वेढा देऊन गेलेल्या रस्त्यानं त्या युक्लेट मार्गक्रमण करीत गेल्या त्या रस्त्याने आम्ही पुढं गेलो.

थोड्या वेळानं त्या दोन्ही युक्लेट टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोचल्या

आम्ही तिथं पोचलो त्यावेळी सूर्य अस्तास चालला होता. संप्रधीकाश पळून जाण्याच्या घाईत होता. खाणीत काळोख शिरत होता.

टेकडीवरच्या टोकावर गेलेली युक्लेट पहाताच अवी उद्गारला,

'आण्णा, ते बघा गाडी किती उंचीवर गेली,'

आम्ही तिकडे पहात राहिलो

तेवढ्यात कड्याने भरलेली माडी मागे उलटावी तसी त्या युक्लेटने आंपली ट्रॉली पुढून उचलली.

तसा आतील दगड मातीचा ढिगारा खाली कोसळला.

धुळीचे लोट उडाले. वादळ झाल्यावर उडावी तशी धूळ उडाली.

आपल्या पाठीवरचं सारं ओझं झुगारुन देऊन मोकळी झालेली युक्लेट मागे वळली. न् खाणीच्या तोंडाकडे धावत गेली.

' बर ' आता आपण पुढं जाऊया. '

असं म्हणून आम्ही पुढे चालत राहिलो.

दोन मीटार चालून गेल्यावर आम्हाला त्या खाणीच्या मागे वर्कशॉप भेटला.

पत्र्याच्या दोन शेड उभ्या होत्या. अवती भोवतीच्या पटांगणात दह पंधरा गाड्या उभ्या होत्या· शेड मधून ठोके मारण्याचा आवाज येत होता आमच्याबरोबर ओळखीच्या अधिकाऱ्या पाहून तिथला एक कामगार पुढे झाला नि सलाम ठोकून उभा राहीला.

तेलाने कळकटलेल्या कपड्यातला तो कामगार परत वर्कशॉपमध्ये गेला.

' यह खाण दफ्ततरालय, वह लॅब्रोटरीज, प्रयोगशालेकडे बोटाने दाखदित अधिकारी म्हणाला, ' खाणमेंसे लाया हुआ मॅंगेनिज यहाँ जांचा जाता है।

वर्कशॉपपासून अर्धा किलो मीटर चालून गेलो.

तिथं फार उचीच्या मशिनरी दिसल्या, कारखान्यातल्या मशिनरी सारख्या आवाढव्य मशिनरीकडे पहात अधिकारी म्हणाला ' वह स्कीनिंग प्लँट। खाणसे लाया हुआ - मॅंगेनिज वहाँ लिया जाता है ।

खाली गळलेली माती एका बाजूला पडली न् मोठी खडी एका बाजूला पडू लागली.

पावडर एका ठिकाणी, तर १। १।। इंचाचे तुकडं एका ठिकाणी, तर मोठे दगड एका ठिकाणी साचून रहात होते.

पलिकडे आमची नजर गेली. तिथं इंजीनला जोडलेल्या एका मोठ्या चाकाला जोडलेल्या पट्टयाची चेन हळू हळू सरकत होती. तिच्यावरचे दगड माती पुढे सरकत होती.

' हे दगड कुठं जाताहेत ? ' सीतेनं विचारलं. '

'समोरच्या क्रेशरकडे' बोट उभारून ते गृहस्थ म्हणाले, 'ये पत्थर उस क्रेशरके ओर जा रहे है । उस क्रेशरमे उसे काट जाता है । उसके तछहटने. उसीके सदयतासे मिट्टी छिनकर निचे गिरती है ।'

' पुन्हा त्यावर काही प्रक्रिया केली जाते का ?' मी प्रश्न विचारला.

' हाँ, की जाती है । फिर वे वाँशिग प्लाँटके साहयतासे साफ किया जाता है । ' ते गृहस्थ म्हणाले, '

' म्हणजे ? '

'म्हणजे त्यावर मातीचा जो रंग असतो तो धुतल्याकारणानं निघून जातो. नि चांगल्या प्रतीचे मॅंगीनीज उरते. उधर देखो वह माल साफ किया जाता है । '

असं म्हणून त्यांनी समोरच्या दिशेकडे पाहिलं आणि त्याच क्षणी आमच्या नजरा त्या दिशेकडे गेल्या.

चाकाच्या गतीमुळे त्यावरची चेन फिरत होती. त्याच गतीने त्यावरचे लोखंडाचे तुकडे मागे पुढे सरकत होते. आणि वरून कारंजाचे फवारे उडावेत तसे पाण्याचे फवारे त्यावर उडत होते. त्यामुळे ते मॅंगीनिज धुतले जात होते. नि पुढं जाऊन पडले जात होते. '

दगड जिथं पडत होते तिथं खाली गाडी उभी होती.

' हाच माल तुम्ही परदेशी पाठविता ? '

' नही वह साफ किया हुआ माल हम उस सामनेके प्रयोगाशालामें जाँचकर देखते है ।

' म्हणजे ? '

' याने उसमे लोहेका हिस्सा कितना है ? उससे उसका दर्जा किया जाता है । और फिर वह खाडीके तरफ भेज दिया जाता है ? '

त्यावरून त्याची प्रतवारी ठरवली जाते नि मग तो खाडीकडे पाठ–विला जातो.

' लॅबोरेटरीजमध्ये तपासून पाहिलेलं मॅंगनिज तुम्ही कुठं पाठवतां ? ' मी अधिकाऱ्यास विचारले.

तोंडातली सिगारेट बाहेर काढून तो म्हणाला, ' उधर चार किलो-मीटर दूरीपर खाडी है । वहाँ माल इकट्टां किया जाता है । बादमे वह बंदर मे लाते है । फिर जहाजसे विदेशी भेज दिया जाता है । '

' खाडीकडे जाणार आहात काय?' अधिकाऱ्याने माझ्याकडे पाहिलं.'

' होय '

' आप खाडी जानेवाले हो तो । वह गाडी उधर है । जानेवाली है तो फिर उसीसे जाओ । '

मग त्यानी कुणाला तरी हाक मारली.

गाडी थांबताच आम्ही ड्रायव्हरच्या केबीनमध्ये चढलो. '

खाडीवरचा मायनिंग येरमा फार मोठा होता. लहान टेकड्या एवढे मँगनीजचे ढीग तिथे होते. आम्ही तिथल्या कार्यालयात गेलो.

कार्यालयातल्या प्रमुख खुर्चीवर एक गोरा अधिकारी बसला होता. तो ख्रिश्चन असावा. तो समोरच्या माणसाशी इंग्लिशमध्ये बोलत होता. त्याचे उच्चारहि युरोपियन धर्तीचे होते.

त्याच्याकडे पहात मी म्हणालो, 'वुई वॉंट टू सी अ माईन, सो कॅन यु गिव्ह अस परमिशन ? '

' येस, यु कॅन गेट परमिशन सीअींग '

' व्हॉट इज द पर्पज ऑफ सीयींग ? '

' इन ऑर्डर टू डिस्क्राइब अ मंगनीझ प्राडक्शन इन द डिस्क्रीप्शन ऑफ ट्रॅव्हलिंग टू गोवा. '

आय प्रपोज टू सी द माईन्स ऑफ मँगनीझ व्हाईल सीईंग नॅचरल सीनरी इन गोवा.'

'व्हेअर हॅव यु बीन फ्रॉम ?'

'वुई हॅव कम फ्रॉम कोयनानगर.'

'व्हेअर इज कोयनानगर ?'

'अिन महाराष्ट्र, अ प्राव्हीन्स अिन इंडिया ?'

'हॅव यू टु सी गोवा ?'

'एस वुई हॅव कम टू सी गोवा'

असं म्हणत तो उठला न् चालू लागला. आम्ही त्याचेबरोबर कार्यालयातून बाहेर पडलो. त्याने आम्हाला सारा माइन एरिया दाखवला. स्टॉक करून ठेवलेले मँगेनीजचे साठे दाखवले नि समोरच्या खाडीच्या काठावर आम्ही थांबलो.

समोर खाडीचा जलाशय होता. त्यातून जात येत असलेली असंख्य गलबतं दिसत होती, त्यांच्याकडे पहात अवी उभा होता.

समोरच्या दिशेला बोट उभारत तो अधिकारी म्हणाला, 'लुक दॅट इज द् बार्ज.'

'बार्ज ?' सीता मजकडे पहात राहिली.

'बार्ज ? म्हणजे मालवाहू लहान बोट' तेवढयात तो अधिकारी म्हणाला, 'दोज बोटस् कॅरी मँगनीझ टू मार्मा गोवा.'

'हाऊमच मँगनीझ कॅन बी कॅरीड थ्रू अ स्मॉल बोट ?

'अँड व्हॉट इज गोईंग ऑन देअर बिटवीन दोज टू मेन ?'

'अ बोट कॅन कॅरी द मॅगेनीज लोड मॅक्अीमम् वन थाऊंजट टॅनेज लुक अँड दॅट मॅन बिलाँगिंग टु द कंपनी अिन जपान, हू इज साईनींग बॉड फार एक्सपोर्टिंग मॅगेनीज टू द फॉरिन कंट्रीज्.'

'तो व्हेरी बोट का हो आण्णा ? अवीने शंका विचारली.

'फार व्हॉट पर्पज दोज स्मॉल बोटस आर युज्ड ?'

'नो, दॅट इज अ स्मॉल बोट, रॉ आयर्न इज कॅरीड टू मार्मागोवा हार्बर थ्रु दट स्मॉल बोट'

'व्हॉट इज देअर वर्थ सीऑंग इन उजगांव माईन्स.'

'देअर इज ॲन आयर्न प्रोजेक्ट ॲट पाली उजगाव माईन्स बिलॉंगिग टू चौगुले कंपनी. प्युअर आयर्न इज प्रोडयूस्ड बाय धीस प्रोजेक्ट बाय डुइंग सम प्रोसेस, स्मॉल बॉलस आर मेड फ्राम मॅंगनीज पावडर'

आकाशाच्या दिशेने पहात अवी म्हणाला, 'ते काय हो आण्णा ?'
त्याक्षणी आमच्या नजरा वरच्या दिशेला वळल्या.

विजेच्या खांबासारख्या उंच उंच लोखंडी खांबाशी दोन तारा जोडलेल्या होत्या. त्या पलिकडच्या डोंगरापासून आलेल्या दिसत होत्या. रेल्वेच्या रुळावरून गाडी सरकत जावी तसे एक बकेट हळू हळू त्या तारे-वरून सरकत येत होतं.

अधिकाऱ्याकडे पहात मी म्हणालो, 'व्हॉट इज दॅट कमिंग ॲंड स्लिपींग टू ?'


पाकीटातली एक सिगारेट काढून त्याने तोंडात धरली. सिगारेट पेटवून तो म्हणाला, 'दॅट इज द स्लिपिंग बकेट' मॅंगेनीज इज देअर इन इट्. दॅट बकेट कॅन कॅरी अ टन आफ मंगेनीज.'

'इज देअर वर्थ सीऑंग बियॉंड दोज हिल्स ?'

'देअर इज अ माईन बिलॉंगिंग टू दि चौगुले कंपनी बियांड दि हिल. देअर इज आयर्न प्रॉजेक्ट. द आयर्न बॉलस बीऑंग प्रोडचुस्ड देअर आर ब्रॉट ओव्हर टू ब्रिज अप् टू धीस बीच.'

तेवढ्यात ते बकेट खाली उतरले. आमच्या शेजारी चार पाच माणसं उभी होती. त्यातील एक माणूस म्हणाला, 'त्या बकेटातून लोह-गोलक प्रकल्पात तयार झालेले लोखंडाचे गोलक इथं आणलेत. आता ते त्या बार्जमधून मार्मागोवा बंदराकडे नेले जाणार.'

मार्मा गोवा बंदराकडे बोटाने दाखवीत ते गृहस्थ म्हणाले, 'ते बघा चार सहा बार्ज मार्मागोवा बंदराकडे चाललेत.'



'त्यातलं लोखंड टान्स मीटरच्या सहाय्याने बोटीत भरले जाते, लाख दीड लाख टन वजनाच्या बोटी भरायला दहा बारा दिवस लागतात. काही बोटीवर मँगेजीन हाताने भरावे लागते.'

'मोठमोठ्या बोटीत हाताने मँगेनिज भरण्यासाटी खूपच दिवस लागत असतील.' मी म्हणालो.

तो अधिकारी म्हणाला, 'माईन इरियात स्टॉक करून ठेवलेलं मँगनीज सप्टेंबर, आक्टोबर पासून बोटीने परदेशी निर्यात केलं जातं.'

'होय, बराय आभारी आहे' असं म्हणून मी त्या गृहस्थाचे आभार मानले नि निरोप घेतला.

संध्याकाळचे सहा वाजले मडगांवात यायला. धुळीने, घामाने मळ-कटलेलं अंग धुवावे म्हणून आंघोळी केल्या न चहा घेऊन बाहेरच्या गच्चीत बसलो.

# १३

मी पणजीतल्या ब्रंगाज सभागृहात प्रवेश करीत होतो.

दुपारचा दीड वाजला होता.

आज गोमंतक मराठी साहित्य सेवक संघाच्या संचालक मंडळाची मीटींग होती असं परवा ऐकलं होतं, म्हटलं प्रवासाबरोबर काही काळ गोमंतकातील साहित्यिकांच्या सहवासात घालवावा म्हणून एक वाजता सुटलेल्या बसने मडगावहून आलो.

हे अलिकडच्या पिढीतले महाराष्ट्रातले कथाकार अशा शब्दात बा. द. सातोसकर यांनी साहित्य सेवक संघाच्या संचालकांना माझी ओळख करून दिली. नमस्कारासाठी हात जोडून मी म्हणालो, ' मी आपला थोडा वेळ घेऊ इच्छितो. '

महादेव शास्त्री जोशी म्हणाले, ' काही हरकत नाही. '

पंडित महादेव शास्त्री जोशीकडे पहाताच मला तर्कतीर्थ लक्ष्मण- शास्त्री जोशी आठवले. चेहऱ्यातला थोडा फरक बाजूला ठेवला तर वय शरीरयष्टी आणि पोशाख या सर्वच बाबतीत मला त्या दोघामध्ये बरेच साम्य असल्याचे जाणवले. त्यामुळे पंडित महादेव शास्त्रीबद्दल बोलत असतांना मी लक्ष्मणशास्त्री जोशींशींच बोलतो आहे की काय असा भास झाला.

दोघांची बोलण्याची लकबही जवळजवळ सारखीच फरक इतकचा की, महादेव शास्त्री जोशी भारतीय संस्कृती कोषाचे काम बघतात नि

लक्ष्मण शास्त्री जोशी भारतीय विश्वकोषाचे काम पाहतात. दोघंही एका मोठ्या कामात गुंतलो आहेत. भारतातल्या विद्वानात त्या दोघांचीही गणना होते.

महादेवशास्त्रीकडे पहात मी म्हणालो ' गोव्याच्या प्रवासावर लिहितोय मी. '

'असं ?'

साहित्याच्या अनेक दालनात पुष्कळ ग्रंथनिर्मिती करून महादेव शास्त्रींनी अनेक वेळा साहित्य सम्मेलनाचे अध्यक्षस्थानही भूषविले आहे. अशा एका मोठ्या साहित्यिकाशी आपण बोलतो आहोत याची जाण होताच मी वचकून बोलत होतो.

' आपण प्रवासावर बरंच लिहिलंय '

' बरंच नाही, पण लिहिलंय. '

'प्रवास वृत्तावरच्या लेखनासंबंधी मी आपणाशी बोलू इच्छितो. '

' बोला ना '

' प्रवास वृत्त श्रेयस्कर ठरण्यासाठी लेखकाने कोणत्या पद्धतीचा अव-लंब करणे आवश्यक आहे?

महादेव शास्त्री म्हणाले, ' प्रवास वृत्त लेखकाला श्रेयस्कर ठरावे याचा अर्थ ते वाचकांच्या आवडीचं व्हावं असंच ना ? '

'होय.'

'प्रवासवृत्तावर लिहितांना मी म्हणेन लेखकामध्य बहूश्रुतपणा असा-यला हवा'

'बहुश्रुतपणा ?' मी प्रश्नार्थक दृष्टीने पहात राहिलो.

ते म्हणाले, 'प्रवासी जे स्थळ पहातो त्यावेळी त्याला ते जसं दिसतं तसं तो शब्दांकित करीत असतो. त्या स्थळासंबंधीच्या माहितीसाठी तो विचारपूस करतो त्यावेळी त्याला जे ऐकायला येते त्यातही बरच वैचित्र्य दिसतं. त्यात काही आख्यायिका असतात तर काही दंतकथा असतात. तर काही इतिहासात जमा झालेल्या घटना असतात. या साऱ्यांचा प्रवास

वृत्तकारानी बारकाईने शोध घ्यायला हवा. नि तो योग्य त्या दृष्टीने वाचकापुढे ठेवायला हवा

लेखकामध्ये बहुश्रुतपणा असायला हवा असं मी म्हणालो ते अशा-साठी की काही स्थळात काही काळाने बदल होतात. जुने अवशेष नष्ट होतात.

काही घटना तर कालांतराने कालबाह्य ठरतात. नि त्यांचा इति-हास बाजूला पडतो त्या स्थळासंबंधीचे उल्लेख लेखकाने आपल्या दृष्टीतून सुटू देऊ नयेत. काही स्मारके आणि कांही वास्तूचे कांही काळानंतर जीर्णोद्धार होतात. त्यावेळी झालेल्या बदलाचेही लेखकाने विस्मरण होवू देवू नये.

'आता मी थोडा वेगळ्या मुद्याकडे वळतो.'

'काही हरकत नाही.'

'प्रवास कथनाबाबत ...... ..'

'हं माझ्या लक्षात आलं आपणाला काय म्हणायचे ते प्रवास कथना-बाबत लेखकाने प्रवास कथनाचा वेग धावता ठेवावा हे चांगलं. जी स्थळे अनेक दृष्टीनी महत्वाची आहेत, त्या ठिकाणीच वाचकाना थोडा वेळ रेंगा-ळून दिले तरी चालेल.'

जिथं प्रेक्षकांच्या नजरा स्थिरावतात, जिथं प्रेक्षकांची मने रमतात तिथंच लेखकाने मोठमोठी वर्णने आणि निवेदने करावीत. तिथं तसं फारसं बिघडणार नाही. पण नजरा किंवा मने ज्या ठिकाणी स्थिरावण्यास धजत नाहीत त्या ठिकाणी उगीच पाल्हाळिक वर्णने करून वाचकांना रेंगा-ळत ठेवणे योग्य ठरणार नाही.

'अलिकडच्या पिढीतले कथाकार' अशा शब्दात बा. द. सातोस्कर यानी गोमांतकीय मराठी साहित्य सेवक संघाच्या संचालकाना माझी ओळख करून दिली.

नमस्कारासाठी हात जोडून मी सर्वांच्या चेहऱ्यावरून नजर फिरवली.

मी जुन्या पिढीतला कथाकार म्हणून स्वतःची ओळख करून देत बा. द. सातोस्कर म्हणाले, 'गोमांतकाचे संपादकाची जबाबदारी संभाळून

लिहीत असल्यामुळे वेळेची फार उणीव भासते. कथा कादंबरीच्या क्षेत्रात मी जास्त लिहिलं पन्नास पुस्तकं लिहिली.

सातोस्कराना, मध्येच थांबवून मी म्हणालो, 'मी एका वेगळ्या मुद्याकडे आपलं लक्ष वेधू इच्छितो.

'काही हरकत नाही.'

'पन्नास पन्नास वर्षांच्या अंतराने जग बदलतंय.'

'होय.'

'त्या सृष्टीच्या नियमाने गोव्यातही बदल घडतोय.'

'होय.'

'स्वातंत्र्यानंतरचा बदल जास्त वेगाने होतोय.'

'होय'

'त्या बाबतच आपलं मत ?'

चष्म्याची काच धोतराच्या टोकाने पुसत सातोस्कर म्हणाले, 'ठराविक कालाच्या अंतराने बदल घडतोय हे चांगले आहे, पण गोव्याच्या सांस्कृतिक जीवनात जो एक बदल घडतोय त्याबद्दल मला थोडं वाईट वाटतं'

'कोणता बदल होत असल्याने ?'

'लॅटिन भाषेचा वापर बंद पडल्याने. पोर्तुगिज गेल्यावर इंग्रजी भाषा बाजूला पडत चालली आहे म्हणून'

'याबद्दल तुम्हाला काय वाटते ?'

'गोवा मुक्तीनंतर पोर्तुगीज पोर्तुगालला गेले. त्यामुळे लॅटीन भाषा बोलणारे बरेचजण इथून गेले. त्यामुळे उरलेले जे थोडे असणार तेही तसेच तुरळक, त्यामुळे त्याना थोडे बुचकळ्यात पडल्यासारखे होत असेल.'

मी म्हणालो, 'भाषेप्रमाणे नगरे पण बदलताहेत.'

'खरं आहे पणजी, म्हापसा, मडगाव, फोंडा, वास्को ही शहरं जस-जशी वाढताहेत तसतसं त्यांचं पूर्वीचं रूप बदलतंय.'

'नव्या वसाहती होताहेत त्या पुण्या मुंबईतल्या इमारतीसारख्या आयताकृति, उभ्या नि उंच इमारतींच्या'

' त्यामुळे पोर्तुगिज वळणाच्या बैठ्या नि आडव्या, आवती भोवती ओसऱ्या असलेल्या इमारती आता कुणी बांधत नाही '

' त्यामुळे सांस्कृतिक दृष्टिकोन बदलतोय. ' मी म्हणालो.

सातोस्कर म्हणाले, ' संशोधनात्मक किंवा ऐतिहासिक जीवनाची थोडी हानी होते. '

' हं, म्हणजे नगररचनेच्या दृष्टीतला जुनेपणा हा नष्ट होता कामा नये.'

' हा, तसंच म्हणायचं आहे मला. सातोस्कर म्हणाले, पणजीसारख्या शहरांची पूर्वीची वसाहत तशीच राहू देऊन नवीन वसाहती जिथं होत आहेत तिथे या नव्या वळणाच्या इमारतीना बसवायला हरकत नाही. '

'म्हणजे नव्याचं स्थान जुन्यापासून बाजूला असावं ?'

' हं. ते येवढ्यासाठी की जुन्यांचा इतिहास बदलण्याची पाळी येऊ नये, म्हणून मी म्हणतोय. तशी मुंबई दिल्ली या शहरांची पण वस्ती मोठ्या प्रमाणात वाढतेय पण वेगळ्या स्थळी, म्हणून नवी मुंबई, नवी दिल्ली हे शब्द रूढ झालेत.

'सातोस्कर, आपल्या मुद्यांचा रोख माझ्या लक्षात आला. जुनं नवं दोन्हीही असावीत पण त्यांचं वेगळेपण एकमेकापासून तुटक असायला हवं म्हणजे त्याचा एकमेकाना उपद्रव पोचणार नाही.

' बदलत्या दृष्टिकोनाबाबतचे आपले मत मला आवडले. आपला दृष्टिकोन नजरेपुढे ठेऊनच साहित्यिकांनी लेखन करावे अशा मताचा मी आहे '

शेजारी बसलेल्या गृहस्थाकडे पहात सातोसकर म्हणाले, हे केशव नारायण बर्वे. हे नाटयविषयाचे चाहते, संगिताची आवड असलेले नाटय नि संगीत कलेतल्या कलावंतांची चरित्र यांनी गंधाक्षता यात रेखाटलीत.

जयवंतराव सरदेसाई म्हणाले, ' वकीलीच्या व्यवसायामुळे मला वेळेची फार टचाई भासते. त्याकारणाने माझे हातून जास्त साहित्य निर्माण झाल नाही.

मी कथा चांगली लिहितो तसाच मी कथा चांगली जाणतो. पण मराठीतले ज्येष्ठ कथाकार ना. सी फडके, वि. स. खांडेकर यांचे जवळ-जवळ सारे कथा वाङमय मी अभ्यासपूर्वक वाचले आहे अलिकडच्या कथाकारांना काय लिहावे हे वाङमयापासून शिकता येईल. खांडेकरांच्या त्याच प्रमाणे 'कसं लिहावं' हे फडक्यांच्या वाङमयातून शिकता येईल,

'काय लिहावं नि कसं लिहावं' या मुद्यावरचं जयवंतरावांचं विवे-चन मला मनोमन पटले.

'काही जयवंतराव? असा उद्‌गारात मी म्हणालो, 'आपण म्हणता की अलिकडच्या कथाकारानी खांडेकर फडक्यांचं वाङ्‌मय अभ्यासलं पाहिजे. या मुद्यावर मीं थोडा तपशीलात जाऊ इच्छितो.

'काही हरकत नाही.'

'ज्या लेखकांचं वाङ्‌मय आपण अभ्यासलं आहे त्या लेखकांचं खाजगी जीवन आपण जवळून पाहिलंय काय ?'

'होय, फडक्यांचं जीवन मी फार जवळून पाहिलं आहे.'

'होय ना ? मग मला सांगा, फडक्यांच्या कथा कादंबरीतल्या व्यक्तीरेखा नजरेपुढं येताच व्यक्तीरेखा त्यातल्या काही लेखकाच्या व्यक्तीरेखेशी बऱ्याच बाडतीत सारख्या दिसतात? प्रो. केसर ना. सी फडके यांचा नि माझा स्नेह होता. ते कधी गोव्यात आले तर मला भेटल्याशि-वाय परत जत नव्हते ?

मी म्हणालो, खांडेकरांचं जीवन मी जवळून पाहिलं आहे. जीवनाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टीकोन त्यांच्या वाङमयात ठायीठायी आढळतो,'

'जयवंतराव म्हणाले खरं आहे तुम्ही म्हणता ते.

दामोदर अच्युत कारेशी बोलताना मी म्हणालो.

'मी आपणाशी काव्यासंबंधी बोलू इच्छित नाही'

'तर ?'

'पोर्तुगीजासंबंधी'

'काही हरकत नाही'

पोर्तुगीज राजकर्त्यामधील विशेष असे कोणते गुण तुम्हाला आवडले?

कारे म्हणाले, 'भारतीयांना जसे इंग्रजांचेकडून शिस्त नि व्यवस्थापन शिकता आले तसे गोमंतकीयाना पोर्तुगीजाकडून शिस्त स्वच्छता व व्यवस्थापन शिकता आले.

'गोव्यात किती टक्के पोर्तुगीज असतील ?

'राज्यकर्ते, शासन संस्थेतील कर्मचारी व अधिकारी हे सारे पोर्तुगीजांची इथली सत्ता संपताच पोर्तुगालला निघून गेले अन् थोडे उरले ते असतील.'

'आता इथं आहेत त्यांची काय स्थिती ?'

'बदलत्य ।राजसत्तेतसुद्धा त्यांच्या दैनंदिन जीवनात विशेष असा फरक दिसत नाही. धर्मावरची श्रद्धा तिळमात्रही कमी झाली नाही.'

'लोकशाही राज्यपद्धतीने त्यांच्यावर विपरीत परिणाम झाला आहे असं वाटतं का तुम्हाला ?'

'लोकशाहीतल्या समाजवादाचा पुष्कळच परिणाम झाला आहे. पूर्वीइतके हिंदुपासून ते दूर रहात नाहीत. आता ते हिंदुंशी फार जवळीकतेने वागतात.'

'अर्थात खरे पोर्तुगीज नाहीत ते.'

'म्हणजे ?'

'म्हणजे जे उरलेत त्यातले चाडचें खिरस्ती जास्त आहेत.'

बाटाबाटीच्या काळात हिंदुचे खिरस्ती झालेले किंवा मेस्तीस खिरस्ती असेच खिरस्ती आता येथे जास्त आहेत.

खरे पोर्तुगीज इथली सत्ता नाहीशी होताच निघून गेले.

'बरं, अलिकडे हिप्पींची संख्या वाढते आहे त्याचे कारण ?'

गोव्यात येवून थांबणे. हिप्पींची अनेक कारणे असावीत. पैकी एक कारण असावे ते तिथल्या आतल्या उपद्व्यापाला कंटाळल्यावर काही काळ दुसरीकडे विश्रांतीसाठी कुठतरी जावे हे '

दुसरे म्हणजे आपल्या धर्माची आजच्या तिथल्या बदलत्या राजकीय स्थितीत काय अवस्था आहे हे समजून घेणे.

थोडे बाजूला सरकून कारे म्हणाले,

'हिप्पींच्यात सुद्धा वेगवेगळ्या थरातले लोक आहेत. जसे कमी शिकलेले तसेच जास्त शिकलेले.'

♥♥

# १४

दीड वाजता आम्ही टुरीझमच्या कार्यालयात पोचलो.

व्यवस्थापकाच्या समोरच्या खुर्चीवर टेकत म्हणालो, 'आम्हाला टूर प्रोग्रॅम हवा आहे.'

त्याच क्षणी त्याने बाजूच्या ट्रेमधला टूर प्रोग्रॅमचा कागद माझ्याकडे दिला.

TOURISM OF GOVT. OF GOA PANJI-GOA

TOUR NO. 1 ( North Special )

( From 9-30 a.m to 7-00 p.m. ) Rs. 18-00

Panji to Altino Hisstop
Arvalem Waterfall and Shiva / Temple,
Datta Mandir, Mayem Lake.
Mapusa, Vagator, Anjuna, Baga, Calangute,
Aguada Fort. Baek to Panji

TOUR NO 2 ( Beach Special )

(From 3-30 to 8 p. m ) Rs. 8 00 (Rs eight only)

Panaji to Aguada Fort
Calangute Beach, Baga, Anjuna ...
Vagator, Mapusa, Back to Panaji

TOUR NO. 3 ( Salcete Special )

Panji to Mira Mar, Dona Paula, Old Goa,
Mangueshi, Mahalsa, Ramnathi, Shanta-
Durga, Margao, Colva Beach, Vasco Da-
Gama via, Zuarinagar & Cansaulim,
Mormugoa Harbour Pilar via Agasaim,
Back to Panaji.

टूर प्रोग्राम वाचून झाल्यावर मी पाकिटातले पैसे काढले नि त्याच्याकडे देत मी म्हणालो,' टूर नं. थ्री-तीन 'तीन सीटची जागा रिझर्वकेल्याचे दर्शविणारी ती तीन तिकीटे घेऊन मी उठलो्‍ सीतेकडे पहात उद्गारलो, ' हं चला. ' त्याच क्षणी ते दोघेही उठले.

टुरीझमच्या कार्यालयातून बाहेर पडताच रस्त्याच्या पलीकडे टुरीस्ट बस उभी होती. हॉर्नचा इशारा देऊन बसने जागा सोडली. पणजीबाहेर

पडताच तिचा वेग वाढला. ओल्ड गोवा सोडून अर्धातास झाला होता.

हे 'फर्मानगुढी' बाजूस बोटाने दाखवीत गाइड म्हणाला, ' तिथे गण-पती आहे फर्मानगुढीचा गणपती म्हणतात तो हाच हिंदूंचे मोठे श्रद्धास्थान. गोव्यात आलेले हिंदू फर्मानगुढीच्या गणपतीचे दर्शन घेतल्याविना परतत नाहीत.

बाटाबाटीच्या काळात याची पण फार दयनीय अशी अवस्था झाली होती. या मंदीराचे पुनर्जीवन दयानंद बांदोडकर यानी केले.

सतरांव्या शतकात महाराष्ट्राचे मी शिवाजी राजे गोव्यावर चालून आले होते ते याच मार्गावरून. म्हणून येथे शिवाजी राजाचे स्मारक उभा-रण्याचा गोवेकरांचा मनोदय आहे. ' गाईड बोलत होता.

टुरिस्ट बस फोंड्याच्या मार्गावरून धावत होती.

पावणेचार वाजता बस थांबली.

निसर्गाच्या कुशीत वसलेले फोंडा शहर छान दिसले. बसस्टँडवर-च्या बसेसचीन टॅक्सी मोटार गाड्यांची गर्दी पाहून फोंडाशहराच्या वहा-तुकीची कल्पना आली.

गाईड म्हणाला ' हे फोंडा शहर गोव्यातील मुख्य शहरापैकी फोंडा एक शहर आहे.

येथे इतिहास प्रसिद्ध किल्ला आहे. छत्रानी शिवाजी राजानी गोव्यात येताच हा किल्ला घेतला होता संभाजी राजेही फोंड्याच्या किल्ल्याच्या आश्रयानेच गोव्यात आले होते.

बसचा वेग मंदावला म्हणून आम्ही समोरच्या दिशेला पाहिलं तेव्हढ्यात गाईड म्हणाला, ' हे शांता दुर्गा मंदीर. '

पंधरा मिनिटात दर्शन घेऊन मागे परतायचं आहे. असं सांगून गाईड दरवाजाबाहेर पडला.

ती सूचना कानावर येताच आम्ही दरवाजाबाहेर पडलो.

ज्या वेळी विष्णू आणि शंकर यांचं युद्ध जुंपलं त्यावेळी वसुंधरेला वाचवण्यासाठी ब्रम्हदेवाने दुर्गेचं स्तवन केलं. दोघानाही निष्प्रभ करणारी दुर्गामाता प्रकटली. तिनं दोघानाही शांत केलं. म्हणून तिला शांता दूर्गा म्हणतात.

' हे शैव सारस्वतांचं दैवत. '

गाईड म्हणाला, ' मंदीराची रचना दाक्षिणात्य पद्धतीची आहे. '

उतरत्या तीन कौलारू छपराचे आवरण मंदीरावर आहे. मधले उंच असून त्यावरचा मनोरा अष्टकोनी आहे. त्यामुळे मंदीराला विशेष अशी शोभा आली आहे.

धर्मांतराच्या काळात शांता दूर्गा कुठाळीजवळ केळोशी येथे होती. त्यावेळी पोर्तुगीजांच्या तावडीतून सोडवून तिला कवळचास आणली.

समोरच्या मूर्तीकडे पहात सीता म्हणाली, 'देवीची मूर्ती उभी आहे.'

मी म्हणालो, ' तिच्या एका हातात शिव आणि दुसऱ्या हातात विष्णू आहे.'

मूर्तीचा मुकुट, चेहरा व कान सोन्याच्या पट्ट्यानी मढविले आहेत. नऊवारी भरजरी वस्त्रातली असंख्य दागिन्यांनी मढविलेली दुर्गामाता वैभवसंपन्न नि लक्ष्मीसारखी दिसते.

समोरच्या दिशेला बोट उभारून गाईड म्हणाला, ' मूर्तीच्या पुढे एक शिवलिंग आहे. अभिषेक करतेवेळी मूर्तीवर व शिवलिंगावर अभिषेक केला जातो. गाभाऱ्यातले दिवे लागले म्हणजे एका हाताने आशीर्वाद देणारी व दुसऱ्या हाताने प्रसाद मागणारी मंगल मूर्ती उठावून दिसते. '

गाईड बोलत होता नि आम्ही ऐकत होतो.

तो म्हणाला, ' दसऱ्या दिवशी शांतादुर्गेची ही मूर्ती चांदीच्या पालखीतून सीमोलंघनास जाते. नवरात्रात ती वेगवेगळ्या रुपात दिसते. एका

मूर्तीला महालक्ष्मीचे रूप दिले जाते तर दुसरीला सरस्वतीचे, मखरातल्या लक्ष्मी सरस्वती एकत्र नांदत असतात.

दुसऱ्या दिवशी ती भवानीचे रूप घेते नि शिवछत्रपतींना तलवार अर्पण करीत आहे अशी दिसते.

नमस्कार केल्यावर महाजनाने आम्हाला तीर्थ दिले, त्यावेळी तो म्हणाला, 'त्या तिथं दुर्गामातेच विश्रांती स्थान आहे. त्या शयनागारात मूर्ती विश्रांती घेतात.'

'या मंदिराची बांधणी फार सुरेख आहे.' एकजण म्हणाला. त्यावर महाजन म्हणाला, 'या मंदिराची उर्जितावस्था करण्यासाठी छत्रपती शाहूनीही मोठी मदत केली आहे

मंदिरातून बाहेर पडल्यावर आम्ही बसचा आश्रय घेतला.

पणजी सोडून एक तास झाला असेल. बस जास्त वेगाने धावत होती रायबंदर जुन्या गोव्याचा काही भाग ...

बसने एक वळण घेतले तशी बाजूला खाडी दिसली.

'ही कोणती खाडी ?' अवीने विचारले.

'जुबारीची खाडी ही.' मी सांगितले.

गाईड म्हणाला, 'हा बोरीचा पूल.'

डावीकडे पहात मी म्हणालो, 'हा बोरी गाव. इथंच बा. भ. बोरकर जन्मले.'

माझ्या शेजारी बाकावर बसलेला तरुण म्हणाला,

'साठ साली पोर्तुगीजानी पाडलेला हा पूल.'

'का ?' मी त्याच्याकडे पहात म्हणालो.

'गोवा स्वातंत्र्य युद्धांत.' तो तरूण म्हणाला, 'सोळाव्या शतकापासून गोव्यांत पोर्तुगीजांची सत्ता होती. त्यामुळे गोव्यातली जनता त्रासली होती. गोव्यातल्या क्रांतिकारकानी त्या सत्तेविरुद्ध चळवळ सुरु केली. अखेरीस त्यानी भारत सरकारची मदत मागितली. आणि पोर्तुगिज सरकाराविरूद्ध लढा पुकारला.

एकोणिसशे साठ सालची ती घटना, हिवाळयाचे दिवस होते. गोव्याच्या मदतीला धावून आलेल्या भारतीय फौजा फोंडामार्गे गोव्यात घुसल्या. कांही बेळगावहून आंत घुसल्या.

दोडा मार्गे गोव्यात प्रवेश केलेल्या तुकडीने असनोडा, म्हापसा ही ठाणी घेतल्यावर भारताच्या अफाट सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही म्हणून पोर्तुगिजांचे सैन्य ठाणी सोडून मागे पळाले.

त्यांच्या पाडावासाठी त्यांच्या पाठीशी भारतीय सैन्य होते.

पोर्तुगिजांचे सैन्य मागे हटले.

बोरीचा पूल पार करुन मागे सरकले.

अेवढयावर ते थांबले नाहीत तर भारतीय सैनिक पुढे येऊ नयेत म्हणून त्यांनी गोळ्या झाडून पूल उडविला. पूल पडल्यांकारणाने भारतीय सैनिकांना पुढे सरता येईना. मग भारतीय सैनिकानी त्या पुलाची दुरुस्ती करून वहातुक चालू केली. आणि मग पणजीवर चाल केली पणजीत प्रवेश केल्यावर भारतीय सैनिकांनी विमानातून बॉम्बचा वर्षाव केला. नि राजवाडयावर हल्ला केला. व्हाईसरॉयला कैद केले. त्यामुळे पोर्तुगिजांची गावे ढिली पडली. सारे पोर्तुगिज सैनिक पोर्तुगालला जाण्यासाठी बोटीत चढले.

गोव्यातून पळ काढणाऱ्या प्रोर्तुगिजांच्या बोटीला पण भारतीय सैनिकांनी घेरले. सापडलेले सैनिक बंदीशाळेत ठेवले. नि गोव्याचा भारताने ताबा घेतला.

एकोणीसशे साठ साली गोव्यातली पोर्तुगीजांची सत्ता नाहीशी झाली नि भारतीय लोकशाहीप्रणित महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाची राजसत्ता आली हिंदुत्ववादी नेते दयानंद बांदोडकर याना नेतेपदी निवडून गोमांतकीयानी आपली सता प्रस्थापित केली.

'म्हणजे गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर. ?'

, होय.'

गाईड म्हणाला, 'हा फोंडा, फोंडा तालुक्याचं ठिकाण असून गोव्यातल्या शहरापैकी हे एक शहर आहे, या तालुक्यात हिंदूची मंदीरं जास्त

गाईडचे कानावर शब्द आदळताच मी बाहेर पाहिलं. तर रस्त्यानं दिशा बदलली होती.

बसचा वेग आणखी वाढला.

रस्त्याच्या बाजूचे माड, पोफळी मागे सरत होत्या.

गाईड म्हणाला, 'मडगांव' हे गोव्यातल्या प्रमुख शहरापैकी एक शहर आहे.

म्युनिसिपल गार्डन ओलांडून बस पुढे सरकली.

जवा बाजार ओलांडून बस मडगावाबाहेर पडली.

समोरून येणारे खारे वारे धडका देत होते. नारळाची झाडे बसला आडवून धरत होती.

बस थांबली म्हणून आम्ही बाहेर पाहिलं तर समोर सागर किनारा दिसला. त्यावेळी आपण कोलव्यावर आलो याची जाणीव झाली.

बसमधून उतरताच ओळीत उभ्या असलेल्या पांच सहा बसेस दिसल्या पर्यटकांची समुद्रकिनाऱ्याकडे चाललेली गर्दी दिसली. आम्ही ही त्या दिशेनं वळालो.

सूर्य आकाशाच्या माथ्यावर होता. सावल्या पायाशी घोटाळत होत्या. डाव्या बाजूच्या मादक पेयाच्या दुकानासमोरच्या मांडवात दहा-बारा हिप्पी कानगोष्टी करत बसलेले दिसले. त्यांच्याकडं पहात अवी म्हणाला, 'आण्णा, हे कोण ?'

मी म्हणालो, 'हिप्पी'

बारकाईने निरखीत अवी म्हणाला, 'किती गोरे आहेत. !'

'युरोपियन लोक गोऱ्या वर्णाचे असतात. तिथं हवा थंड असते त्यामुळे त्यांचा वर्ण गोरा असतो.'

त्या वेगळ्या संस्कृतीतल्या लोकाना पाहून अवीची उत्सुकता वाढली.

‘ ते कोठून आलेत ? ’

‘ इंग्लंड, अमेरीकेतून ’

‘ इतक्या लांबीवरून कां आलेत ते ?’

‘ आपण गोवा पहाण्यासाठी आलो आहोत ना ? तसेच ते पण आलेत. फार लांब-लांबच्या राष्ट्रातून ते फिरत असतात. ’

पिठासारख्या बारीक वाळूतून पावलं टाकीत आम्ही चाललो होतो. समोरून दुधासारख्या फेसाळलेल्या लाटा आमच्याकडे धावत येत होत्या.

बाळूत रुतत असलेली पावलं उचलीत सीता म्हणाली, ‘फारच छान आहे की कोलव्याचा समुद्र किनारा. ’

मी म्हणालो. ‘ भारतातल्या प्रसिद्ध समुद्र किनाऱ्यापैकी कोलवा हा एक किनारा आहे. ’

अवी म्हणाला, ‘ मुंबईतल्या गिरगाव चौपाटीवरच्या समुद्रापेक्षा इथला समुद्र चांगला आहे.’

मी म्हणालो, ‘या किनाऱ्याचा विशेष आगळेपणा आहे तो किनाऱ्याच्या समपातळीत समुद्राचा जलाशय दिसतो,हा. त्या दृष्टीने पाहिले तर मुंबईच्या जुहूच्या किनाऱ्यावर आपण आहोत की काय असे क्षणभर वाटते.या देखाव्याचं चित्र उलटं करून पाहिलं तर वाटतं मद्रासच्या मरिनो किनाऱ्यावरून बंगालचा उपसागर असाच दिसतो.

लाटा जिथपर्यंत येऊन पोहचत होत्या तिथपर्यंत आम्ही येऊन पोहोचलो. ओल्या पुळणीवर पावलं उमटत होती. अवी मोठ्या मजेने पुढे गेला. तेवढ्यात एक लाट आली.

तिचा स्पर्श होताच तो घाबरून पाठीमागे पळाला.

सीता साडी सावरून मागे वळली.

'घाबरू नकोस.' मी म्हणालो 'अग, ती लगेच परत जाते.'

तेवढ्यात लाट परत गेली.

ते दोघेही त्या लाटेकडे पहात राहिले.

सीतेकडे पहात मी म्हणालो,

'गोव्याला लाभलेल्या ८० मैलाच्या किनाऱ्यावरील कळंगुट, मीरामार, दोना करंझाळ पावला, कोलबा, बानावली ही किनाऱ्यावरी स्थळे पर्यटकांना जास्त समाधान देतात. हिप्पीच्या जीवनावरील काव्याच्या सुरवातीला कवी पी. सावळाराम म्हणतात, 'जिथं सागरा धरणी मिळते, तिथं तुझी मी वाट पाहते' गोव्यातले हे सारे किनारे पश्चिमाभिमुख आहेत. येथील प्रसिद्ध लेखक माधव गडकरी म्हणतात, 'गोव्यातले किनारे इंग्लंडच्या विल्सच्या किनाऱ्यासारखेच प्रवाशाला लुब्ध करतात.'

बाजूच्या पर्यटकात चाललेली बोलणी ऐकताच मला वेळेची आठवण झाली. मागे वळून बसकडे पाहिल्यावर बसमध्ये बहुतेक प्रवासी बसलेले दिसले. 'बरं बस निघण्याच्या बेतात आहे चला' असं मी म्हणालो आणि बसच्या दिशेने धावत सुटलो.

# १५

शेजारच्या खोलीतले गृहस्थ गच्चीत आले. त्याना मी म्हणालो,

' मडगांव, हे गोव्यातस्या सांस्कृतिक चळवळीचे केंद्र आहे. जसं पुण्याला विद्येचं माहेर घर समजतात तसं गोव्यात मडगांवाला मानतात मराठीतले साहित्य संस्कृति विषयक अनेक कार्यक्रम इथं होतात. कै वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलनाचे पंधरावे अधिवेशन झाले ते इथेच.

ते गृहस्थ बंगलोरहून आले होते. त्याना मी म्हणालो, 'अन्य प्रांतांतून एखादा विद्वान आला तर त्याचे प्रथम स्वागत मडगांवात होईल. '

प्रागतिक संघ नावाची इथं एक संस्था आहे. ती हिंदू समाजाच्या व मराठी भाषेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटत असते. व्यवस्थापक मंडळाचे घडवून आणलेल्या वि. स. खांडेकर ग. त्र्यं. माडखोलकर, न. चिं. केळकर अशा दूरच्या मराठी साहित्यकांची व्याख्यानं घडवून गोवेकरांना त्यांच्या विचाराचा लाभ मिळवून दिला. हरीमंदीर विठ्ठल मंदीर आणि दामोदराचे सभागृह ही हिंदूंची सार्वजनिक श्रद्धास्थाने– या कार्यात केशव अनंत नायक यांचा मोठा वाटा आहे.

दामोदर सभागृहात दर सोमवारी तिन्हीसांजेच्या वेळी समई पेटवून ठेवतात. रात्री भजन होत असते. मठग्राम नावाची अशीच एक मराठी

संस्कृतिसंबंधी आस्था बाळगणारी संस्था आहे. पोर्तुगीजांना हिंदू संस्कृति नष्ट करून पोर्तुगीज संस्कृति इथं रूजवायची होती. जो चार शतके इथं प्रयत्न चालवला होता त्याला वरचेवर प्रहार करून हिंदू संस्कृतीचा उद्धार करण्याचे दत्तात्रय व्यंकटेश पै, शांमरा सरदेसाई, अ. का प्रियोळकर, दामोदर बाळकृष्ण भगवंत बोरकर, बा द सातोस्कर या मंडळीना जास्तीत जास्त श्रेय लाभले.

मठग्राम हिंदू सभेने कांही शिक्षण संमेलनेही घेतली.

विसाव्या शतकातील सुरवातीच्या काळात मराठी साहित्य साधना करणारे काही साहित्यिकही इथं निपजले. कृष्णंभट बांदकर जोयशी, करडे शास्त्री शवेलकर, दादा वैद्य, शांबाराव सरदेसाई. नंतरच्या पिढीत प्रियोळकर, पिसुर्लेकर, सावर्डेकर, दत्तात्रय व्यंकटेश पै यांचा वारसा घेऊन त्या नंतरच्या पिढीने दामोदर अच्युत कारे, महादेव शास्त्री जोशी, बा. भ. बोरकर, मो. ग. रांगणेकर, लक्ष्मणराव सरदेसाई चंद्रकांत काकोडकर बा. द सातोस्कर, सां. ध कंटक व्यंकटेश पै जयवंतराव सरदेसाई सायस्कर या साहित्यिकानी चालविले नि साहित्य सेवा केली.

' ते गृहस्थ म्हणाले, पूर्वी मडगावला अस्ताव्यस्तपणा जास्त होता. घराभोवतीचे तट मोठे बांधले जात होते. एकेका ख्रिश्चनांच्या घराचा तट अर्धा अर्धा मैल लांबीचा असे. अजूनही तसी कांही घरे आहेत.

तेवढ्यात सीता आली न् म्हणाली,

' अहो, सहा वाजले. आपणाला मोती टेकडीवर जायचं आहे ना ? '

'चला, असे म्हणत मी उठलो.

सहा वाजता आम्ही मडगांव लॉजमधून बाहेर पडलो.

सहा वाजले मोती टेकडीवर पोचायला संधी प्रकाश नाहीसा

झाला होता, मडगांव शहरातील लाल, तांबडे हिरवे दिवे डोळ्यापुढे लखलखत होते.

' पर्वतीवरून पुणे दिसावे तसे इथून मडगांव दिसते आहे ' मी उद्गारलो.

अवी म्हणाला, ' पुण्यापेक्षा मडगाव लहान आहे ना ? '

मी म्हणालो, ' होय. '

मोती टेकडीवरून परतल्यावर दामोदर अच्यूत कारे यांचेकडे जेवण घेतले नि लॉजवर परतलो.

दहा वाजता बिछान्यावर टेकलो नाईट ड्रेसात असल्यामुळे कॉटवर आडवा होऊन सिगारेट पेटवली नि दिनांक १९ च्या टुर प्रोग्रामसंबंधी सीतेशी बोलत होतो.

' उद्या मॉर्निंगचे प्रार्तविधी आटोपल्यावर मडगावातल्या सांस्कृतिक संस्थाना धावती का होईना पण भेट द्यायची म्हणतोय संचालकाशी थोडा-वेळ बातचीत करायची आहे '

' पण हे करत असताना वेळेचं भान ठेवायला हवे ' सीता म्हणाली.

' होय, मी म्हणालो, नाहीतर परवा सारखं व्हायचं. चहा झाल्यावर वृत्तपत्र पहाण्यासाठी अर्धा तास जास्त खर्च झाल्यामुळे टुरीस्ट बस मिळू शकली नाही. खाजगी बसेसने जास्त पैसे खर्च करावे लागले '

बाजूच्या काटवरचा अवी म्हणाला, 'आण्णा, आपला उद्याचा मुक्काम कुठे ? '

मी डायरी घेऊन उघडली आणि तिच्यातला दिनांक १९ चा टुर प्रोग्रॅम पाहिला न म्हणालो. ' उद्या आपला मुक्काम म्हापशात '

' मग काल धुलाईला दिलेले कपडे आणले पाहिजेत' अवी.

' हो '

सीता म्हणाली, ' तुम्ही उद्या बँकेत जायला हवे. परवा घेतलेल्या पैशातले फक्त दोनशे रुपये उरलेत. तेवढे आजच पुरणार नाहीत. '

सारस्वत ब्राम्हण समाज, श्री. दामोदर वाचन मंदीर, विठ्ठल मंदीर श्री. दामोदर वाचन भवन, श्री. दामोदरांचे सभागृह ही ठिकाणे सांस्कृतिक चळवळीची केंद्रे होती.

मोती टेकडी हे या शहरातले उंचीवरचं ठिकाण. येथून आवतीं भोवतीचं शहर दिसतं. जसं मलबारहिल वरून मुंबई शहर दिसतं तसं.

लॉजच्या गच्चीत आलो

बाजूच्या रूममधले गृहस्थ म्हणाले. 'आपोलो ११ यान चंद्रावर पोचलं. त्या अमेरिकन मानवाचं जगांत अभिनंदन केलं.'

'जगातला मोठ्यात मोठा विक्रम केला. आर्मस्ट्रांगने.'

मी म्हणालो.'

कोट साफ करीत बाहेर जाण्याच्या तयारीत असलेने ते गुजराथी गृहस्थ म्हणाले, 'ठरलेल्या वेळेपेक्षा पाच सेकंद उशीरा पोचल्याबद्दल आर्म स्ट्रॉंगने साऱ्या जगाची माफी मागितली.' आणि आम्ही मात्र असंख्य मिनिटांच्या अपव्यय केला.'

'कोण आर्मस्ट्रॉंग हो ? ' अवी बोलला.

'चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अमेरिकन मानव. वर्तमानपत्र त्याच्याकडे देत मी म्हटलं ' तो बघ त्याचा फोटो.'

अविनाश केसरीच्या अंकात पहात राहिला.

छत्री घेऊन जिन्याकडं वळले. गृहस्थ म्हणाले, 'भारतलेही अव-काश संशोधनात उतरायचे म्हणतोय.'

'होय, असं पंतप्रधानानी म्हटलं आहे.'

'ते जिना उतरू लागले.'

'आम्ही जेवणासाठी उठण्याच्या बेतात होतो.'

# १६

सकाळी नऊ वाजता आम्ही ' वास्को ' स्टेशनवर उपस्थित राहिलो.

स्टेशनवर पोचल्यावर रेल्वेचे वेळापत्रक नजरेपुढे आणलं. वास्को मुंबई एक्स्प्रेस दहा वाजता सुटणार होती सीतेला न अवीला ' वेटींगरुम ' मध्ये थांबायला सांगून मी तिकीट केबीनकडे गेलो. तीन तिकीटं घेतली न परत आलो.

' गर्दी, गर्दी हा शब्द ऐकताच मला मुंबईतली लोकल आठवली. काळ काम वेगाचे दृष्टीने विचार केला तर मुंबईतल्या लोकलचा प्रवास उत्तम. पण डब्यात प्रवेश करणे नि डब्यातून खाली उतरणे महाकठीण तारेवरची कसरत तरी बरी. कसरत करणाराला शरिराचा बॅलन्स संभाळता येतो पण लोकलच्या डब्याच्या तोंडाशी जाऊन पोचल्यावर माझ्या अंगावर काटा उभा राहतो. चढताना अगर उतरताना जर का एखाद्याला आपल्या शरीराचा बॅलन्स संभाळता आला नाही तर तो प्लॅटफॉर्मवर पडेल की आणखी काही होईल हे सांगणे कठीण

तसा बसपेक्षा मुंबईत लोकलचा प्रवास वेळेच्या दृष्टीने फार बरा. मी तर जास्ती करून लोकलशी संपर्क साधतो कारण मुंबईतल्या एका टोकापासून दुस-या टोकापर्यंतच्या कुठल्याही स्थळी जावयाचे झाले तर जास्तीत जास्त तास दीड तासात जाता येते. तोच प्रवास बसने करावयाचा झाल्यास दोन अडीच तास पुरे पडत नाहीत.

एकदा मी बोरिवलीहून चर्चगेटकडे येत होतो. सकाळी १०-३० वाजता बोरीवलीहून सुटलेली लोकल मी धावत येऊन पकडलेली होती.

यामुळे ती गाडी फास्ट आहे हे मला समजून घेता आले नाही. नि माझ्या ध्यानातही आले नाही.

अवती भवतीच्या चार पाच जणांचे रेटारेटीचे धक्के खात मी कसातरी डब्यात घुसलो. पुढे मागे तुंबड गर्दी त्यामुळे पुढे सरकता येईना. पुढे जाऊन बसायला जागा मिळते काय ते पहावे म्हणून मी पुढे जाण्याचा प्रयत्न केला. रेटारेटी करून कसातरी एक फुटभर पुढे सरकलो.

तोवर गाडी थांबली.

बाजूच्या पॅसेंजरकडे पहात मी बोललो. 'कौनसा स्टेशन है यह ?'

तो म्हणाला, – 'दादर'

मी दचकलो. मनातल्या मनात पुटपुटलो.

'म्हणजे सांताक्रूज मागे गेलं !'


'वाटलं दादरला उतरावं नि दुसऱ्या गाडीने सांताक्रुजला जावे.'

म्हणून मागे वळून दरवाजाकडे निघालो पण बाहेरून येणाऱ्या लोकांच्या गर्दीतून दरवाजाकडे सरकता येईना. खालून येणाऱ्या गर्दीतून आलेला एक माणूस डब्याच्या तोंडाशी आल्यावर कोलमडला. त्याला तुडवीत लोक आत घुसले. ते दृष्य पहाताच गाडी हालली.

मी तोंड वळवले म्हटलं, थेट चर्चगेटला जावे.

असा आहे मुंबईतला जलद गतीचा लोकलचा प्रवास.

' बरं चला, असं म्हणून मी उठलो. आम्ही प्लॅटफॉर्मवर गेलो.



वास्को मुंबई, एक्सप्रेस फलाटावर उभी होती.

तिला पहाताच मला मुंबईतलं बोरीबंदर स्टेशन आठवलं. वाटल आपण व्हीटीच्या प्लॅटफॉर्मवर उभे आहोत की काय ? पण लगेच लक्षात आले की, बोरीबंदरच्या रेल्वे स्थानकावर दहा बारा प्लाटफॉर्म आहेत तेवढे इथं नाहीत. समोरचा डबा रिकामा होता. आम्ही त्या डब्यात चढलो.

१०-३० वाजतां गाडीने इषारा दिला न् पाऊल उचलले.

आमच्या नजरा खिडकीकडं वळल्या. वास्को शहर हळू हळू पाठीमागे सरकू लागले.

अर्ध्या तासाने गाडी थांबली ती मडगांव स्टेशनवर मडगांव हे गोव्यातलं मोठं शहर. २० हजाराहून जास्त वस्ती आहे या शहराची, व सीतेकडं वळून मी म्हणालो, ' मोती टेकडी हे या शहरातलं विशेष आकर्षण. तिथून सर्व शहराचे स्वरूप छान दिसतं जसे मलबार हिलवरून मुंबई शहर दिसतं, तसं. '

'आम्ही दूध सागर धबधबा पहायला चाललो होतो.गाडी धावत होती

' गाडी थांबताच आम्ही बाहेर पाहिलं. तर गाडी केपे स्टेशनात उभी होती. '

' हे केपे स्टेशन ' दोघाकडं पहात मी म्हणालो.'

' हे सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पायथ्याचं स्टेशन, मुंबईहून येताना' कर्जत स्टेशन आहे ना, तस्सं ? '

पुन्हा सावर्डे स्टेशन लागले.

समोर अनेक गाड्यांचे रूळ दिसले,

त्याकडं पहात मी बोललो, ' मँगेनिजच्या व्यापारामुळे या स्टेशनला नि शहराला जास्त महत्वं आलं आहे. गोव्यातलं हे एक मोठं शहर आहे.'

सावर्ड्यानंतर थोड्याच वेळात कुळे स्टेशन भेटलं. अवती भवती डोंगर टेकड्या नि चोहोबाजूनी आलेले लाल मातीचे रस्ते स्टेशनला मिळालेले दिसले.

आमच्या शेजारचा माणूस म्हणाला, ' या ठिकाणी पूर्वी पोर्तुगीज जकात नाके होतं येथून एक मार्ग म्हापशाला जातो नि दुसरा पणजीला जातो '

' कुळे स्टेशन सोडल्यावर गाडी सह्याद्रीचा घाट चढू लागली. दोन्ही बाजूस शेकडो फूट उंचीचे वृक्ष दिसत होते. '

रेल्वे मार्ग वळणावळणाने चालला होता. धावून दमलेल्या कुत्र्याने धापा टाकाव्या तशी धापा टाकीत गाडी चढण चढत होती. डाव्या बाजूला खोल दरी होती. इथं सह्याद्रितल्या निसर्ग सौंदर्याचं खरं दर्शन घडल.

' शिट्या वाजवीत ' भक भक आवाज करीत गाडी चढत होती. एखादी खवळलेली नागीन फुत्कारे टाकीत धावावी तसी दिसत होती. तिचा आवाज सह्याद्रीच्या कडे कपारीतून निनादत होता.

घाट चढणीमुळे गाडीचा वेग कमी झाला. थोडीशी चढण चढल्यावर एका लहानशा स्टेशनात गाडी उभी राहिली. आम्ही बाहेर डोकावलो स्टेशनाचं नाव होतं, सोनावळी. अवती भोवती अवर्णनीय अशी निसर्ग शोभा होती.

' सोनावळी स्टेशन मागे पडल्यावर माझं लक्ष डव्याच्या बाजूला खिडकीतून बाहेर गेले, समोरच्या कड्यावरून दुधासारखा जलप्रवाह खाली कोसळत होता. शेजारचे गृहस्थ मला म्हणाले, ' तो दूध सागर धबधबा?'

' हा पाण्याचा प्रवाह दुधासारखा दिसतो ' त्या गृहस्थानी खुलासा केला. '

ते दृश्य इतके छान दिसत होतं. की, त्याच्याकडे बघत एखादा कवी म्हणाला असता की, सह्याद्रिने पांढरा शुभ्र शेलाच पांघरला आहे की काय ?

' दूधसागर ' स्टेशनवर गाडी थांबली. त्यावेळी भाविकांनी पैसे व फळे त्या प्रवाहात टाकली.


# १७

१०–३० वाजता आम्ही सिरसाट लॉजमधून बाहेर पडलो. व बस स्टँडकडे गेलेल्या रत्स्याने चालत राहिलो.

डाव्या बाजूस मार्केट नि उजव्या बाजूस टॅक्सी स्टँड.

म्हापसा नगरपालिकेने बांधलेलं अद्यावत मार्केट ग्राहकांना सर्वतोपरी समाधान देत होतं.

ती दोन्ही स्थळं आपआपल्या उद्योगात मग्न होती. त्या दोन्ही स्थळांच्या मधून गेलेल्या रत्स्याने आम्ही चाललो होतो. टॅक्सी स्टँडच्या पलिकडच्या डॉ. राममनोहर लोहिया उद्याना आवती भोवतीच्या गाड्यांच्या धावपळी नि गलबला ऐकत होतो.



टॅक्सी स्टँडवर आल्यावर मला मुंबईतल्या दादरचा एरिया आठवला.

सकाळी अन्साभाटमध्ये केशव नारायण बर्वे कडे चहासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांच्याशी झालेली चर्चा आटोपती घेत मी म्हणालो होतो, अगवाद वरुन आम्हाला दुपारी कलंगोटला पोहचता आलं पाहिजे.

असं सांगून अन्साभाटमधून लवकर निघालो म्हणून अकरा वाजायच्या आत आपण स्टँडवर पोचू शकलो.

' दुपारी तीन वाजेपर्यंत आम्हाला आगवाद, कळंगूट वरुन परत म्हापशात आणायचं आहे. असं गृहीत धरुन टॅक्सीचं भाडं किती होईल ? ' समोरच्या टॅक्सीवाल्याकडं पहात मी बोलली.

तो म्हणाला, ' मीटर प्रमाणे काय होईल तो चार्ज द्या. '

'काही हरकत नाही ' असं म्हणून मीं समोर दर्शविलेल्या गाडीचे दार उघडताच वाम्ही टॅक्सीत प्रवेश केला. '

पर्वरीच्या पहाडावरुन मांडवीत उतरलेल्या वळणावळणाच्या रस्त्यावरुन टॅक्सी हळू हळू चालली होती. अवती भवतीचो निसर्ग शोभा निवांत करीत होती. तिनं एक वळण घेतलं नि पश्चिमेच्या दिशेने धावत सुटली डाव्या बाजूस मांडवी न उजव्या बाजूस डोंगर खडी.

बेत्तीमध्ये टॅक्सी थांबली ती टॅक्सी ड्रायव्हरच्या ओळखीचा माणूस भेटला म्हणून. त्या दोघांच्या चर्चेला इतका काय रंग चढला की त्यामुळे किती वेळ संपला याचे टॅक्सी ड्रायव्हरला भान राहिले नाही. म्हणून मी म्हणालो अरे बाबा [पंचवीस मिनिटे झाली की.' न् मग त्याने टॅक्सीचा चावी फिरवून चर्चा संपवली.

समोरच्या दिशेला बोटाने दाखवित मी अवीला म्हणालो,'त्या तिकडे फेरी बोटीचा धक्का आहे. त्या धक्यावरुन फेरी बोटीचच लाँचेस सुटतात. त्या पलीकडच्या पणजीत जातात.

बेत्ती सोडल्यानंतर अर्ध्या तासात आमच्या टॅक्सीने वेरे मागे टाकून आगवाद किल्ला गाठला.

आगवाद जणू आमच्याशी बोलत होता. तो म्हणत होता,'साडेतीनशे वर्षांपासून मी इथं उभा आहे. मी जन्म घेतला तो पोर्तुगीज सत्तेचे जतन करणेसाठी. रेयीश फागूस व गाश्पारियश हे दोन किल्ले अरबी समुद्रावरून येणारी आक्रमणे थोपवून धरत होती अशी बरीच आक्रमणे त्या काळी गोव्यावर झाली होती.

१९०४ साली मात्र गोव्यावर एक मोठ संकट आलं होतं. ते संकट माझ्यामुळेच टळले.

एके दिवशी रात्री अचानक डचांची सात आठ गलबते अरबी समुद्रातून आली नि माझ्या भोवती घिरट्या घालू लागली.

पण मला बिलगायची त्यांची छाती झाली नाही. त्यांच्या त्या आक्रमाणाची चाहूल लागताच मी इथल्या सैनिकाला जागं केले. डचानी किनाऱ्यावर तळ दिला. आदिलशहाकड त्यावेळी गलबतं नव्हती. आणि तोफाही नव्हत्या. किनाऱ्यावर थांबलेली गलबते कंटाळून एक महिन्यानंतर मागं परतली. अन् निघून गेली.

त्याकाळी गोव्यावर दोन्ही बाजूनी आक्रमण होत होते भूमीच्या मार्गावरन व जलमार्गावरून. ती दोन्ही आक्रमणे मी थोपवून धरीत होतो. समोरच्या दिशेला बोट उभारुन तो म्हणाला, 'बाजूला जे दोन तट दिसतात त्यांच्या मधील फटीमध्ये तोफा ठेवल्या जात होत्या. शत्रूला सैन्याचा मागमूसही लागत नव्हता.'

समोरच्या बाजूकडे पहात मी म्हणालो,

'समुद्राच्या बाजूला गाल्मावक व लिऑरिश हे दोन बुरुज दिसताहेत.' त्या बुरुजावर त्यावेळी दहा तोफा नेहमी सज्ज असावयाच्या. त्यामुळे समुद्रातून येणाऱ्या गलवताना लांबच रोखून धरता येत होतं.

आमचे शेजारी दोन माणसे उभी होती. त्यातला एकजण म्हणाला 'डचांच्या आक्रमणानंतर पोर्तुगिजानी आगवादची पूर्वेकडची बाजूची तटबंदी बांधून काढली. ती दुहेरी असल्ल्यामुळे किल्याला जास्तच बंदिस्तपणा आला. त्यावेळी व्हॉईसराय रुब्ध ताव्हेरा इथं रहात होता.

अलीकडं पाहत मी म्हणालो, 'किल्ला बांधला त्यावेळी याचे नांव होते सांतकाताजरीन. बांधकाम करतेवेळी दरवाजाजवळच्या खडकात एक झरा लागला. त्याचे पाणी गोड होते हे लक्षात येताच किल्लेदाराने तेथे तलाव बांधला. व पाण्याचा साठा केला, त्यामुळे समुद्रातून येजा करणारी जहाजे पाणी घेण्यासाठी इथं येऊ लागली.

लॅटिन भाषेत पाण्याला आग्वा म्हणतात. म्हणून पाणी देणारा किल्ला, अशा अर्थाने याला आग्वाद फोर्ट असे म्हटले.

आमचेकडे पहात तो माणूस म्हणाला, 'तटबंदीच्या पलीकडे नि दोन्ही बुरुजांच्या अलिकडच्या जागेला रियल फोर्ट म्हणतात. किल्लयाच्या मध्य-भागी राजवाडा होता. बारदेश प्रांताचा जनरल तिथे रहात होता.


दुपारचे दोन वाजले होते. सूर्य आकाशात तळपत होता. आमच्या समोरच्या आग्वाद फोर्ट जणू आम्हाला म्हणत होता. ' डचाना मी गोव्यात येऊ दिले नाही तसेच अदिलशाहच्या सरदारासही काही काळ मी गोव्यापासून दूर ठेवले होते. १६६६ साली महाराष्ट्रातून आलेल्या शिवाजी राजाला सुद्धा मी गोव्यात थांबू दिले नाही.'

आगवादचा निरोप घेऊन आम्ही पाठीमागे वळलो नि टॅक्सीचा आसरा घेतला.

ड्रायव्हरने क्लच ऑफ करीत गिअर बदलला आणि ॲक्सिलेटरवर उजव्या पायाने दाबून ब्रेकवरचा पाय उचलला. तशी आवाज देऊन टॅक्सी चालू झाली. आणि कलंगोटच्याकडे जाणाऱ्या रस्त्याला वळली.

रस्त्याच्या दोन्ही बाजूने माडांचे वृक्ष उभे होते. त्यांच्या सावलीतून गेलेल्या मार्गावरुन टॅक्सी धावत होती. तीनच्या सुमारास टॅक्सीने कलंगोट किनारा जवळ केला.

सूर्य वरतीकडे चालला होता. त्यामुळे त्याची किरणं तिरपी झाली होती. कलंगोटच्या बसस्टँडवर सात आठ बसेस उभ्या होत्या. तसेच टॅक्सचा व मोटारगाडचा उभ्या होत्या. आम्ही किनाऱ्याकडे वळलो. किनाऱ्यावरील बाळूच्या परिसरात शेकडो माणसं वावरत असलेली दिसली पिठासारख्या मऊ वाळूतून आम्ही चाललो होतो.



वाळूत पाय रुतत होते बाजूला तीन चार खिरस्ती तरुण तरुणी वाळूत लोळत असलेली दिसली.

मजकडे पहात अवी म्हणाला 'हे कोणं लोक ?'

मी म्हणालो ; हे हिप्पी : युरोप अमेरिकेतून आलेले हे लोक.

'का आलेत ते इकडं ?'

'आपण जसे पहाण्यासाठी आलो आहोत तसेच तेही आलेत.'

वाळूत पाय रुतवत अवी चालला होता. त्याचे मागून आम्ही चाललो होतो खाऱ्या वाऱ्याच्या झुळुका आमच्या अंगाशी झोंबत होत्या.

पाण्याच्या लाटा जिथपर्यंत दौडत येत होत्या तिथपर्यंत आम्ही जाऊन पोचलो.

तेवढ्यात समोर एक मोठी लाट आमच्याकडे धावत येत असलेली दिसली.

ती पहा केवढी मोठी लाट : असे म्हणत सीतेनं माझे लक्ष त्या लाटेकडे वेधले.

तेवढ्यात ती लाट आम्हाला येऊन धडकली, ज्यावेळी लाटेने आम्हाला स्पर्श केला त्यावेळी अवी आणि सीता घाबरुन मागे वळले. मी पँट वर उचलली पण लाटेने आम्हाला ओलांडले.

तेवढ्यात आम्हाला ओलांडून गेलेली लाट मागे परतली.

लाट मागे सरकू लागली त्यावेळी ती इतक्या हळूवारपणाने चालली होती की पायाना कुरवाळीत चालली आहे असे वाटत होते.

लाट मागे सरकत होती. त्यावेळी आमच्या पायाखालची वाळू हळू हळू पायाखालून निसटत होती. त्यामुळे पायाखालची जमीन बाजूस सरकते आहे की काय असे वाटत होते.

पलीकडच्या निळ्या जलाशयात असंख्य पडावं डुलत होती. काही होड्या किनाऱ्याकडे येत होत्या. तर कांही किनाऱ्याकडून जात होत्या.

बाजूस माडांच्या राईत कौलारु छपरांच्या इमारती उभ्या होत्या. त्यातल्या काही उपहार गृहारच्या तर काही गेस्ट हाऊसच्या होत्या. थंड पेयांची विक्री करणारे इतस्तत: भटकत होते.


अर्धा तास संपल्यावर आम्ही कळंगूट किनाऱ्याचा निरोप घेतला नि मडगावच्या मार्गावरुन मागे परतलो.



दा. क्र. 23६६५

# १८

टॅक्सीतून बाहेर पडल्यावर स्टेशनरोडने आम्ही चालत राहिलो.



चौक ओलांडून पुढे जाताच समोरच्या इमारतीवरील प्रवासी लॉज या नावाचा बोर्ड दिसला.

सीतेकडे पहात मी म्हणालो : प्रवासी लॉजमध्ये थांबूया का ? :

‘ थांबू या-प्रवासी लॉज बस स्टँड पासून जवळ आहे. तसेच रेल्वे स्टेशन ही जवळ आहे. ’ असं म्हणत सीतेनं होकारार्थी मान डोलावली.

त्याच क्षणी मी बाजूच्या इमारतीकडे वळलो.

प्रवासी लॉज च्या कार्यालयात पोचलो. तेव्हा व्यवस्थापक समोरच्या रजिस्टरात डोके खुपसून वसले होते. मी समोरच्या खुर्चीवर टेकलो. तरी त्या गृहस्थांचे डोके वर झाले नाही. मग मीच टेबलवर हात मारला. आवाज कानावर पडताच ते दचकले. अन समोर पहात राहिले.

माझ्या नजरेला त्यांची दृष्टी भिडताच मी म्हणालो,

: हमे एक कमरा चाहिए :

काहीही न बोलता ते गृहस्थ माझ्या चेहऱ्यांकडे पहात राहिले, त्याच क्षणी माझ्या लक्षात आले की, याना हिंदी भाषा येत नसावी.

मी इंग्रजीकडे वळलो.

. आय वॉंट अ रुम, शॅल आय गेट इट ?

· ऑफ कोर्स, यु विल. हॉऊ मेनी डेज आर यू गोईंग टू स्टे हिअर?

· टू डेज :

व्हाट इज दि पर्पज टू व्हिजीट टू गोवा :

: माय मेन पर्पज ऑफ व्हिजीटिंग गोवा इज टू मेक मायसेल्फ अंडरस्टॅंड दि लाईफ ऑफ दि पीपल अिन गोवा :

: देन व्हेअर आर यू गोइंग टू गो फ्रॉम हिअर ? :

: आय एम गोईंग टू गो टू दाभोळी फ्रॉम हिअर.:

तेवढ्यात समोरुन एक मुलगा आला. त्याचे अंगावर लॉजचा युनिफॉर्म होता. त्याच्याकडे पहात व्यवस्थापक म्हणाले, याना दहा नंबरची रूम उघडून दे.

त्याच क्षणी आमचे सामान उचलीत तो म्हणाला, ‘चला.’

आम्ही त्याचे मागून गेलो. त्याने आम्हाला दुसऱ्या मजल्यावर नेले. जिन्यासमोरची रुम उघडून दिली. आणि तो खाली गेला.

अवी न् सीता कॉटवर टेकले. हात पाय धुवावे म्हणून मी बाथरुमकडे गेलो.

बाथरुमहून परतल्यावर नोकराला चहा आणायला सांगून मी कॉटवर आडवा झालो.

सीतेकडं पहात मी म्हणालो, 'वास्को हे गोव्यातील प्रमुख शहरापैकी एक शहर आहे.'

हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर प्रथम पाऊल ठेवणारा वास्को ड गामा याने गोव्यात प्रथम पाऊल ठेवले. ते इथे या पोर्तुगीज गृहस्थाचे माणसाचे स्मरणार्थ या शहराला मास्को ड गामा हे नाव देण्यात आले आहे.

'वास्कोला पणजी इतके महत्व आहे? अवी म्हणाला

मी म्हणालो, 'पणजी हे राजधानीचे शहर असल्यामुळं त्याला इतर शहरापेक्षा जास्त महत्व आहे. पण अंतरराष्ट्रीय दळणवळण आणि औद्योगिक दृष्ट्या वास्कोचे महत्व आहे.

मार्मागोवा हारबर हे वास्कोचं बंदर. या बंदरातून जगातल्या बहूतेक राष्ट्राशी गोव्याचे आयात निर्यातीच्या दृष्टीने संबंध जोडले आहेत म्हणून वास्कोला पणजीपेक्षा जास्त महत्व आहे.

'पणजीला पण बंदर आहेच की ! अवी उद्गारला.'

मी म्हणालो, 'पणजीचं बंदर हे प्रवाशांची वहातूक करणाऱ्या बोटींचे बंदर आहे. चौगुले स्टीम शीपच्या कोकण लाईनच्या बोटी येथून दर-रोज मुंबईस जात येत असत.

वास्कोचं तसं नाही, मार्मागोवा हे बंदर भारतातल्याच नव्हे तर. जगातल्या अनेक राष्ट्राशी संबंधीत असलेल्या बंदराशी संपर्क साधून आहे

वहातुकीच्या दृष्टीने तर गोव्यातल्या मडगांव, म्हापसा, पणजी फोंडा या शहरापेक्षा वास्कोला जास्त महत्व आहे. वास्को हे रेल्वेने ही

मुंबईस जोडले आहे. गोव्यातले आयात हे निर्यातीचे वास्को केंद्र आहे.

‘ आटोपल काहो ? ’ बाथरूमच्या दरवाजांनर आवाज करून सीता बोलली. ’

‘ आटोपलं ’ असं म्हणत मी दरवाजा उघडला. व याथरूममधून बाहेर आलो. ’

‘ अबी सीता बेड रूमकडे पहात बोलली. ‘ बाथरूम रिकामा झाला आहे ’

तो आवाज ऐकताच समोरच्या बेडरू मधून अवी धावत आला. न बाथरूममध्ये शिरला.

अंगावर कपडे चढवून होतात न होतात तेवढयात चहा घेवून मुलगा आला.

खुर्चीत टेकलो. न टिपपॉयवरच्या ट्रेमधला चहाचा कप उचलला. न सोतेकडे पहात म्हणालो, ‘ गेल्या आठवडयात आपण वेगळेच जीवन जगलो. ’

‘ म्हणजे ? माझ्या बोलण्याचा रोख समजावून घेण्यासाठी सीता मजकडे पहात राहिली.

‘ वेगळं म्हणजे, मी म्हणालो, गेल्या ‘ काही आठवडयापूर्वी आपणत कोयनानगर मधल्या क्वॉर्टरमधे वास्तव्ये करून रहात होतो तसे आठवडयात नाही प्रत्येक दिवशी आपलं वास्तव्य वेगळयाच ठिकाणी नि वेगळयाच घरात होतं आहे. म्हणून मी वेगळ जीवन म्हणालो. ’

‘ खरे आहे. सीता म्हणाली, रोजचं वास्तव्य जसं वेगळया ठिकाणी होतय त्याच प्रमाणे आपल्या दैनंदिन कामात सुद्धा बदल झाला आहे. ’

' होय, साडेदहा वाजले की माझे पाय आता विद्यालयाकडे वळत नाहीत. स्वयंपाक घरात जाऊन स्टोव्ह शेगडीशी तुला हुजत घालायला लागत नाही.

अत्री म्हणाला, ' अन आम्हाला रोजच्या अभ्यासात त्रास नाही ,

' खरं आहे तुम्ही म्हणता ते. गेल्या आठवडयातलं आपलं जीवनाच साफ बदलून गेलं आहे. राजासारखे जीवन जगतो अहोत आपण. कशाची गरज भासली की बेलस्वीच दाब नि वेटर धावत आला की वस्तू आणण्या-साठी त्याच्यावर हुकूम सोड. राजाची आज्ञा घेताच यावे तसा वेटर धावत येतोच.

' एकंदरीत प्रवासी झालो हे चांगले झाले. पण मी पडलो अडचणीत. '

' तुम्ही अडचणीत कसे ? ' सीता म्हणाली,

' कादंबरी लेखनातला वेळ प्रवासात खर्च झाल्यामुळे अर्ध्यावर येऊन थांबलेली कादंबरीचा शेवट करायला आणखी काही दिवसांचा वेळ अधिक खर्ची पडला. '

' हो, असं झालं खरं'

मी म्हणालो, ' ते काम पूर्ण करण्यासाठी आठवडयाचीं कॅज्युअल लीव्ह घ्यावी म्हणतोय '

' आणि ? '
' आणि आठवडाभर पुण्यात जाऊन थांबावं म्हणतोय. '

तशी कॅज्युअल रजेची सोय केली होय. पुनममधील एक रूम आठ-वडयासाठी रिझर्व करून ठेवली आहे.

कपातला चहा संपताच माझी नजर मनगटावरील घड्याळावर गेली. सीता म्हणाली, 'आहो दहा वाजून गेले की, चल, जेवण आटोपून पेडण्याकडे जाणारी बस गाठायला हवी?

माझं सुचनात्मक निवेदन ऐकताचतो दोघेही उठली. आम्ही लॉजमधून बाहेर पडलो न समोरच्या बिहार हाटेलमध्ये शिरलो.

खुर्चीवर टेकताच सीता म्हणाली, ' गेले आठ दिवस आपण हाटेल-मध्ये जेवतोय. पान वाढणारी मी सुद्धा जेवण्याचेवेळी खुर्चीवर बसून तुमच्या बरोबर जेवण घेते उद्यासुध्दा आपल्या जीवनात एकेकाळी दुस-ऱ्याच्या हातने पदार्थ खाणे कमीपणाचे मानले जात होते.

मी म्हणालो, 'स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांची धारणा कशी होती. पण स्वातंत्र्यानंतर खाद्यपदार्थ विकणारी दुकाने उघडली नि कोणतेही पदार्थ हॉटेलमध्ये मिळू लागले.सोय झाल्या ककारणाने लोक त्याचा आस्वाद घेऊ लागले.



' दुपारी पेडण्यास पोचलो '

पेडणे हे गोव्याचे उतरेकडचें टोक मोठे संस्थान देशप्रभु हे तिथलें

समोरच्या वाड्याकडे पहात मी म्हणालो, ' हा देशप्रभुंचा वाडा. या वाड्यात एक मोठे वस्तू संग्रालय आहे. '

वाडा पहातेवेळी एका माणसाने आम्हाला सांगितले की, गोव्यात पेडण्याचा दसरा हा सण मोठा असतो. शौर्याच्या स्मृत्ती त्यावेळी जाग्या होतात. दुसऱ्या दिवशी दुपारी राजराज्यांच्या वाड्यामधून मिरवणूक हत्ती, घोडे, पालख्या नि मोठे यांची गर्दी होई. सर्व राजेलोक पालखीतून नि स्त्रिया गोव्यातून जात असत. ती मिरवणूक भगवती देवीच्या मंदीरापुढें आल्यावर तरंग्यांची गर्दी होई कौल घ्यायचा कार्यक्रम होई. त्यावेळी आपट्याची पानें सोने म्हणून लुटालूट सुरू होते. कोलवावाळच्या किनाऱ्यावरची ही मिरवणूक चांदण्यासारखी छान असते. सोने लुटल्यानंतर मिरवणूक संपते. '

वाड्याच्या बाहेर पडताना मी त्याला नांव गांव विचारतो तो म्हणाला, ' बाळाजी बक्ष '

बक्षी नाव ऐकताच मला शिवबा दादा बक्षी आठवले त्याच्याकडे पहात मी म्हणालो, आहण केसरीचे का ? '

' होय '

' पेशव्याच्या काळात पेशव्यांचे वाकळीस्त म्हणून जिवबा दादा बक्षी होते. '

आठवल्यासारखं करीत तो म्हणाला, ' होय, ते आमचे वंशज. '

' अवी म्हणाला, कोण जिवबा दादा बक्षी ? '

· मी म्हणालो ' पेशव्यांचे काळातले महादजी शिंदे पेशव्याकडें आलें आलें त्यावेळी त्यांनी न् जिवबादादांची ओळख झाली त्यावेळी जिवबादादांची पारख शिंद्यानी केली. जिवबा दादा पुढें शिंद्यांचें जास्त चवळचें झाले शिंद्यानी त्यांना आपलें सेनापती म्हणून नेमलें. '

पानपतच्या लढाईचेवेळी शिंद्यावर मोठं संकट आलं होतं. मोहिमेवर जाताना समोरून धावून आलेल्या वाघाने शिंद्यांच्या अंगावर झेप घेतली त्यावेळी जिवबा दादा पुढे आले. डोकीचा पटका काढून हाताला गुंडाळला नि वाघाच्या तोंडात खुपसला म्हणून शिंदे वाचले.

गोव्यातल्या केरीचे जिवबादादा त्यांच्या जीवनांची अखेर झाली ती अशाच लढाईत. नारायणराव पेशव्यांचा खून करणारे गारदी सिंध प्रांतात पळून गेले. होते. त्यांना पकडून आणण्याची जबाबदारी पेशव्यानी शिंद्यावर टाकली होती. ती पूर्ण करण्यासाठी जिवबादादा बक्षी सिंध प्रांतावर चालून गेले. सिंधू नदी ओलांडताच ते सैनिकांच्या कैचीत सापडले. त्यावेळी त्यांना हार खावी लागली. त्यातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

मी म्हणालो, ' पानपतच्या लढाईच्यावेळी महाराष्ट्रातले मराठ दिल्लीपर्यंत चाल करून गेले तसे गोव्यातल्या केरींचे जिवबादादा बक्षी पण गेले होते.


आर्धा तास पेडण्यात फिरलो.

जेवणं झाल्यावर म्हापशाकडं जाण्यासाठी निघालो.
तीन वाजता म्हापश्यात आलो तरी वास्कोत यायला संध्याकाळचे पाच वाजले.

रात्रीचे नऊ वाजलेत. सीतान् अवी कॉटवर पडून वर्तमानपत्रे बघताहेत. मी लेखन करण्यात गढलोय.

सीतेकडं पहात मी म्हणालो, ' सकाळी लवकर उठायला हवं : उद्या आपला गोव्यातल्या कार्यक्रमाचा अखेरचा दिवस. उद्या सकाळी काणकोणकडे जायचं आहे.

टॅक्सी वाऱ्याच्या वेगाने धावत होती.



मडगांवपासून वीसेक मैल आल्यावर घनदाट अरण्य लागले.

थोडयावेळाने करमल घाट सुरू झाला.

करमल घाट उतरताना कधी डोंगर टेकडया तर कधी समुद्रकिनारा भेटे तो अंजदीप रात्री छान देखावा दिसतो बेटावरचा दीपस्तंभ. '

टॅक्सीवाला म्हणाला, ' या भागात ऋषीमुनींचे वास्तव्य होते. याच भागात कण्वमुनींचा आश्रम होता.

दोन तीन मैल गेल्यावर काणकोणमध्ये पोचलो.

' काणकोण हे गोव्यातले दक्षिणेकडचे टोक ' टॅक्सीवाला म्हणाला, ' ' काणकोण हे तालुक्याचं ठिकाण ! गोव्यातला दक्षिणेकडचा तालुका ! '

वेग कमी करीत तो म्हणाला, ' इथं, थांबायच का थेट श्रीस्थळाकडं जायचे ? '

मी म्हणालो, ' श्रीस्थळाकडं जायचं. '

अर्ध्या तासात खालवडे गांव ओलांडून आम्ही श्रीस्थळ येथे पोचले.

टॅक्सीवाला म्हणाला, 'येथे गार्गी ऋषींचा आश्रम होता. '

मंदीराकडे जाताना तो म्हणाला, ' या मल्लिकार्जुनाचे महात्म्य फार मोठे आहे. आद्य शंकराचार्य या मंदीरात येवून गेले होते.

मल्लिकार्जुनाची पूर्वपीठिका सांगावी म्हणून तो म्हणाला, ' हा मल्लिकार्जुन येथे अचानक प्रकटला. '

' तो कसा ? ' मी विचारले '

' टॅक्सीवाला म्हणाला, ' एक माणूस झाड तोडत होता. झाडावर मारलेली कुराड निसटून झाडाच्या बुंध्याजवळ असलेल्या शिळेवर पडली. त्यावेळी त्या शिळेतून रक्त व दूध वाहू लागले. ते पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने गावात जाऊन लोकाना सांगितले. लोक धावून आले. त्यांनी पाहिल्यावर अंदाज केला की इथे देवाचे स्थान असावे. '

लगेच त्यानी तिथं पूजा बांधली. त्या गावड्याने आणलेली शिदोरी करमलच्या पानातून नैवेद्य म्हणून देवाला वाहिला. अशा प्रकारे श्रीमल्लि-कार्जुनाचे स्थान इथें प्रकटले.

आम्ही मंदीराजवळ पोचलो. टेकड्यांच्या नि झाडा-झुडपांच्या अड-चणीत मल्लिकार्जुनाचे वास्तव्य आहे.

मंदीरात प्रवेश करताना पायऱ्या उतरून खाली भुयारात जावे तसे जावे लागले. मग गाभाऱ्याचे प्रवेशद्वार भेटले.

श्रीमल्लिकार्जुनाचे दर्शन घडले. ते मंगेशीचा शंकरासारखे मल्लिका-र्जुनाचे रूप आहे: दसऱ्या दिवशी येथे शमीपत्रिका वाचली जाते–तांदळाचा भात हा त्या क्षत्रीयाने करमलच्या पानातून नैवेद्य म्हणून दिला होता. तोच नैवेद्य मल्लिकार्जुनाला देतात नि आवडीने प्रसाद म्हणून खातात.

आवती–भोवतीचं अरण्य पाहून मला दंडक अरण्य आठवले.

दुपारी आम्ही काणकोणमध्ये परतलो.

जेवण घ्यावं म्हणून एका हॉटेलात शिरलो.

टॅक्सीवाला म्हणाला, ' इथून तीन मैलावर सदाशिवगड आहे तो गड शिवछत्रपतीनी बांधला.

सदाशिवगडाच्या पलिकडे काळू नदी आहे. नदी ओलांडली की म्हैसूर संस्थान सरहद्द लागली. कारवारची भूमी दृष्टोत्पतीस येते.

काणकोण भागातल्या पैगींण येथे परशुरामाचे मंदीर आहे.

' म्हणजे ? ' अवी म्हणाला, ' परशुरामाचं वास्तव्य इथेही होते?'

मी म्हणालो, ' होय. कोकण ही परशुरामाची भूमी. '

जेवण आटोपल्यावर आम्ही हॉटेलातून बाहेर पडलो नि टॅक्सीचा आश्रय घेतला.

टॅक्सी काणकोणमधून बाहेर पडली. आणि मडगावच्या दिशेने धावत सुटली.

सीतेकडं पहात मी म्हणालो, ' आपण पाच वाजेपर्यंत वास्कोमध्ये पोचतोय का ? '

दाभोळी येथे वास्कोचा विमानतळ आहे. दिल्लीचा पालम मुंबईचा सांताक्रूझ यांच्यासारखा मोठा नसला तरी हा विमानतळ येथल्या प्रादेशिक विभागाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. दिवसातून दोन वेळा गोव्या हून मुंबईला एयर इंडियाचे विमान जाते. त्याशिवाय इतर राष्ट्राशीही हवाई वहातुकीने संबंध जोडला आहे.

औद्योगिक दृष्टयाही पणजीपेक्षा वास्कोला जास्त महत्व आहे.

सीता म्हणाली, 'अनेक दृष्टीकोनातून ,पाहिलं तर वास्कोला पणजीपेक्षा जास्त महत्व आहे.वास्कोच्या परिसरात गोव्यातला जुवारी फर्टिलाझर खत प्रकल्प आहे.'

मी म्हणालो, ' खरं आहे. '

गोव्याच्या आयात निर्यातीचा जगातील इतर राष्ट्राशी संबंध जोडला आहे. वास्कोने त्याशिवाय गोव्यातल्या इतर शहरांच्या मानाने वास्कोत जास्तीत जास्त फॅसिलिटीज् आहेत.

असं दुसरं कोणतं शहर आहे की बाहेरच्या देशाशी रेल्वेने: बिमानाने व आगबोटीने सबंध जोडलेला आहे. ?

'आमची चर्चा थांबली न् आम्ही चहा घेऊ लागलो.'

'तेवढ्यात चहा घेऊन मुलगा आला.'

चहा घेतल्यावर सीतेकडं पहात मी म्हणालो

'मी बँकेत जाऊन येतो.'

'वास्कोत खाते उघडता. ?'

'होय.'

'इथं दोन दिवस थांबावं लागणार आहे.'

'स्टेट बँकेची शाखा जवळच आहे. मी अर्ध्या तासात परत येतो.'

# १२

गोव्याच्या प्रवासात आपणास काय आवडलं, ह्या प्रश्नाचं उत्तर सविस्तर लिहिलं तर फार मोठे होईल. ज्याच्याकडे सौंदर्यदृष्टी तोकडी



आहे अशी माणसं चटकन सांगून टाकतील. हिरवी वनश्री नि मनाला आकर्षित करणारे समुद्र किनारे ह्यापेक्षा वेगळं असं आकर्षण ते काय आहे तिथं ?

गेल्या आठवड्यातल्या प्रवासात काही क्षणी मला पण तसंच वाटलं होतं, पण ते कांही क्षणीचं. बाकीच्या वेळात असे कितीतरी क्षण होते की, त्यानी माझ्या दृष्टीला ओढून धरले होते. काही स्थळावरच्या भूमीने तर काही प्रसंगानी आमची मने त्या त्या ठिकाणी जखडून ठेवली होती.

या प्रश्नाचं उत्तर मोठं होईल असं मी म्हणालो, याचा अर्थ असा की प्रवासात जे पाहिलं, नजरेच्या कक्षेत आलेल्यातलं असलं म्हणून टिपून ठेवलं, मनानी ज्याची टिपणं करून घेतली ती सर्वांच्या सर्व रेखाचित्रं आपल्यासमोर ठेवायची म्हटलं तर एक मोठा लेख लिहून होईल.

नुसती टिपणांची जंत्री पत्रात सांगायची म्हटलं तरी अवघड नाही ती थोड्या शब्दातहि सांगता येईल. पण तसं सांगून चालणार नाही. कारण रामायण म्हणजे प्राचीन काळातील भारतीय संस्कृती-च्या एका राजाची जीवन कहाणी, असं सांगण्यासारखं होईल. कारण ज्यानी रामायण वाचलं आहे त्यांना एवढं सांगणं ठीक होईल. पण ज्यानी रामायण वाचलंच नाही, त्याना रामायणातल्या घटनांची नुसती जंत्री सांगून चालणार नाही. त्रोटक का होईना पण घटनांचे तपशील कथन करायलाच हवेत, त्याशिवाय रामायणातल्या कथेतलं मर्म समजणार नाही. त्याचप्रमाणे गेल्या आठवड्यातल्या प्रवासातल्या स्थळांची नुसती यादी आपणाला सांगितली तर प्रत्येक स्थळातलं सौंदर्य पाहून लाभलेला आनंद मिळणार नाही.

प्रत्येक स्थळातल्या सौंदर्याचं खरंखुरं चित्र अवलोकायचं असेल तर दृष्टीने टिपलेल्या छायाचित्राचं संकलन करूनच ते शब्दात मांडायला हवं तरच वाचणाराच्या मनाच समाधान होईल. ( होणार आहे ) आणि म्हणूनच मी म्हटलं की, काय आवडले नि का? या प्रश्नाचं विवेचन थोड्या शब्दात केलं तरी सुध्दा एक छोटासा लेख लिहावा लागेल.

तोही लिहिला असता, कागदाला वाण नाही. पण वेळेची फार वाण आहे. सकाळी निवासस्थानातून बाहेर पडायचं. जेवण झाल्यावर दिव-साच्या प्रवासात पाहिलेल्या दृष्यांची आठवून टिपणं करायची, नि मग विश्रांती. गेले आठ दिवस असं चाललं आहे. मन फार कंटाळून जातं. मोकळे फिरण्याचा कंटाळा येत नाही. पण आमचं तसं नाही. मला फिरता फिरता बरंच कांही मिळवावं लागतं. चांगल्या दिसलेल्या प्रसंन्न चित्राचं मनान

संकलन करावं लागतं. त्यासाठी प्रवासात दृष्टी आणि मन नेहमी जागृत ठेवावं लागतं. नाहीतर पहाताक्षणीच त्यांचं स्मृतीपटलावर टिपण केलं नाही तर ते संकलनाचे वेळी त्यांची निगेटीव्ह मिळणार नाही.

पाहिलेल्या दृष्यांचे आराखडे ज्या त्यावेळी चित्रीत करून घेतले नाहीत तर त्यासाठी पुन्हा पहाण्याचे कष्ट घ्यावे लागतील ऐकलेली भाषणे, विवेचने यांची मनाच्या पटलावर नोंद करून घेतली नाही, तर पुन्हा त्यांची नोंद ठेवणं कठीण जाते. त्यासाठी प्रवासात डोळे, कान, मन सज्ज ठेवावी लागतात. त्यावर कोणावर किती ताण पडतो याची दखलसुद्धा घ्यावी लागत नाही. की कोणाची तक्रार ऐकून घ्यायला फुरसत मिळत नाही. हे सारं सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाललेले असतंय. रात्रीच्या विश्रांतीच्या वेळा-तला काही वेळ बाजूला काढून कागदावर त्यांची गोळाबेरीज करावी लागते. त्यासाठी कांही वेळेला वेळेचीही अडचण भासते. अशा स्थितीतही आपल्या प्रश्नाच उत्तर द्यावं म्हणून पत्र लिहायला बसलोय. रात्रीचे ११ वाजलेत.

वास्कोतील प्रवासी लॉजमधल्या बारा नंबरच्या रुममधल्या खुर्चीवर बसलोय नि लिहितोय.

एका प्रश्नात आपण पणजीविषयी विचारलंय, पणजीविषयी सांगायच झालं तर गोव्याची राजधानी म्हणून गोव्यातल्या इतर शहरापेक्षा पणजीला जास्त महत्व आहे. राजधानीच्या दृष्टीकोनातून पणजीशी मुंबईशी तुलना करावयाची म्हटलं तर बऱ्याच बाबतीत पणजीत अजूनही जास्त उणीवा आहेत. मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर म्हणून जे महत्व आहे ते पणजीला नाही. मात्र नगररचनेच्या दृष्टीने मुंबईची रचना करणारे इंग्रज पणजीची रचना करणाऱ्या पोर्तुगीजापेक्षा वेगळ्या दृष्टीचे होते म्हणावे लागेल. फार तर पणजीत गर्दी या शब्दाचा प्रत्यय मला बस स्टँड नि समुद्रकिनाऱ्याच्या ठिकाणी आला. पण मुंबईत तो हरेक ठिकाणी जाणवतो पणजीच्या नगर-रचनेबाबतचे एवढे कथन पुरे होईल.

पणजीतल्या अनेक स्थळांनी पणजीचं महत्व वाढवलं आहे. मांडवीनं तिला सहृदयता दिली. अलतीनोनं उमदेपणा आणला. मिरामारनं रसिकता दिली. काबोराजने दरबारी थाट दिला. आणि दोना पावलाने समरपणाची भावना रुजवली. या सर्व गुणांच्या गोळाबेरजेनं पणजीचं महत्व वाढलं.

आठवडयाच्या प्रवासात आपल्या चित्तवृत्ती जास्त वेळ कुठं स्थिर झाल्या ? या आपल्या प्रश्नाकडं वळतो. ज्या दृश्यानी माझ्या मनावर मोहिनी टाकली ती दृश्ये ज्या स्थळी निपजली त्या ठिकाणी माझ्या चित्त-वृत्ती स्थिर झाल्या. पण ती दृश्ये ज्या ज्या स्थळावरून मला दिसली त्या स्थळाना मी जास्त महत्व देतो. कारण ती स्थळंच नसती तर त्या स्थळा-वरून दिसणारी दृश्ये दिसली नसती. नि पहाणाराच्या चित्तवृत्तीला समा-धान मिळू शकले नसतं.

अलतिनोवरून सिंहावलोकनाच्या दृष्टीनं दिसणारं पणजी शहर–म्हापशाच्या डोंगरातल्या दत्तवाडीच्या टेकडीवरून दिसणारं रात्रीच्या वेळचं म्हापश्याचं दृश्य, आगबादवरून दिसणारं पणजीचं बंदर, वास्को-मधून दिसणारं मारमागोवा बंदर. दोनापावलावरून दिसणारं हरवर बंदर. कोलव्यांच्या किनाऱ्यावरून दिसणारा सूर्यास्त. ओल्ड गोव्यात गेल्यावर नजरेत येणारी खिरश्चन संस्कृती, पिलारमध्ये शिरताच नजरेत येणारं खिरस्ती मंदिरातलं पावित्र्य. हिंदूच्या मंदीरातील स्वच्छता नि पावित्र्य. ही सारी दृश्ये पर्यटकाना मिळणाच्या आत्मिक समाधानातलं अर्धअधिक समाधान देतात. ती दृश्ये मला ज्या ज्या स्थळावरून दिसली तिथं माझ्या चित्तवृत्ती स्थिर झाल्या.

इथं येण्यापूर्वी मी गोव्यातल्या सागर किनाऱ्याविषयी अनेकाकडून पुष्कळ ऐकलं होतं, इथं आल्यावर इथल्या चार पाच किनाऱ्याना भेटी दिल्या तेव्हा मला जाणवलं ते कोलवा, दोनापावला, मिनामार, कळंगूट या किनाऱ्यांनी मला त्याचा प्रत्यय आणून दिला. प्रत्येकानं वेगवेगळं रूप नि वैशिष्टय दाखवलं.

सायंकाळच्या वेळी मुंबईतला गिरगाव किनारा. आणि जुहुचा किनारा हे लाखोंच्या संख्येतल्या रसिकानी गजबजलेले दिसतात. तसे दृश्य मात्र मला मिरामार कोलवा आणि कळंगोट इथं दिसलं. फरक इतकाच की मुंबईतल्या किनाऱ्यावर आनंद लुटणाऱ्या रसिकांची संख्या हजाराच्या संख्येत गणता येईल. संध्याकाळच्या वेळी आपण कोलव्यावर गेलो तर वाटते. आपण मुंबईतल्या जुहूच्या किनाऱ्यावर बसलो आहे इतके साम्य या दोनही किनाऱ्यावरील सौंदर्यात आहे की काय असं क्षणभर वाटू लागतं.

कळंगोट आणि मिरामार हे दोन्ही किनारे पणजीकरांना तितकेच जवळचे असले तरी गोवेकरांनी मिरामारला जास्त महत्व दिले आहे. तितकं महत्व करंगोळला मिळालेलं नाही असं वाटतं. करंझाळचं सौंदर्य रसिकांच्या संख्येत कमी रसिकांच्या नजरेत आलं असलं तरी त्याचा अर्धवर्तुळाकार किनारा, गोव्यातल्या इतर किनाऱ्यापेक्षा सुंदर दिसतो. अर्थात हे सौंदर्य ज्या रसिक पर्यटकांच्या ध्यानात आल असेल त्यानाच ते जाणता येईल.

मिरामारची शोभा अधिक वाटते ती त्या ठिकाणी अरबी समुद्रात मांडवी येऊन मिळते म्हणून, त्या ठिकाणाला खाडीचं स्वरूप लाभल्यामुळे त्याची शोभा अधिक वाढली आहे. आपल्या प्रमाणे मला अनेकांनी एक प्रश्न विचारला की, युरोपियन पर्यटक पूर्वेकडे आल्यावर गोव्यातच का येतात ? या प्रश्नाचं उत्तर देताना मी म्हणे गोव्यातल्या निसर्गाच्या लालसेमुळे ते गोव्यात येत असतात. आकर्षिले जात आहेत. खरं आहे ते. कुठल्याही पर्यटकाला इथला निसर्ग इथं थांबायला सांगतो.

आलो चालुनी वाट युगाची आणि गाठिला तुझा किनारा । असे काव्य कवि पी. सावळाराम यानी हिप्पीना उद्देशूनच केलेले आहे, असावे. हिप्पी गोव्यात आले नि तग धरून राहिले. त्यामुळेच कळंगुटचे महत्व अधिक वाढले. हे कुणालाही नाकारता येणार नाही. इथला निसर्ग हिरवागार आहे. त्यामुळं इथल्या प्रदेशाला इंग्लंडसारखं सौंदर्य लाभलं आहे. पण

हा निसर्ग सतत कायम राहणार नाही. पावसाळा किंवा हिवाळा सोडला तर उन्हाळ्यात त्याचं चित्रं फारच पालटतं. त्यामानानं मलबारचा किनारा उत्तम. तो बारा महिने आपला हिरवेपणा टिकवून ठेवतो.

इथला निसर्ग समाधान देतो ते त्याच्यातील हवेत असलेल्या गारव्यामुळे. पणजीला जरी सभोवती समुद्र असला तरी मुंबईसारखा इथं उकाडा जाणवत नाही. त्याचं कारण इथल्या हवेत असलेला थंडावा हेच आहे. इथली समुद्र सपाटीपासूनची उंची मुंबईइतकीच असली तरी इथल्या हवेत थंडावा आहे.

इथल्या निसर्गानेच इथल्या दमट हवेचा नायनाट केला आहे

हवेच्या बाबतीत म्हटलं तर सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या गोव्यातल्यां कुठल्याही स्थळावर मला महाबळेश्वर पांचगणी सारखी हवा इथं कुठंच भेटली नाही. महाबळेश्वराची उंची इथल्या गिरीशिखरापेक्षा कितो तरी पटीने जास्त असली तरी दूधसागराच्या किंवा फोंड्याच्या कुशितल्या कुठल्याच ठिकाणी मला तशी हवा भेटली नाही.

अनेक वेळा आपण असं ऐकलं असेल की मराठी रंगभूमीला गोव्याने अनेक कलावंत दिले. या विधानात बरीच सत्यता आहे. रघुवीर सावकार मास्टर दिनानाथ, यांचेपासून आजचे प्रसाद सावकार पर्यंतचे आणि सरस्वती पेडणेकरापासून ते सौ. जोत्स्ना भोळेपर्यंत कितीतरी संगीत कलावंत मराठी रंगभूमीला गोव्यानेच पुरविले आहेत. हे कोण नाकारू शकेल ? मो. ग. रांगणेकरासारख्या नाटककारानंतर वसंत कामत, बबन प्रभु, हिराबाई पेडणेकर, ज्योत्स्ना भोळे, सुधा करमरकर, सखारामपंत बर्वे या नाटककारांनी गोव्याचे नाव नाट्यसृष्टीत मोठे करून ठेवले आहे हे कुणाला अमान्य नसावे ? आजसुद्धा बबन प्रभु, ललीता जोगळेकर, आशालता वाबगावकर, रामदास कामत, सुधा करमरकर या कलावंतानी आजची मराठी नाट्यसृष्टी गाजवली नाही असे कोण म्हणेल ?

शिल्पकलेत अत्युच्च असे मानाचे स्थान कमावलं ते गोव्यातल्या

राम कामत यानी. गोव्याचे शिल्पकार म्हणून त्यांचा जगात लौकिक झाला हे कोणाला नाकारता येईल ?

शिल्पकलेप्रमाणेच चित्रकलेचा 'गुण गोव्यातल्या मुळगावकरांच्या घराण्यात निपजला. मुळगावकरांच्या घराण्यात रघुवीर मुळगावकर हे चित्रकलेच्या बाबतीत जागतिक लौकिकास पात्र ठरले. हे का कुणाला ठाऊक नाही ? मुळगावकरांच्या नंतर चित्रकलेच्या क्षेत्रात गोव्याचे नाव मोठे केले ते दिनानाथ दलालानी.

एका प्रश्नात आपण गोव्यातल्या स्मारकासंबंधी विचारलं होतं. तर स्मारकासंबंधी सांगताना मी असे म्हणेन की गोव्यातल्या महान व्यक्तींच्या पुतळयांनी नि त्या स्मारकांच्या योजकांनी पहाणारांना एक नवी दृष्टी दिली आहे. विचारवंताना अधिक खोलात जाऊन विचार करायला लावला आहे. त्याचा प्रत्यय ही स्मारकं पाहणाराना प्रथम येतो.

पणजीतल्या अबेफरीयाचा पुतळा पहाताक्षणी जाणवतं ते हे की, मोहिनी टाकण्याच्या अबेफरियाच्या पवित्र्यातली अभिनयाची झलक ती शिल्पकाराच्या शिल्पकलेतलं मोठेपण प्रेक्षकाना प्रथम क्षणीच दाखवून देते.

महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या शहरातल्या पुतळ्यावरून मला इथल्या स्मारकातील शिल्पातला वेगळेपणा दिसला तो जुन्या गोव्यातल्या सी. कॅथेड्रल मधील लुईस द कोसाईश या पोर्तुगीज कवीचा पुतळा पाहून. आपली कविता वाचत उभा असलेला हा कवी त्याने एका हातात तलवार का घेतली आहे याचा जिज्ञासूनी उलगडा केला तर त्याचक्षणी तो मोठा राष्ट्रभक्तही होता हे जाणवते. मला नाही वाटत इतक्या राष्ट्रभक्तीने भारावलेले साहित्यिक भारतात असतील.

अल्बुकर्क व वास्कोडगामा यांचे पुतळे ज्या ठिकाणी उभारले आहेत त्या योजकांनी ही स्मारकं उभारून पोर्तुगालचे मोठेपण हिंदुस्थानात आज-

तागायत टिकवून ठेवले आहे. योजकांच्या दृष्टीतला हा नेमकेपणा आमच्या-कडच्या फार थोड्या योजकामधून दिसतो.

डॉ. फॉन्सीसकु – लुई बोमीश डॉ. मिनेझीश ब्रांगाझ या एकोणसाव्या शतकातल्या गोव्यातल्या थोर विचारवंताची स्मारकं उभारुन गोवेकरानी पुढील पिढ्यापुढे नवा दृष्टीकोन ठेवला आहे.

'जिथे सागरा धरणी मिळते' या कवी बा. भ. बोरकर यांच्या काव्य-पक्तीवरून युरोप अमेरिकेतून आलेल्या हिप्पींनी पण गोव्याचं सौंदर्य जाणलं आहे. आणि म्हणूनच ते वर्षानुवर्षे तिथं तग धरून राहतात.

संगीत आणि कला या बाबतीत गोवा फार पुढे गेला आहे असं कुणीसं म्हटलं आहे. त्याच्या मताशी मी सहमत आहे. ज्या लता मंगेश-करांचा आवाज ऐकून साऱ्या भारतीयांच्या चित्तवृत्ती स्थिर होतात त्य मंगेशकर गोव्यातच जन्मल्या.

गोमंतकीयांचे सण मी पाहिले तेव्हा मला जाणवले ते हे की ख्रिश्च-नांचे सण फारच करमणूक करतात. हिंदूचा शिमगा तसा ख्रिश्च-नांचा कॉर्निव्हल. हिंदू शिमग्यात सोंगे काढतात. तसे ख्रिश्चन कॉर्निव्हल-मध्ये काढतात.

किंगमेमो हा कॉर्निव्हलचा सुत्रधार असतो. कॉर्निव्हल दिवशी तो डोक्यावर हॅट चढवून राजा म्हणून वावरतो. घोडे जोडलेल्या रथामध्ये किंग म्हणून उभा असतो. तो रथ रस्त्यावरून जाताना रथ थांबल्यावर किंग मेमो जाहिरनामा वाचून दाखवितो. तो म्हणतो आजपासून या भूमी-वर माझे राज्य आहे. कोणतेहि निर्णय राजाच्या मताशिवाय इतराना घेता येणार नाहीत.

ज्यावेळी या किंग मेमोचा रथ रस्त्यावरून निघतो त्यावेळी असंख्य ख्रिश्चन एकमेकांच्या अंगावर रंग उडवितात. जवळ जवळ सगळ्यानी

त्या दिवशी काजू फेणी घेतलेली असते. फॅन्सी कपडे घालून वेगवेगळे मुखवटे चढवून सोंगे काढली जातात. लोकांची थट्टा मस्करी करणे ही कॉर्निव्हलची मध्यवर्ती कल्पना असते. हा कॉर्निव्हल रोम मधून आला किंग मेमो ज्या रथात असतो त्याच्या पुडे विदुषक असतात.

या कॉर्निव्हलचे म्हापशात थोडे वेगळे स्वरुप असते. तिथं ऐतिहासिक प्रसंगावर सोंगे काढली जातात. सत्तरीचे राणे व पोर्तुगीज यांच्यामध्ये झालेल्या लढाईचे वर्णन दाखविणाऱ्या प्रसंगाचे सोंग काढतात एका दिवशी राणे घोडयांच्या रथात बसून येतात मोठ्या थाटात त्यांचा झेंडा लागतो. नि दुसऱ्या दिवशी त्याच राणेचा पराभव झालेचे दृश्य सोंगात दाखवल जाते.

रात्रीचे आकरा वाजून गेलेत. वास्कोमधील प्रवासी लॉजमधल्या बारा नंबरच्या रुममध्ये खुर्चीचा आश्रय घेऊन मी पत्र लिहितोय. सीता नि अवी निद्रेच्या आधीन गेलेत.

नोव्हेंबरची तेवीस तारीख आज. दिनांक २५ च्या सकाळी १०-३० वाजता दाभोळीहून उड्डाण करणाऱ्या इंडियन एअर लाईनच्या विमानाने मुंबईस येण्यासाठी निघणार आहोत. कळावे.
स्वाक्षरी करून पत्र लकोटयात ठेवलं न पत्ता लिहून लखोटा टेबलावर ठेवला लाईट ऑफकरून बिछान्यावर पडलो.

♠♠

# २०

बाथरुमकडून येताना बेडरुममध्ये डोकावत मी बोललो, 'अवीऽ'

हातातलं पुस्तक खाली ठेवत अवी बोलला. ' काहो ? '

मी म्हणालो, ' खाली जा अन एक लक्स सोप घेऊन ये. एक टुथ-पेस्टही आण. '

' पेस्ट कोणती आणू ? '

' विनाका '

' आणतो हं ' असं म्हणीत तो मागे वळला. न सीतेकडं पहात बोलला, ' आई '

' कारे '

' आण्णानी साबण आणि टूथपेस्ट आणायला सांगितली आहे पैसे दे '

सीतेनं बॅगेतले पैसे घेतले आणि अवीकडे देत ती म्हणाली. ' बघ, बिस्किटाचे दोन पुडेही आण. '

' कोणते ? पारले का ग्लुकोज ? '

' कोणतेही आण '

' बरं तर ' असं म्हणून तो मागे वळला न जिन्याच्या पायाऱ्या उतरू लागला.

सकाळचा चहा घेतल्यावर वर्तमानपत्र पहात होतो. नवा काळ गोमंतक लोकसत्ता, तरूण भारत, महाराष्ट्र टाईम्स, गोमंतक, टाईम्स ऑफ इंडिया. ठळक बातम्या वाचायला अर्धातास पुरला नाही.

वेटर आला नि मजकडे पहात म्हणाला, 'शेलार' वर्तमान पत्रातली नजर उचलून समोर पाहिलं तर समोर चहा घेऊन मुलगा आला न् म्हणाला ' आपल्याला फोनवर बोलावलंय ? '

'आलो हं !' असं म्हणत मी उठलो न् तळ मजल्यावर गेलो. व्यवस्थापक कचेरीत पोंचताच व्यवस्थापक म्हणाले,

' सरदेसाई आपणाशी फोनवरून बोलताहेत. '

' असं काय ? ' असं दुटपुटत मी रिसीव्हर उचलला.

' हॅलो ? ' आवाज दिला.

' रिंग थांबली, आवाज आला ' शेलार का ? '

' हो बोला '

' बांदोडकरांची भेट झाली ? '

' झाली '

' आपण परिवहन कार्यालयातून बोलता अहात ना ? '

' होय. '

' तिकडून आवाज आला, ' आपला पुढचा प्रोग्रॅम? '

' आता प्रोग्रॅम उरला आहे एक दिवसाचा '

' वास्कोतला शेवटचाच मुक्काम आजचा. आजच्या कार्यक्रमात गोव्यातल्या उद्योगपतींच्या मुलाखती. '

' उद्या ? '

' उद्या दाभोलीहून परतणार म्हणतोय. '

' दाभोलीहून ? म्हणजे, विमानाने परतणार ? '

' होय. '

' बरांय, अछा ! '

' अच्छा ' !

' रिसीव्हर खाली ठेवला.' न् जिन्याकडं वळलो. आणि चौथ्या मजल्यावर गेलो. '

नियोजीत वेळेप्रमाणे उद्योगपतींच्या मुलाखती आटोपून संध्याकाळी सहा वाजता वास्कोत परतलो.

रात्रीचे दहा वाजलेत.

सीता कॉटवर बसलीय आणि मी खुर्चीवर बसून सिगारेटचा आस्वाद घेतोय.

तोंडातली सिगारेट बाहेर काढीत मी म्हणालो, 'मीठ आणि नारळ, निर्यात करणारा एके काळचा गोवा आज केवढया मोठया प्रमाणावर मॅंगे-निझ निर्यात करतो आहे. ! '

' खनीज उत्पादनामुळेच गोव्याचा आर्थिक विकास जास्त लवकर होऊ शकला. '

'होय, चौगुले, धेंपे, साळगावकर, बांदोडकर आदि उद्योगपती गोव्याला लाभले म्हणूनच गोव्याचा आर्थिक विकास लवकरात लवकर होऊ शकला.'

'उद्योगानेच आर्थीक उत्पादन वाढते. ओगले, कुपर, किर्लोस्कर यांच्या धडपडीनेच महाराष्ट्राच्या आर्थीक उत्पादनात जशी भर पडत आहे तशी गोव्यात चौगुले, धेंपे. बांदोडकर, साळगावकर या उद्योगपतींच्या प्रयत्नाने गोव्याच्या आर्थीक परिस्थितीत वाढ होत गेली आहे.'

पंख्याच्या घरघरीतच आमची चर्चा चाललीय लॉजच्या गच्चीतल्या खुर्चीत अत्री बसलाय वास्कोतले तावडे हिरवे दिवे नजरेपुढं लकाकताहेत.

सिगारेटचा धूर सोडीत मी म्हणालो, 'महाराष्ट्रात किर्लोस्करांचं जे स्थान तेच गोव्यात चौगुल्यांचं. उद्योगाच्या अनेक क्षेत्रात त्यानी आपले प्रयत्न कारणी लावलेत. सागरी वहातुकीच्या बाबतीत तर त्यानी मोठाच विक्रम केला आहे. असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.'

'बरं, त्या उद्योगपतींच्या बाबतचे विचार थोडे बाजूला ठेवू या—

वेगळ्या मुद्याकडं माझ्या बोलण्याचा रोख वळवण्यासाठी सीतेचं ते विधान ऐकताच मी बोलायचा थांबलो नि तिच्याकडे पहात राहिलो.

ती म्हणाली, 'परवा तुम्ही ते पत्र लिहिलं होतं.'

'होय'

तेवढ्यात अवी आला न् कॉटवर टेकला.

'ते वाचलं होतं तुम्ही?' मी प्रश्नांकीत दृष्टीने पहात उद्गारलो.

'होय, त्यात प्रवासाचा ओझरता परामर्ष घेतला आहे ना?'

'होय आणि प्रवाशांना ठळकपणाने जाणवणाऱ्या स्थळांच्या नि प्रसंगांच्या दृष्यांचे वास्तवचित्र औटलायनींच्या द्वारे पत्रवाचकापुढे ठेवले

आहे काही घटनांनी स्थळांचेबाबत प्रश्न टाकून विचार करायला लावले आहे.'

'होय, सीता म्हणाली, 'पण एका महत्वाच्या बाबीचा उल्लेख त्यात आला नाही.'

'कोणत्या ? ' मी उत्सुकतेनं तिच्याकडे पहात बोललो.

ती म्हणाली,'गोमंतकियांच्या जीवनात मांडवी आणि जुवारी या नद्यांचे स्थान महत्वाचे आहे. महाराष्ट्रात गोदावरी कृष्णेचं आहे ना, तसं.'

सिगारेट विझवून मी कॉटवर आडवा झालो.

'खरं आहे, पत्र गडबडीत लिहिलं होतं त्यामुळे तो मुद्दा माझ्या ध्यानातच आला नाही.'

'अहो, सीता म्हणाली, 'भारतात गंगा गोदेला मातेसमान मानतात. तसे गोव्यात मांडवी जुवारीला माता मानतात.'

'होय खरं आहे'

'गंगेच्या न् गोदावरीच्या काठी अनेक पवित्र क्षेत्रे आहेत तशी मांडवी-जुवारीच्या काठी कुठं आहेत ?' अवीने वेगळीच शंका उपस्थित केली.

त्याच्या शंकेचं निरसन करावे म्हणून मी म्हणालो,' या नद्यांच्या तीरांवर पवित्र क्षेत्रे जास्त नसली तरी वहातूक, दळणवळणाच्या दृष्टीने मांडवी जुवारीचा गोमांतकीयांना फार उपयोग झाला आहे. हे नाकबूल करता येत नाही.'

घड्याळाकडं पहात मी म्हणालो, 'बरं, आकरा वाजून गेलेत. झोपूया आता. आन् हे पहा.'

उद्या सकाळी लवकर उठायला हवे. सकाळचे नित्यक्रम लवकर आटो-पायला हवेत, तेव्हा ठरलेल्या नियोजित वेळेत उद्याचा प्रवास सुरू होईल.

# २९

स्टेशनरोडवरच्या बसस्टॉपजवळच्या टॅक्सीस्टँडवर सात–आठ



-टॅक्या उभ्या होत्या. पहिल्या क्रमांकावरच्या टॅक्सीजवळ आम्ही गेलो. टॅक्सीला रेलून उभा असलेल्या तरुणाकडे पहात मी म्हणालो.'

'एअर फोर्ट यहाँसे कितना दूर है ?'

माझ्याकडं पहात तो म्हणाला, 'आय कान्ट स्पीक हिंदी, कॅन यु स्पीक इन कोकणी लॅंग्वेज ?'

चेहऱ्यावरचे भाव बदलीत मी म्हणालो;

'आय कान्ट स्पिक कोकणी टू, बट आय नो कोकणी, यु शूड स्पीक इन इंग्लीश.'

'एस, नो बडी.'


'हाऊ लाँग इज दाभोळी फ्रॉम हिअर ?'

'इट विल टेक टेन मिनिटस टू रीच देअर.'

'व्हॉट इज द फेअर टू दाभोली ?'

'टेन रुपीज प्लीज.'

असं म्हणीन त्यानं दरवाजा खोलला. आम्ही टॅक्सीचा आश्रय घेतला नि दरवाजा ओढून घेतला.



ड्रायव्हर केबिनमध्ये शिरला न आपल्या जागेवर स्थानापन्न झाला समोरच्या तबकडीवरुन हात फिरवून त्यानं चावी फिरवली.

गिअर बदलला आणि ॲक्सिलेटरवर उजव्या पायाने दाबून ब्रेका-वरचा पाय काढला. तशी टॅक्सी पुढे झेपावली.

वास्कोतील हमरस्त्याने टॅक्सी चालली होती. पुढून येणाऱ्या वहा-नाना बगल देऊन चालली होती. रस्त्यात आड येणाऱ्या वहानानी बाजू द्यावी म्हणून तो मधून मधून हॉर्न वाजवत होता.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या इमारती हळू हळू मागे सरकत होत्या.

झुआरीलॉजच्या समोर टॅक्मी गेली त्यावेळी ड्रायव्हरने ॲक्सिलेटरव-रचा पायाचा दाब कमी केला आणि ब्रेक दाबले. तसा टॅक्सीच वेगा कमी झाला.

चौक ओलांडल्यावर ड्रायव्हरने टॅक्सी उजव्या बाजूस वळलेल्या रस्त्याला वळवली. आणि वेग वाढविला.

मोठ्याने आवाज देत मागून आलेली टॅक्सी बाजूने पुढे गेली.

चोवीस नोव्हेंबरची सकाळ. आमच्या गोव्याच्या प्रवासातल्या शेव-टच्या दिवसाची सकाळ.

नऊ वाजून वीस मिनिट झालीत. बँकेचं आकौंट बुक उघडून सीते-कडं पहात मी म्हणालो, 'गोव्याच्या प्रवासाच्या अकौंटमधले दीडहजार रुपये वजा झालेत.

सीता म्हणाली, ' आपण केलेल्या अंदाजात बराच बदल झाला की! '

समजुतीच्या सुरात मी म्हणालो, ' अगं, प्रवास वाढला नाही का, त्यामुळे खर्चात वाढ झाली. '

ती म्हणाली, ' प्रवासात आपल्या रोजच्या हालचाली यंत्रासारख्या होत होत्या.'

मी म्हणालो, ' जीवनाला वेग आला होता. त्यात लचबदता होती. '

टॅक्सी पंचवीसच्या वेगाने धावत होती. धुक्याच्या पडद्यामुळे वास्कोतल्या पलिकडच्या इमारती स्पष्ट दिसत नव्हत्या. इमारतींच्या तळघरातले मोठमोठाले स्टॉल नजरेपुढून सरकत होते. टॅक्सी मुंबईतल्या फोर्ट विभागातल्या रस्त्यावरून चालली आहे की काय असे वाटत होते.

अवी बाहेर पहात होता.

' आण्णा, हा आपला गोव्यातल्या प्रवॉसातलाशेवटचाच दिवस ना ?'

' होय. '

' आता आपण मुंबईला जायचं ?'

' होय. साडेदहा वाजता दाभोळीहून उड्डाण करणाऱ्या विमानाने

माझ्याकडे बघत अवी म्हणाला।, ' आण्णा, आपण ज्या विमानाने मुंबईस जाणार आहोत, ते विमान किती वाजेपर्यंत मुंबईत पोचेल. ?'

' साडेआकरा वाजायच्या आत. '

आश्चर्य चकीतनजरेनं पहात तो उद्‌गारला, ' साडेआकरा ?'

' होय. '

टॅक्सीने आम्हाला दहा वाजता दाभोळी विमान तळावर नेऊन सोडले.

विमान तळासमोरच्या आवारात चार पाच बसेस आणि वीसपंचवीस टॅक्स्या ओळीने उभ्या होत्या.

टॅक्सीवाल्याच्या हातावर वीस रुपये टेकवून त्याचा निरोप घेतला.

सामान घेऊन आम्ही विमानतळावरच्या वेटींग रुममध्ये प्रवेश केला.

तिथली स्तब्धता, स्वच्छता, नि टापटिप पहाताच सीतेच्या न् अवी-च्या चेहऱ्यावर वेगळ्याच प्रकारचे समाधानाचे तेज झळकले.

सीता म्हणाली, ' सांताक्रूझ विमानतळाच्या वेटिंग रुमपेक्षा इथला वेटिंगरुम कितीतरी लहान आहे '

शेकडो प्रवाशांनी वेटिंग रुम गजबजला होता त्यात युरोपियन जास्त होते, कांही इन्क्वायरी ऑफि-सच्या समोर उभे होते. काही सामानाची नोंद करीत होते. काही तिकीट केबिनसमोरच्या रांगेत उभे होते, तर काही खुर्च्यांवर बसले होते. काही उपहारगृहासमोर उभे होते. ते थंड पेयांचा आस्वाद घेत होते

सीतेला न् अवीला बसायला सांगून मी तिकीट केबीनकडे गेलो. शंभराच्या चार नोटा देऊन मुंबईची तीन तिकीटं घेतली न् तीन जागा रिझर्व केल्या. आणि सीता न अवी जिथं बसले होते तिथं आलो

पुढच्या रांगेतील खुर्चीवर एक तरुणी बाजूच्या तरुणाशी बोलत बसलेली होती.

' तुम्ही कॅजुअल लिव्हचेर असात ? '

' व्हय. '

' तुमका बुरी मेल्ली लिव ? '

' मेलचीच नसती. '

' मंग ? कशी मेल्ली. ?'

' साळगावकराचे लेटर हाडचे पडलो ?'

' सुपरिंटेंडेंट सायबाची ट्रान्फर वचपीची आसा समजाले. '

'बरे चाव, खनीज सप्लायची सुटका झाल्यासारखी जायत. '

' ट्रान्फर खय जावपाची? '

' खयी जायत ? '

' कित्या ? तुमका कॅज्युअल लिव दिव दुनाव?'

' लिवचे सोड म्हणन ? त्याचीं शिस्त सगल्याना त्रांस करता ! '

' खरे असा, त्याच्या ऑफिसाच्या टायमात नोकरानं बाहयर जावक मेळाना. '

'कंपनीचे डायरेक्टराची इतकी तसदी नसता, इतकी तसदी तेची असत,'

' मंग ? तुजी काय जाता ? तुमका काम बेगीय झाला तर तुमाला हलका जायन ती !'

मी उठलो न् समोरच्या खिडकीसमोर गेलो. सामानाची माहिती देऊन सामानाची नोंद करून सारे सामान त्यांचे स्वाधीन केले.

सीता न अवी बसले होते. तिथं मी आलो त्यावेळी अवी म्हणाला, आण्णा, बॅगा कुठायतं ? '

मी म्हणालो, 'बसच्या प्रवासातल्या प्रमाणे प्रवाशांनी आप आपले सामान प्रवासाच्या वेळी आपल्या बरोबर ठेवायचे नसते.'

' तर '

'तर ते सामान कंपनीच्या स्वाधीन करायचे असते. प्रवाशी ज्या विमानतळावर उतरणार असतात तिथं त्याना ते परत केलं जातं. सामानाच्या वजनावरून त्याचे भाडं आकारलं जातं.'

अवी म्हणाला, 'म्हणजे एस. टी. च्या प्रवासात लगेज घेतात तसे का ?'

'होय.'

तेवढ्यात बाजूच्या कोपऱ्यातील कर्ण्यातून आवाज आला. दाभोळीहून मुंबईस जाणारे विमान दहा तीस वाजता उड्डाण करील.

मी घड्याळ पाहिलं. दहा वाजले होते. विमानात प्रवेश करायला अजूनीही आठ नऊ मिनिटाचा अवकाश होता. म्हणून अवीकडे पहात मी म्हणालो, 'गोव्याचा निरोप घेताना मन समाधानी राहावे म्हणून थंड पेय घेऊ या का ?'

'घेऊ या' दोघांचंही मत पडलं.

म्हणून आम्ही समोरच्या उपहार गृहापुढे गेलो. आणि गोल्ड स्पॉट घेतले

प्लॅटफॉर्मवरं जायची आज्ञा मिळेपर्यंत सारे प्रवासी वेटिंग रूम मधल्या खुर्च्यांवर बसून राहिले.

मी ज्या रांगेत बसलो होतो. त्याच रांगेत माझ्या उजव्या बाजूच्या खुर्चीवर एक मुलगा होता. त्यांच्या शेजारी एक तरुणी होती ते वर्णाने गोरे, त्यांच्या वेषावरून ते युरोपियन असावेत हे मी प्रथम क्षणीच जाणले. इंग्लिश भाषेत चाललेली त्यांची बातचीत ऐकल्यावर ते एका कुटुंबातले असावेत हेही लक्षात यायला वेळ लागला नाही.

इंग्लीशमध्ये चाललेली त्यांची भारतीय मानवा विषयीची चर्चा आम्ही ऐकत होतो.

त्यांची चर्चा मी आवडीने ऐकतो आहे. असं निदर्शनास येताच तो तरुण माझ्याकडं पहात ' हलक्या नि गोड आवाजात म्हणाला,

'यु बिलॉंग टु वुईच कंट्री ?'

मी म्हणालो, 'इंडिया.'

‘ त्या तरुणाच्या चेऱ्यावर हास्य चमकले. ’

‘ त्यांच्या बोलण्यातली आपुलकी नि आस्था पाहिल्यावर माझ्यातली उत्सुकता वाढली ’ ‘ व्हाय यू केम टु गोवा ? ’

‘ वन ऑफ माय फ्रेंडस् इज हिअर सो, आय केम टू सी हिम.’

‘ त्यांचा अधिक तपशीलात परिचय घडावा या उद्देशाने मी आणखी प्रश्न केला. ’ ‘ व्हॉट हीइज डुईंग हिअर ? ’

‘ ही इज ए माईन ओनर, ही ओनस् मेनी मॅंगेनीझ माईन्स. ’

माझ्या चेहऱ्यावरचं हास्य आणखी वाढलं

‘ आय ॲम डुईंग बिझिनेस इन् मॅंगेनीझ. ’

‘ उलट तपासणीसाठी तो म्हणाला. ‘ मे आय नो समथिंग.

अबाऊट यु ?’

‘ आय एम ए टुरिस्ट. ’

‘ यु हॅव कम फ्राम व्हेअर ?’

रंगावरून अंदाज आला असला तरी तपशीलाची खात्री करून घेण्यासाठी त्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले म्हणून मी म्हणालो,

‘ महाराष्ट्र ’

चेहऱ्यावर आदराचे भाव आणीत तो म्हणाला,

‘ युवर रिलिजन प्लीज ? ’

त्याच भावनेतून मी म्हणालो, ‘ हिंदु. ’

परिचयाच्या अधिक खोलात जात तो म्हणाला,

‘ व्हॉट फॉर यु हॅव कम हिअर ?’

त्याच जाणीवेनं मी म्हणालो, ‘ आय हॅव कम टू सी गोवा ॲंड इटस् पीपल. ’

'आर यू सो मच इंटरेस्टेड ?'

'येस; आय एम थिंकिग ऑफ रायटींग समथिंग अबाऊट दि कचचल लॉईफ ऑफ दि पिपल ऑफ गोवा.'

स्मित हास्य करीत ते गृहस्थ म्हणाले, 'ओ... इट मिन्सयू आर ए रायटर.!'

ते तिघेही सुहास्य करीत माझ्याकडे पहात राहिले.

माझ्याही चेहऱ्यावर हास्य उमटले. 'येस्.'

'व्हॉट डु यू राईट ?'

'स्टोरीज.'

'हॅव यू व्हिजिटेड एनी अदर फॉरेन कंट्री ?'

नकारार्थी मान डोलावून मी म्हणालो, 'नो.'

त्याच क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर असमाधानाच्या छटा तरळल्या.

हलक्या आवाजात ते म्हणाले, 'ओ नो, रायटर मस्ट ट्रॅव्हल वाईडली, आय थिंक यू इंडियन्स !' आर फॉर बिहाईंड इन दॅट रिस्पेक्ट. इज इट नॅाट ?'

'यु आर ट्रु टू सम एस्कटेंट.'

'यु नो मोस्ट ऑफ दि युरोपियन्स स्पेंड मच ऑफ देअर लाईफ टाईम इन ट्रॅव्हलिंग अँड सीईंग डिफरंट प्लेसेस. व्हेन आय वाज यंग आय हॅड सीन अमेरिका अॅण्ड इंग्लंड.'

देशाचा अधिक तपशीलात परिचय व्हावा म्हणून माझ्याकडे पहात ते म्हणाले, 'हू इज फेमस रायटर इन युवर कंट्री ?'

मी म्हणालो, 'रविंद्रनाथ टागोर.'

ते तिघेही मोठ्याने हसले.

‘ या, या ऽ ऽ वन हू हॅड वन नोबल प्राईज ?’

‘ होकारार्थी मान डोलावून मी उत्तर दिले. ’

‘ येस, यु आर करेक्ट. ’

‘ आय हॅव रेड दॅट इन युवर कंट्री. देअर आर मेनी रिलिजन्स, मेनी कास्टस्, इज इट ट्रू ?’

‘ ये, आवर कंट्री बीइंग ए बिग कंट्री, दॅट व्हरायटी इज बाऊंड टु बी देअर ’

‘ जनरली युवर कंट्री हॅज हॉट क्लायमेट? ’

‘ येस, बिकॉज इट इज निअर दि इक्वेटर.’

‘ व्हॉट अबाऊट नॅचरल ब्युटी इन युवर कंट्री?’

मोठ्या समाधानी वृत्तीने मी म्हणालो, ‘ टु दि नॉर्थ ऑफ आवर कंट्री देअर इज बिगेस्ट माऊंटन ऑफ दि वर्ल्ड- दि हिमालय ...’

स्मीत हास्य करीत गोड नि हलक्या आवाजात ती तरुणी म्हणाली,

‘ ओ, इट मिन्स गॉड हॅज गिव्हन फाईन गिफ्ट टु युवर कंट्री. व्हाय नॉट.. फेमस होली रिव्हर गंगा ऑलसो, इज क्रिएशन ऑफ गॉड, शी इज बॉर्न इन हिमालयाज ओनली ओ ... दॅट इज राईट. आय हॅड सीन वन पिक्चर – जिस देशमे गंगा बहती है – व्हाईल आय वाज इन इंग्लंड.

मला मोठंच समाधान झालं.

’ सो यु नो आवर हिंदी लॅग्वेज ऑलसो. ’

‘ येस, अॅज आय एम डुईंग बिझिनेस ऑल ओव्हर दि वर्ल्ड आय नो मेनी लॅग्वेजेस.’

‘ टु व्हींच डे इंडियन्स गिव्ह इंम्पार्टन्स ? ’

'वुई सिलेब्रेट फिफटीन्थ ऑगस्ट, अॅज आवर कंट्री बिकेम इनडिपेन्डंट'

'ऑन दॅट डे. ? '

'वुई ऑलसो इक्वली सेलेब्रेट टवंटीसिक्सथ जानेवारी अॅज ऑन दॅट डे आवर कन्ट्री बिकेम रिपब्लिक.'

'यावेळीही त्यांच्या चेऱ्यावर समाधानाचे तेज चमकले.

'ओ. के. इट वॉज व्हेरी नाईस टु टॉक टु यु.'

'आय एम् ग्लॅड बिकॉज आय कुड गॅदर व्हेरी गुड इन्फरमेशन ऑफ इंडिया.'

'हातात हात मिळवून ते गृहस्थ म्हणाले,

'थॅंक यु व्हेरी मच.'


'व्हेअर यु वुईल बी गोइंग फ्रॉम हिअर '

'जापान, आय वुईल बी गोईंग टू बॉम्बे, नेक्स्ट् वीक अॅण्ड फ्राम देअर टु टोकिओ.'

'ओ. के. देन सी यु....... '

प्लॅटफार्मवर जायची आज्ञा मिळताच सारे प्रवासी प्लॅटफॉर्मवर गेले.

तेवढयात समोरच्या क्षितिजाचे रेषेत लांबून येणारा पक्षी दिसावा



तसे विमान दिसले.

नियंत्रणकक्ष ओलांडताच त्याने धाव पट्टीला स्पर्श केला.


अवीच्या नजरेत येताच तो म्हणाला, 'आण्णा विमान आले बघा.

तेवढ्यात आभाळ फाटल्यावर यावा तसा आवाज आला नि समो-रच्या धावपट्टीवरून काटकोनात वळण घेऊन विमान आमच्या समोर-च्या धावपटीवर येवून थांबले.

पंखाच्या पुढील बाजूचा दरवाजा उघडला. तेवढ्यात बाजूने आण-लेली शिडी तिथं जाऊन बिलगली.

तिथं अवीची नजर पोचली. त्यावेळी मी म्हणालो, ' तिथं पायलट असतो. दरवाजाच्या पुढे खिडकी दिसतेय ना तिथं त्याची बसण्याची जागा, असते.'

तेवढ्यात त्या दरवाजातून पायलट खाली उतरला.



पंखाच्या पाठीमागचा दरवाजा उघडल्याबरोबर घडीचा जिना त्याला जाऊन भिडला. पंखाखालून चारपाच सामान वहातुकीच्या लहान लहान गाड्या पलिकडच्या दरवाजाजवळ गेल्या. कर्मचारी सामान वर चढवत होते.

बोटीत चढताना अवी जेवढा भ्याला नव्हता तेवढा तो विमानाच्या जिन्यातून वर चढताना भीत होता त्या हवाई जहाजात प्रवेश केल्यावर मग त्याचे भय नाहिसे झाले. एअर कंडीशन्ड थियटरात शिरल्यासारखे वाटले. पंखे कुठे फिरताहेत हे दिसत नव्हते पण हवेवरून ते जाणवत होते.

हवाई सुंदरीने आमच्या जागा आम्हास दाखविल्या.

आम्ही आमच्या जागी स्थानापन्न झालो.

आपआपले पट्टे बांधा कर्ण्यातून आवाज आला. आम्ही पट्टे बांधले. कर्ण्यातून आवाज आला. ' गोवा अपका अभिनंदन करता है। आपको यात्रा सफलता से पूरी हो ' गोवा आपले अभिनदन करीत आहे. आपला प्रवास सुखाचा होवो.

अशी सूचना कानावर येताच आवाजदेऊन विमानाने समोरच्या दिशेस सुळकी मारली.

विमान धावपट्टीवरून पुढे सरकत राहिले त्यावेळी बस सारखा आवजा येत होता प्रवाशाना बसमधल्या प्रवाश्यासारखे हेलकावे बसत होते. एकाएकी कानठळीबसावी असा आवाज झाला नि नियंत्रित कक्षेवर जाताच त्याने वरच्या दिशेला उड्डाण केले. त्यावेळी अवी थोडा भ्याला. पण क्षणात त्याची भीती नाहीशी झाली.

विमानाने जमीन केव्हा सोडली हे आमच्या लक्षात आले नाही.

बाजूच्या गोलाकार खिडकीच्या काचेतून अवी बाहेर पहात होता.

विमानाने वेग घेतला त्यावेळी कर्ण्यातून आवाज येत होता. ' अपका हवाई जहाज चारसो मीलके गतीसे चल रहा है। अपका हवाई जहाज डेंड हजार फूट उचीसे चल रहा है।' आपले विमान ताशी चारशे मैलाच्या वेगाने चालले आहे. आपले हवाई जहाज दीड हजार फूट उंचीवरून चालले आहे. '

सीतेकडे पहात मी म्हणालो, ' विमानाचा प्रवास जलद गतीचा तसाच तो जास्त सुखाचा.

अवी खिडकीनतून बाहेर पहात होता. मला डिवचून तो म्हणाला, ' समोर दिसतोय तो डोंगर का ? '

मी म्हणालो, नाही. तो ढग आहे. '

विमान झरझर खालच्या दिशेला घसरू लागले तसा तो घाबरला. नजर वळवून मागे सरकला. त्याला वाटले विमान पडते की काय.

तेवढ्यात खाली घसरत असलेलं विमान थांबले नि समोरच्या दिशेला चालले.

सीता म्हणाली, ' जलद गतीने केलेल्या प्रवासात भेटणारे मजेचे क्षणही जलद गतीनेच टिपून घ्यावे लागतात, नाही का हो ?'

मी म्हणालो, ' प्रवासातले हे रहस्य मी तुम्हाला गोव्याच्या प्रवासाला आपण आरंभ केला त्याच दिवशी सांगितलं होत. '

' म्हणूनच तुम्ही प्रत्येक दिवसाच्या प्रवासाला सुरवात करायच्या अगोदर डायरी पहात होता नाही का ? '

'हो. डायरीत आजचा प्रोग्राम पाहिल्यावर प्रवासाला आरंभ करण्याआधी मला काळ काम वेगाचं गणित मांडावं लागायचं. '

' तरीसुद्धा कितीतरी वेळा प्रवासाचे अदाज चुकले नि ठरविलेल्या प्रवासात काटछाट करावी लागली आणि म्हणून काही वेळेला पूर्व नियोजित कार्यक्रमात बदल करावा लागला. '

' आवळलेला पट्टा थोडा ढिला करत मी म्हणालो, ठराविक वेळात अमूक इतका प्रवास निघालेल्या प्रवाशाने प्रवासाला आरंभ करताना जो वेग घेतला असेल तो काही वेळेंला कमी केला तर त्याला अनेक अडचणीना तोंड द्यावे लागते, जेवण विश्रांती वेळेत न मिळणे, ठरविलेल्या प्रवासातला प्रवास कमी होणे. असले तोटे सहन करावे लागतात. '

सीता म्हणाली, ' हो. आपणाला सुद्धा तोटा काही वेळेला सहन करावे लागळेत. '

' म्हणून प्रवासाला निघण्याआधी प्रवाशाने काळ काम वेगांचे गणित मांडावे व त्या बरहुकूम हालचालीच्या कृति कराव्या म्हणजे त्याला प्रवासातील ठरविलेली उद्दिष्ठे साध्य करता येतील, '

हर घटकेला हवाई सुंदरीचे सहाय्य मिळते. जेव्हा कॉफी

पाहिजे असते तर त्या त्या वेळी आज्ञा करताच हवाई सुंदरी धाऊन येत असते.

शंभरएक प्रवासाना घेऊन चाललेले विमान धावत होते. बाजूच्या खिडकीच्या बाहेरचे वातावरण घुसत होते.

एकाएकी पतंगाने वरच्या दिशेला झेप घ्यावी तसे विमान वरच्या दिशेला सरकत राहिले काही क्षण संपल्यावर ते समोरच्या दिशेकडं सरकत राहिले. त्यावेळी खालची भूमी दिसत नव्हती. विमानाच्या मार्गात ढगांची गर्दी होती, खालीही ढगाच्या पडद्यामुळे जमीन दिसत नव्हती.


आम्ही कपातली कॉफी संपवतोय तोच कण्यांतून आर्तस्वर आला.

(, पोटावरचे पट्टे आवळा. आपले विमान सह्याद्रीच्या पट्ट्यात प्रवेश करीत आहे महाराष्ट्राच्या भूमिवरच्या आकाशातून चालले आहे. थोड्याच वेळात आपले विमान तळावर उतरेल. ' )

हे ऐकताच अवी दचकला, मजकडे पहात तो म्हणाला, ' म्हणजे, आपण मुंबईत आलो ? '

मी म्हणालो, ' होय. '

' तेवढ्यात विमान जमिनीवर टेकले. '



REFBK-0023675